# brown book

UNIVERSAL LIBRARY
OU_192386
UNIVERSAL LIBRARY

कॉन्टिनेन्टल प्रकाशन ३०

# संचार

लेखक

चिंतामण विनायक जोशी

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

सन १९४९ ]

[ किंमत २॥ रुपये

प्रकाशक :
अ. अं. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
$\frac{१९६}{१९}$ सदाशिव, पुणें २

सर्व हक्क लेखकाधीन.

चित्रकार : श्री. डी. डी. दलाल, मुंबई.

मुद्रक :
स. रा. सरदेसाई, बी.ए., एलूएल्.बी.
नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना,
४१ बुधवार, पुणें २

ज्यांनीं मला प्रवासाची आवड बाळपणीं लाविली

व ती यथाशक्ति पूर्ण करण्यांत

कसूर केली नाहीं ते

कै. ती. काका ( ल. कृ. जोशी )

आणि

कै. ती. आप्पा ( वि. रा. जोशी )

यांच्या चरणीं.

# प्रस्तावना

'संचार' ह्या संग्रहांत सन १९१४ पासून १९४३ पर्यंत तीस वर्षांच्या अवधींत केलेल्या कित्येक प्रवासांचें टिपण एकत्र केलें आहे. हीं टिपणें प्रभात, महाराष्ट्र शारदा, यशवंत इत्यादि मासिकांतून आलेलीं आहेत. हा संचार जसा भिन्न स्थळांत तसाच भिन्न काळांतहि झालेला आहे. विजापूरचें वर्णन मी विद्यार्थि-अवस्थेंत असतांना लिहिलेलें आहे. हल्लींच्या काळांत विद्यार्थीसुद्धां अधिक चांगलें लिहूं शकतात, पण १९१४ मधील विद्यार्थ्यांच्या लेखनसरणीची मजल दाखविण्यास माझें वर्णन पुरेसें आहे.

विजापूर हें ठिकाण आतां महाराष्ट्रापासून अगदींच जवळ आलेलें असून बहुजनांच्या पाहण्यांतहि येत आहे. परंतु १९१४ त तशी स्थिति नव्हती. त्या वेळीं मोटारी, पुढील काळांतल्यासारख्या सवंग झालेल्या नव्हत्या आणि म. स. म. रेल्वेचा फांटा सोलापूरपर्यंत आलेला नव्हता. दोन महायुद्धांच्या मधल्या काळांतल्याप्रमाणें परतीचीं तिकिटें किंवा झोन तिकिटेंहि सुरू झालेलीं नव्हतीं. त्यामुळें विजापूर फारसें सुलभ नव्हते व म्हणूनच तेथील प्रवासवर्णन लिहिण्याची मला बुद्धि झाली होती.

गणपति-पुळें हें ठिकाण देखील १९१७ मध्यें सर्वांच्या आटोक्यांत आलेलें नव्हतें. तेथील तिवरी बंदरावर त्या काळांत आगबोटी उभ्या राहत नसत. तसेंच मोटारीहि गांवाच्या जवळ जाऊं शकत नसत. ह्या कारणानें तेथील प्रवासवर्णन मीं लिहिलें.

१९१८ च्या सुमारास जीं प्रवासवर्णनें लिहिण्यांत येत असत त्यांजवर विडंबनास्त्र चालविण्याकरितां मीं "माझा मुंबईचा प्रवास" हा व्याज-लेख 'उद्यान' मासिकांत लिहिला. 'चिमणरावाचें चऱ्हाट' ह्या पुस्तकाच्या आरंभीच तो समाविष्ट केला आहे. त्यावरून प्रवासवर्णनें कशीं नसावीं ह्या विषयासंबंधींचे माझे विचार वाचकांस समजतील. लेखकानें काय खाल्लें, तो कोणाच्या घरीं उतरला होता, रेल्वे अधिकाऱ्यांशीं किंवा इतर उर्मटांशीं तो कसा भांडला-असल्या प्रकारच्या पूर्ण वैयक्तिक गोष्टी वाचकांस नको असतात. परंतु प्रवासस्थळांतील विशेष सांगण्यापेक्षां आपले स्वतःचे पोवाडे गाण्याकडेच बऱ्याचशा

प्रवासवर्णकांचें लक्ष असते. १९१८ नंतरच्या माझ्या प्रवासवर्णनांत हा दोष टाळण्याचा बराच प्रयत्न मीं केलेला दिसून येईल. स्वानुभव कथन करतांना स्वतःचा उल्लेख वारंवार येणें अपरिहार्य आहे, परंतु त्यामध्यें अहंमन्यते (बोअर-डम् )चा दर्प येऊं न देण्याची खबरदारी मीं घेतलेली आहे.

'कालिकातेर पॉरिचय' ह्या टिपणावर माझ्या तारुण्यसहज मत्सरग्रस्ततेची बरीच छाया पडली आहे. तें जेव्हां मीं लिहिलें तेव्हां एक विशिष्ट बंगाली कम्पू महाराष्ट्रावर वेळींअवेळीं टीकेचे हल्ले चढवी व त्यामुळें त्या काळच्या तरुणांस वंगद्वेषाची लहर येई. आतां माझ्या परिपक्व बुद्धीला प्रामाणिकपणें वाटतें कीं, तें बंगाली नाटक खरोखर समकालीन मराठी नाटकांपेक्षां पुष्कळच पुढारलेलें होतें. १९३९ मध्यें पुनः कलकत्त्यास गेलों असतां बंगाली बोलपट पाहिले व ते प्रभातच्या अव्वल दर्ज्याच्या चित्रपटांच्या तोडीचे वाटले.

ह्या लहानशा पुस्तकांत थोड्याशाच प्रवासांचा उल्लेख आलेला आहे. कारण प्रवास करण्याची जितकी आवड मला आहे तितकी प्रवासवर्णन लिहिण्याची नाहीं. ( वाचकांचें सुदैव ! )

कै. श्री. सयाजीरावमहाराज यांच्या सन्निध राहिलेल्या भालदार-चोप-दारांना देखील परदेशच्या यात्रा घडल्या, परंतु मला एकोणीस वर्षांच्या अवधींत ही संधी मिळाली नाहीं. पाण्यांत राहून मीं कोरडाच निघालों. त्याचप्रमाणें विमानोड्डाणाचा योग मला कधींहि लाधला नाहीं, तथापि विमाना-शिवाय बाकीच्या सर्व वाहनांतून संचार करण्याचें भाग्य मला प्राप्त झालेलें आहे.

अगदीं बाल्यावस्थेंत माझें आयुष्य अहमदनगर, पुणें आणि बेळगांव-धार-वाड ह्या त्रिस्थळींत हेलपाटे घालण्यांत गेलें. बेळगांवकडे माझें आजोळ होतें. माझे आजोबा मुनसफ असल्यानें गांवोगांव हिंडण्याची संधि आम्हांला मिळे. माझे समवयस्क मातुल नाना आणि गोपू ह्यांच्याबरोबर धमणींतून आम्ही गांवोगांव फिरावयास जात असूं. धमणीच्या दोन बैलांचीं नांवें नंद्या आणि राजा अशीं होतीं. चालत असतां नंद्या आपली मान आडवी हालवीत असे आणि राजा उभी खालींवर करीत असे. एक नकारात्मक, तर दुसरा संमतिदर्शक. त्यामुळें रागीट स्वभावाच्या नानाकडे नंद्याची आणि गरीब स्वभावाच्या गोपूकडे राजाची मालकी आम्हीं फालतू मंडळींनीं सोंपविलेली

होतो. ते दोन मुलगे म्हणजेच आताचे कवि नारायण गंगाधर लिमये आणि विनोदी लेखक कॅप्टन लिमये हे होत.

बेळगांवजवळील बाळेकुंद्रीच्या शाळेंत बिन इयत्तेंत कांहीं दिवस आम्ही जात होतो. मास्तर कानडी आणि आम्हां तिघांखेरीज सगळीं मुलें कानडीच होतीं. ह्या काळांत कर्नाटकावर मराठीचा वरचष्मा असल्यानें शिक्षण मात्र मराठींत चालावयाचें. कर, घर, मठ, रथ असे शब्द मराठी अक्षरांत मास्तरांनीं लिहावयाचे व कानडींत त्यांचा अर्थ शिकवावयाचा. उजळणी, पाढे सर्व मराठींतून. पण त्याचा अर्थ कानडींत सांगावयाचा. कन्नडिग चळवळ ज्या वेळीं उत्पन्न झाली त्या वेळीं मराठ्यांना संताप आला. पण बाळेकुंद्रीच्या शाळेंतला मराठीचा सामुरवास प्रत्यक्ष पाहिला असल्यानें मला त्या चळवळीचें यथार्थत्व पटलें. ( हिंदी भाषेविरुद्ध अशीच चळवळ करण्याचा प्रसंग महाराष्ट्रावर लवकरच येणार आहे, हे मी बजावून ठेवतों. ).

बाळेकुंद्रीच्या कानडी मास्तरांचें वैशिष्ट्य असे होते कीं, ते दोनचार दिवसांनीं आठ हात लांबीचा हिरवा बांबू वेळूच्या बेटांतून कापून आणीत असत आणि वर्गाच्या कडेला बसलेल्या मुलालाहि अगदी जागेवरूनच झोडपून काढीत.

धारवाडास राहत असतां वयाच्या चौथ्या वर्षी मला एक अपघात घडला. पडवींतून एका खोलींत जाताना उंबऱ्यावर अडखळून मी पडलों आणि दारास बसविलेल्या खिळ्याचा धक्का लागून चार बोटें लांबीची खोक माझ्या डोक्यास पडली. मला ओळखण्याची ही ठळक खूण असल्यानें मला कोठेंहि फरारी होतां येत नाहीं, असा नैतिक दृष्ट्या ह्या खोकेचा मला फायदा झाला असला तरी बौद्धिक दृष्ट्या वराच तोटा आला असावा. कारण परीक्षांत मी फारसा झळकूं शकलों नाहीं. मस्तकाला हा आघात झाला म्हणूनच मी विनोदी झालों असें माझे कित्येक मित्र म्हणतात.

आमच्या लहानपणीं पुण्याला दरवर्षी प्लेगची फेरी येत असे. त्यामुळेंहि पुष्कळ प्रवास मला घडला. पुण्याला प्लेग आला म्हणून एकदां आम्ही नगरला जाऊन राहिलों तों तेथेंहि प्लेगोबानें आमचा पाठलाग केला; तेव्हां तेथून पांच कोसांवरील अकोळनेर गांवीं कित्येक महिने आम्ही काढिले. तसेंच प्लेगचे तीन हंगाम आम्ही उमरावती आणि बिलासपूर येथें चुलत्यांकडे काढिले. ह्या प्रसंगीं रात्रची रात्र आगगाडींत काढावी लागे; पण आगगाडींतील रात्रींत मी

कधींहि निजत नसें. चांदणें असो कीं अंधारगुडुप असो, खिडकींतून एकसारखें डोकें बाहेर काढून पाहत बसण्याची मला आवड असे. काळोख्या रात्रीं एंजिनांतून टोळ्याटोळ्यांनीं वाहत येणाऱ्या आणि सरतेशेवटीं रस्त्याच्या कडेला उगवलेले गवताचे पुंजके पेटवीत जाणाऱ्या ठिणग्या; स्टेशनजवळ आलें कीं निरनिराळ्या सिग्नलांतील पाचू किंवा माणकासारखे चमकणारे ते दिवे; निरनिराळ्या जनावरांच्या किंवा राक्षसांच्या आकृति धारण करून जवळजवळ येणारीं व शेजारीं येऊन पट्‌दिशी लांब पळणारीं झाडेंझुडपें-यांची शोभा पाहून माझी तृप्ति कधींच होत नसे. रात्रीच्या वेळीं अगदीं शांतता असल्यास एंजिनच्या बाजूनें सनईसारखे सूर कां ऐकूं येतात याचें मला कोडें वाटत असे. जवळपासच्या गांवांतून किंवा पुढील एखाद्या डब्यांतून हा आवाज ऐकूं येत असेल असें मला वाटे, पण त्याचा उलगडा पुष्कळ वर्षांनीं एका रेल्वे नोकरानें केला. तो म्हणाला, "हा आवाज वाफेचा असतो. वाफ सोडतांना ती कमीजास्त प्रमाणांत वेगळाल्या नळ्यांतून बाहेर पडत असल्यानें तिच्यांतून वेगळाले सूर निघतात."

१९१६ मध्यें माझा पहिला आगबोटीचा प्रवास झाला. मला दाभोळला जावयाचें होतें. पण सोबत न मिळाल्यानें डगमगत होतों. तें पाहून बापूराव करंदीकर (ज्यांच्या नांवानें दाभोळला धक्का बांधला आहे ते) माझी निर्भर्त्सना करून म्हणाले, "तुमच्यासारख्या भित्र्या तरुणांतून एखादा कोलंबस निघणें हें अगदीं अशक्य आहे." त्यांच्या टोमण्याचा परिणाम तत्काळ झाला. मी एकटाच मुंबईहून दाभोळेस गेलों. वाटेनें बोट लागली, पण मुक्काम गांठला. त्यानंतर कोंकण किनाऱ्यावर वीस-पंचवीस खेपा जलमार्गानें केल्या. पहिल्या खेपेला बोट जशी लागली तशीच पुढील प्रत्येक वेळेस लागत गेली आणि जेव्हां जेव्हां बोटीचा प्रवास टाळण्याचा कुविचार मनांत येई तेव्हां तेव्हां बापूरावांचें वाक्य आठवून बोटीनेंच गेलें पाहिजे, असा मनाचा निश्चय होई.

पांचदहा कोसांच्या बैलगाडीच्या सफरी बऱ्याच वेळां मीं केल्या होत्या, पण रत्नागिरीला नोकरी लागल्यानंतर कोल्हापूर व रत्नागिरी यांच्यामधला एकेचाळीस कोसांचा प्रवास तीन वेळां बैलगाडीनें केला. कारण त्या काळांत मोटार-वाहतूक चालू झालेली नव्हती. ह्या प्रवासाला साडेतीन दिवस लागत

असत. आणि आतां तितक्याच तासांत ही मजल मोटारनें पूर्ण करतां येते. बैलगाडीनें किंवा सायकलनें प्रवास करणें हें मोटारच्या प्रवासापेक्षां अधिक ज्ञानदायक असतें, असा माझा अनुभव आहे. बैलगाडीच्या प्रवासांत किती तरी ठिकाणें सावकाशीनें पाहून होतात आणि किती तरी ओळखी नवीन होतात.

रत्नागिरी सोडून बडोद्यास आल्यानंतर मला प्रवासाची हौस भागविण्याच्या संधया एकसारख्या मिळत गेल्या. पुण्याला घर, बडोद्याला नोकरी आणि कॉलेजच्या लांबच लांब सुट्या असल्यावर बडोदें–पुणें सफरी एखाद्या कंपनीच्या एजंटाप्रमाणें वारंवार होऊं लागल्या. महाराष्ट्र साहित्य-संमेलनाची गोडी वाटूं लागली आणि दरवर्षीं त्याच्या बैठकीला हजर राहूं लागल्यानें सर्व महाराष्ट्रभर सफरी झाल्या. पुढें नोकरींत बदल होऊन फिरतीचें काम मिळाल्यानें गुजराथ-काठेवाडच्या कोनाकोपऱ्यांत हिंडावयास मिळून ह्या प्रांताचा गाढ परिचय झाला. ऐतिहासिक परिषदा हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत दरवर्षीं भरतात आणि बडोदें सरकारचा प्रतिनिधि ह्या नात्यानें त्यांस हजर राहण्याची अनुज्ञा मिळाल्यानें हिंदुस्थानच्या वेगळाल्या प्रांतांतहि मला फिरतां आलें.

प्रत्यक्ष फिरण्यांत जी माहिती मिळत नाहीं ती सहप्रवाशांशीं संभाषण करून किंवा तेथील मार्गदर्शक पुस्तकें वाचून मिळविण्याची संवय मीं ठेविली आहे. आगगाडीचें वेळापत्रक हें मला भगवद्गीतेपेक्षां पारायणार्ह वाटतें. जेथें जेथें आपण हिंडलों असूं त्या त्या रस्त्यांचीं वेळापत्रकें मी इतक्यांदा वाचतों कीं, मुंबई प्रांतांतील तिन्ही लोहमार्गांवरील सर्व स्टेशनांचीं नांवें अंतरासह मला पाठ म्हणून दाखवितां येतात. " वेळापत्रक पुनः पुनः काय वाचीत बसलां आहां ? " असें कोणीं म्हटल्यास मी उत्तर देतों, " गीता, धम्मपद किंवा तुकारामाचे अभंग यांपेक्षा किती तरी व्यवहार आणि सत्य ह्या वेळापत्रकांत सांठलेलें आहे ! "

ह्या पुस्तकांतलीं सर्व अंतरें कोसांत दिलेलीं आहेत. इंग्रजी दोन मैलांचा कोस धरलेला आहे. दुसरा विशेष असा की, गांवांच्या नांवांचे उच्चार इंग्रजी स्पेलिंगप्रमाणें न करतां शुद्ध उच्चार दिलेले आहेत. पोर्तुगीज भाषेनें पुष्कळ गांवांच्या नांवांच्या शेवटीं म् किंवा न् कोंबून दिलेले आहेत. वसईचें बसीन्, पणजीचें पंजिम्, कोचीचें कोचीन आणि कुमारीचें कॉमोरिन्. इंग्रजी भाषेनें

सेलम् गांवाला सालेम्, वर्धमानला बरद्वान, ढाक्याला डाक्का, चितगांवला चित्तागांग, कारवाडला कारवार आणि बेंगळूरला बँगलोर बनविलें आहे. भूगोलकर्ते आणि ज्ञानकोशकर्ते हे इंग्रजीचा तरजुमा करणार. तेव्हां त्यांनीं स्पेलिंगानुसारी उच्चार लिहावे हें साहजिक आहे. मीं शुद्ध उच्चार देण्याची दक्षता बाळगली आहे आणि त्यांतूनहि चूक आढळल्यास वाचकांनीं निदर्शनास आणावी अशी माझी विनंति आहे.

माझ्या समुद्रपर्यटनाची अभागी कहाणी सांगून ही प्रस्तावना पुरी करितोंः—

बोट सुटण्याची घंटा झाली. आपण आपल्या आवडत्या मातृभूमीपासून कांहीं काळ तरी दूर जाणार, ह्या कल्पनेनें माझें हृदय व्यथित झालें. मला पोंचवावयास आलेले सुहृज्जन "संभाळून जा बरं अन् गेल्याबरोबर पत्र पाठीव" असें बजावून फळीवरून खालीं उतरले. बोटीनें आपला गंभीर भुंगा वाजविला आणि फळी काढून घेण्यांत आली. गडगडगडगड अशा आवाजांत नांगर वर घेण्यांत आला आणि बोट मुंबई बंदर सोडून दक्षिणेस जाऊं लागली. मी बोटीच्या उजव्या अंगास पडून राहिलों. कारण मळमळ वाटूं लागली होती. मधूनमधून डोळे उघडून पाहतांच क्षितिजापर्यंत फेसाळ पाणी आणि त्यावर तरंगणाऱ्या मच्छीमार होड्या ह्यांशिवाय कांहीं दिसत नव्हतें. मातृभूमीच्या दर्शनाला आयुष्यांत प्रथमच आंचवलों होतों. अर्थातच माझें दुःख अनिवार होतें. आणि अशा स्थितींत चार तास मी कष्टानें काढिले. इतक्यांत बोटीनें भुंगा वाजविला आणि गडगड आवाज सुरू झाला. टिरिंग टिरिंग करणाऱ्या विजेच्या घंटेनें ईंजनियर आणि कप्तान यांची भाषा चालू झाली. एक खलाशी मजजवळ आला आणि म्हणाला, "उठा भाऊ, हरणई बंदर आलं." मीं उठून आपली वळकटी खलाशाजवळ दिली, आणि बोटीशीं खेटून लागलेल्या हरणईच्या पडावांत पाय टाकिला; कारण मला हरणईलाच जायचें होतें.

रजा घेण्यापूर्वी एकच मिनिट—जुनागडच्या सफरींत राहिलेली नजरचूक दुरुस्त करूं या. पान ३३ वर "नॉर्थकोट ढाल पहिल्यानें मिळाली" असें लिहिलें आहे तेथें "गायकवाड कप आम्हांला मिळाला" असें पाहिजे.

दांडिया बाजार,<br>बडोदें.

**चिंतामण विनायक जोशी**

# कॉन्टिनेन्टल् प्रकाशन, पुणें २

—प्रकाशित—

नाद–निनाद (श्री. कवठेकर) १॥
स्वाति (श्री. सरदेसाई) १॥
नवा प्रातःकाल (श्री. खांडेकर) २॥
चांदण्यांतील सांवल्या (कवठेकर) २॥
कलावंतांच्या सहवासांत (धनंजय) ३
नीलेचा दिलरुबा (सौ. नाशिककर) २
भंगलेली मूर्ति (श्री. चिरडे) २
मोगरीचा गजरा (श्री. वैद्य) १॥
प्रकाशांतील व्यक्ति (श्री. पाध्ये) १॥
घरकुल (श्री. काणेकर) १।
बेबीचा भाऊ (श्री. बोकील) ३
मामा (श्री. ताम्हनकर) १॥
काळी मेहुणी (श्री. काणेकर) १॥।
साडेतीन शहाणे (श्री. बोकील) ३
जीवन-साहित्य (श्री. माडखोलकर) २॥
जीवन आणि समाज (कालेलकर) १॥।
शालन् (श्री. कवठेकर) ३
मंदा (श्री. कवठेकर) २
चिमखडे (श्री. बोकील) २॥
गोड ललकाऱ्या (श्री. रानडे) १॥
पहिल्या-वहिल्या (श्री. खांडेकर) २।
पूजन (श्री. खांडेकर) २॥
बसंत (श्री. बोकील) ३
अमोल गोष्टी (साने गुरुजी) २
धोंड्याचे कळे (श्री. शामराव ओक) २।
मी वाट पाहीन! (श्री. आपटे) २।
आमचे हे (श्री. ताम्हनकर) ३
संचार (चिं. वि. जोशी) २॥

—आगामी—

'तो' (श्री. ना. धों. ताम्हनकर)
एकटी (श्री. ना. ह. आपटे)
'??—' (श्री. खांडेकर)
हा आमचा संसार (श्री. कवठेकर)
गुन्हा ( ,, )
श्री ( ,, )
भाऊ भाऊ [वसंत] (श्री. बोकील)
'??—' (श्री. माडखोलकर)
नेपोलियन (श्री. मा. गो. काटदरे)

## आमचीं इतर पुस्तकें

टाकीचे घाव (प्रो. फडके) २
गुलाबाच्या पाकळ्या (कवठेकर) १॥
अत्रे उवाच (आचार्य अत्रे) २
साहित्यिकांची सफर (य. गो.) १॥
चिमण्या (डॉ. कमलाबाई देशपांडे) १
वळणाचें पाणी (श्री. कांबळे) १॥
माझे आवडते लेखक (श्री. माडखोलकर) १॥
फडक्यांच्या शब्दांत फडके १॥
मधुर चिजें (जी. एस्. पाटणकर) १।
साहित्याचें मूलधन (कालेलकर–चोरघडे) १।

# अनुक्रमणिका


१. विजापूर ... ... ९

२. पुळ्याचा गणपति ... २१

३. आमची जुनागडची सफर ... ३०

४. बडोद्यांतील जलप्रलय ... ४३

५. उत्तर काठेवाडचा प्रवास ... ५९

६. कॉलिकात्याचा पॉरिचय ... ७६

७. महाराष्ट्राच्या छपरावर ... ८९

८. दक्षिण दर्शन ... ... १०१

# विजापूर : : : : १

रिप व्हॅन विंकल नांवाचा एक अमेरिकन मनुष्य अठरा वर्षे निद्रिस्तावस्थेंत एका डोंगरावर राहिला व पुनः परत गांवीं जाऊन पाहतो तों सर्व गांवांत नाना तऱ्हेचे फेरबदल झालेले व सुधारणा झालेल्या नजरेस पडून तो अगदीं भांबावून गेला. जुन्या वातावरणांतून एकदम नव्या वातावरणांत पडल्यानें त्याची जी स्थिति झाली त्याच्या बरोबर उलट स्थिति विजापूर पाहणाऱ्या प्रेक्षकाच्या अनुभवाला येते. एखाद्या उंच ठिकाणीं उभें राहिलें म्हणजे ठिकठिकाणचे उंच बुरूज, मशिदी, मुसलमानी वाडे व सर्वांवर हुकमत चालविणारा प्रचंड व उंच गोलघुमट पाहून आपण दोनशें वर्षांपूर्वीच्या मुसलमानी राज्यांतच आहों कीं काय, असा भास होऊं लागतो. ज्या ठिकाणीं बादशहानें नजर केलेल्या पोषाखाचा धिक्कार बालशिवाजीनें केला, जेथें शहाजीला अंधारकोठडींत गुंतवून " मुलाच्या दांडगाईचा बंदोबस्त कर, नाहीं तर भिंतींत चिणून टाकीन " असा बादशहानें त्याला हुकूम केला आणि जेथून शिवाजी महाराजांचें पारिपत्य करण्यास अफझुलखान आणि शाहिस्तेखान यांच्यासारखे सरदार निघाले त्याच शहरांत आपण उभे आहोंत हा विचार मनांत घोळत असतां नवीन दगडी इमारतींकडे दृष्टि जाऊन प्रवासी ठिकाणावर येतो.

१९१४ सालीं हें शहर पाहण्यास मी पुण्याहून रात्रीं २ वाजतां मद्रास मेलनें निघालों. सकाळीं ९ वाजतां हुडगी स्टेशनावर गाडी बदलून म. स. म. रेल्वेच्या संथपणें चालणाऱ्या गाडींत जाऊन बसलों. रूक्ष व रखरखीत, निर्वृक्ष व निर्जल प्रदेशांतून ळकारपूर्ण कन्नड भाषेचे आघात कानांनीं सहन करीत चार तास काढावे लागले. हुडगीहून वीस कोसांवर (ह्या पुस्तकांत सर्वत्र कोस दोन मैलांचा धरलेला आहे) गाडी एका उंचवट्यावर आली तेव्हां दक्षिण क्षितिजावर गोलघुमट शहामृगाच्या अंड्यासारखा दिसूं लागला. हलकें हलकें इतर लहान इमारती एकामागून एक दृष्टिपथांत येऊं लागल्या आणि दुपारीं एक वाजतां विजापूर स्टेशन लागलें. हें हुडगीहून तीस कोसांवर आहे.

स्टेशनवर पुण्याचे प्रो. नारायणराव उडगीकर भेटले. हे माझ्या मामांचे निकट मित्र असल्यानें त्यांनीं माझी चौकशी केली. 'केमभावी नांवाच्या गृहस्थांच्या घरीं मी उतरणार आहें व तूं माझ्याबरोबरच तेथें ये' असें त्यांनीं सांगितल्यावरून मी त्यांच्याबरोबर गेलों. केमभावी यांचा वाडा भव्य आणि कुटुंब मोठें होतें. प्रो. उडगीकर हे लग्न जमविण्यास तेथें आले होते. आणि लग्न जमविण्याचें काम सुरळीतपणें पार पडलें. मी व्याह्यांचा पाहुणा असल्यानें माझी बडदास्त उत्तम रीतीनें राहिली. लग्नाच्या वाटाघाटी चालू असतां एक गमतीदार प्रकार मला दिसला तो असा कीं, वाटाघाटी कानडींत होत होत्या आणि जेव्हां एखादा करार लेखी करावयाचा असेल तेव्हां तो मराठींत लिहिला जात होता. कानडी ही भाषा खरी, पण सांस्कृतिक भाषा मराठी असा त्या वेळीं देखावा दिसून मला साहजिकपणेंच फार अभिमान वाटला.

कलाकुसरीचा बारीक अभ्यास केल्याशिवाय विजापूरच्या इमारती ओळ-खल्या पाहण्यास एक दिवस पुरे होतो. एका तरुण केमभावीबरोबर मी त्यांच्याच टांग्यांतून दुपारीं इमारती पाहण्यास निघालों. प्रथम गोलघुमटाकडे आमचा मोर्चा फिरला. ही सर्व विजापुरांत भव्य व मनावर ठसा उमट-विणारी इमारत स्टेशनजवळ आहे. महमद आदिलशाह या बादशहाच्या थडग्याकरितां ती बांधिली आहे. त्याच्या कारकीर्दींत विजापूरचें कलाकुसरीचें काम शिखरास पोंचलें. असार महाल यानेंच बांधिला. ज्या बादशहानें गादीवर

बसतांच आपल्या थडग्याकरितां ही भव्य इमारत बांधण्यास सुरुवात केली त्याला रंगेल म्हणावें कीं विरक्त म्हणावें हा प्रश्नच आहे. हा घुमट फार मोठा असेल असें लांबून वाटत नाहीं; पण जसजसें जवळ जावें तसतसा त्याचा प्रचंडपणा डोळ्यांत भरतो. इमारतींत शिरतांना प्रथम नगारखान्यांतून जावें लागतें. हल्लीं यांत जवळपास सांपडलेल्या शिला व इतर ऐतिहासिक वस्तूंचा संग्रह केला आहे. नगारखान्यांतून आवारांत शिरल्यावर ही शंखाकृति पांढरी सफेत इमारत ऊर्ध्व दृष्टि करून पाहावी लागते. वरती एक जंगी अर्धवर्तुलाकार घुमट व चार कोपऱ्यांशीं चार सातसात मजली मनोरे आहेत. या प्रत्येक मजल्याच्या खिडकींत मनुष्य ताठ उभा राहूं शकतो. मुख्य दालनांत एक उंच ओटा असून त्यावर सुलतान महमदाचा नातू, बायको आरासबिबी, स्वतः सुलतानसाहेब, त्यांची राख रंभा, मुलगी व थोरली बायको यांचीं दर्शनी थडगीं ओळीनें बसविलेलीं आहेत व खरीं थडगीं नेमकीं त्यांच्याखालीं भुयारांत आहेत. बारा ज्योतिर्लिंगें देखील अशाच प्रकारें दर्शनी वेगळीं आणि खरीं वेगळीं आहेत. हें पद्धतिसादृश्य विचार करण्यासारखें आहे. पुरुषांच्या थडग्यावरील बारीक ओटा अर्धवर्तुळाकार आणि बायकांच्या थडग्यावरील चौकोनी असतो.

गोलघुमटाच्या चारी कोनांस एकेक मनोरा आहे. प्रत्येक मनोऱ्यावर जाण्यास एकेक नागमोडी जिना आंतील बाजूनें रचिलेला आहे. मी एका जिन्यानें वर गेलों आणि घुमटाच्या खालील सज्ज्यांत पोंचलों. या वाटोळ्या सज्ज्यांत उभें राहून खालीं थडग्यांकडे पाहूं लागतांच खोल असलेली जमीन दिसून डोळे फिरून येतात व चुकून आपण खालीं पडलों तर शरीराच्या चिंधड्या होऊन आपल्यालाहि थडग्यांतच जाण्याची पाळी येईल कीं काय, अशी भीति वाटते. ह्या घुमटानें व्यापिलेली आणि कोणताहि टेका नसलेली जागा अठरा हजार तीनशें सदतीस चौरस पावलें ( फूट ) आहे. पृथ्वींतील सर्व घुमटांत हा मोठा आहे; याच्या खालोखाल रोमचा पॅन्‌थिअन्‌चा घुमट १५८३३ पावलें जागा व्यापतो असें तेथें लावलेल्या पुराणवस्तु खात्याच्या पत्रकावरून समजलें.

ह्या सज्जाचा विशेष चमत्कार म्हणजे तेथें निघणारे आवृत प्रतिध्वनि हे

होत. सज्जांत पाऊल टाकतांच आपल्या पावलांचा पडसाद ऐकूनहि चमत्कार वाटतो. एका माणसानें जरी टाळ्या वाजविल्या तरी एखादी सभा बरखास्त झाल्यावर ज्याप्रमाणें टाळ्यांचा गजर होतो त्याप्रमाणें त्या टाळ्यांचा प्रतिध्वनि होतो.

एकदां खाकरलें कीं पांच सात टारगट पोरें सगळ्या बाजूंनीं आपणास वेडावून दाखवीत आहेत असें वाटतें. समोरासमोर दोन माणसांस एकमेकां-पासून सव्वाशें पावलांवर उभें राहून कानगोष्टी करितां येतात आणि मनगटा-वरच्या घड्याळाची टिक् टिक् तितक्याच अंतरावरून स्पष्ट ऐकूं येते. एकट्या दुकट्यास येथें आणून सोडलें तर तो खात्रीनें भुताटकीचा खेळ समजून घाबरून जाईल!

सज्जाबाहेरील खिडक्यांतून सर्व शहराचा देखावा पाहतां येतो. प्रतिध्वनीचे चमत्कार इतर प्रेक्षकांच्या सहकार्यानें यथेच्छ अनुभवल्यानंतर मी खालीं उतरलों. चौथऱ्यापासून घुमटावरील कळसापर्यंतची ह्या इमारतीची उंची १९८ पावलें आहे. सज्जापासून जमिनीपर्यंत दोरी टाकल्यास ती १०९ पावलें लांबीची होते. ही इमारत जशी भव्य आहे तशी नक्शीदार असती तर तिला ताजमहालाची कीर्ति मिळाली असती.

गोलघुमटाची भव्यता आणि चमत्कृतिजनकता यांच्यायोगें थक्क झालेल्या अंतःकरणानें त्याची रजा घेऊन जुम्मामशिदीकडे जाण्यास निघालों. विजा-पुरांतील या मुख्य मशिदीच्या हद्दींतील जागा इतर इमारतींच्यापेक्षां विस्तीर्ण आहे. हिच्या आढ्याखालीं दांडगे चौकोनी खांब असून त्यांच्यायोगें सबंध दालनाचे, लांबीस नऊ व रुंदीस पांच असे पंचेचाळीस खण झाले आहेत. महिरपीशिवाय आंतील बाजू अगदीं साधी आहे आणि या साधेपणानें मशिदीस अधिक गंभीरत्व आलें आहे. भिंतींस व खांबांस शुभ्रवर्ण दिला आहे. मागील व बाजूच्या भिंतीस खूप उंचीवर खडे बसविलेल्या लहान लहान खिडक्या आहेत. महिरपीसमोर जाड पडदा टाकलेला असतो. तो दूर करतांच आंतील सुंदर देखावा दृष्टीस पडतो. रंगीत पृष्ठभागावर सोनेरी शाईनें मनोरे, धूपदाण्या, सांखळ्या, पुष्पगुच्छ व पोथ्या यांच्या झोकबाज आकृत्या काढून त्यांत फारशी अक्षरें लिहिलेलीं आहेत. मशिदीच्या भुईवर काळ्या रेघांनीं एक एक मनुष्यास

निमाज पढण्याकरितां ऐसपैस बसून पुढें पुस्तक ठेवितां येईल इतकी रुंद जागा आंखून दिली आहे. अशा २२५० जागा ह्या दालनांत आहेत. ह्यावरून दालनाच्या मोठ्या आकाराची कल्पना येईल.

बाहेरील बाजूची आगाशी व घुमटाच्या खालील नकशीदार बारादरी यांच्यायोगें ह्या मशिदीस विशेष शोभा आली आहे. वरती मोठी गच्ची असून तेथें जातां येतें. या मशिदीचा घुमटहि फार मोठा असून त्यावर उंच कळस आहे. सर्व दक्षिण हिंदुस्थानांत इतकी मोठी मशीद दुसरी नाहीं.

जुम्मामशीद आणि तटाचा दरवाजा यांच्यामध्यें मेहेतर महाल ही छोटी पण सुरेख इमारत आहे. ही इमारत एका मशिदींत जाण्याचें प्रवेशद्वार असून तिजवर माडी व सज्जे आहेत. एखाद्या यजमानापेक्षां त्याचा गाडी-वालाच अधिक रुबाबदार दिसावा त्याप्रमाणें आंतील मशिदीपेक्षां तिचें प्रवेश-द्वार अधिक सुबक आहे. ह्या चौकोनी उंच महालाच्या दोन कोपऱ्यांस दोन मनोरे आहेत. भिंतीच्या पुढें बसविलेल्या सिंहपंजरांस तसेंच दरवाजास फार सुंदर नक्षी केलेली आहे. हा महाल नेहमीं बंद असतो आणि त्याची चावी प्रेक्षकांस एक्झीक्युटिव्ह एंजिनिअरच्या ऑफिसांतून आणावी लागते. या अडचणीमुळें मला आंत जाऊन पाहतां आलें नाहीं.

छोट्या मेहेतर महालाच्या सौंदर्याचें कौतुक करीत टांग्यांत बसलों व थोड्याच वेळांत प्रचंड असार महालाचें दर्शन होऊन मन थक्क झालें. सौंदर्य-शास्त्रांत वर्णिलेल्या सौंदर्य-भावनेचा अनुभव मेहेतर महालाच्या आणि भव्यता-भावनेचा अनुभव गोलघुमट किंवा असार महालाच्या दर्शनानें घडतो. ह्या महालांतील एका खोलींत महंमद पैगंबर यांच्या दाढीचे दोन केस जतन करून ठेविले आहेत अशी आख्यायिका आहे. कांहीं काळापूर्वी त्या खोलींत शिरून चोरांनीं आंतील सामान अस्ताव्यस्त करून टाकिलें होतें. त्यांच्या तावडींतून त्या केसांची सुवर्णमंजूषा सुटली आहे किंवा नाहीं हें तेथील रखवालदार व फकीर सांगूं इच्छीत नाहींत.

ह्या महालाचा तळमजला म्हणजे एक मोठा दिवाणखाना असून त्याच्या मागील अर्ध्या भागांत दुसरा ( मुंबईच्या भाषेंत पहिला ) मजला केला आहे व त्यावर दोन लंब चौकोनी खोल्या आहेत. माडीवर ८१ × २७ पावलें

आकाराचें सुंदर दालन आहे. याच्या पूर्वेकडील दारानें बाहेर आलें म्हणजे एक सज्जा लागतो. त्यांतून खालील भव्य दिवाणखाना नजरेस पडतो. या सज्जाच्या तीन दारांवर फार सुबक नक्षी केली आहे. सज्जाच्या दक्षिणेस एक फार चित्र-विचित्र असें रंगीत दालन आहे. त्याच्या भिंतीवर एक फुलें व पानें यांनीं प्रफुल्ल असलेल्या निळ्या वेलाचीं वेष्टणें रंगविलीं आहेत. कोनाड्यांत पुष्पगुच्छ व फुलदाण्या काढल्या असून पटई व तुळयांवर भरपूर नक्षीकाम केलें आहे. याच्या शेजारच्या खोलींतहि बरेंच चितारकाम आहे, पण तें औरंगजेबाच्या विध्वंसक हातानें छिन्नविछिन्न झालें आहे. माडीवरून खालीं आलें म्हणजे जिन्याच्या पायथ्याच्या डाव्या बाजूस पूर्वीचा किताबखाना लागतो, त्यांतील ग्रंथ औरंगजेबानें नेले.

मुख्य दिवाणखान्याची पटई झेपण्याकरितां मागाहून दोन कमानी लाविल्या आहेत. त्यामुळें त्याची शोभा फार कमी झाली आहे; पटईच्या पुढील बाजूस चार प्रचंड सागवानी खांब आहेत. इतके मोठे व उंच लांकडी खांब क्वचितच दृष्टीस पडतात. महालापुढें चौकोनी तलाव आहे. तो नेहमीं पाण्यानें भरलेला असतो; वरील भव्य महालाचें प्रतिबिंब त्यांत पाहून मजा वाटते.

हा महाल सोडून ताजबावडीकडे जाणाऱ्या रस्त्यानें निघाले असता वाटेंत दोन ठेंगणे पण खूप जाड वृक्ष लागतात. हल्लीं त्यांपैकीं एकच जिवंत आहे; त्याचा बुंधा दहा माणसांच्या कवळींतहि मावणार नाहीं. या झाडास ॲडोसोनिया ( गोरखचिंच ) म्हणतात; ही आफ्रिकेंतून आणली होती. या झाडाजवळच जोडघुमट नांवाच्या दोन इमारती आहेत. या समोरासमोर असून सारख्या असल्यानें यांस वरील नांव प्राप्त झालें आहे. इंग्रजींत यांस "दोन बहिणी" हें नांव आहे. या दोन बहिणींचें स्वरूप दहाजणींपेक्षां अधिक चांगलेंसें नसल्यामुळें त्यांस पाहण्याकरितां न थांबतां तडक ताजबावडीस येणें चांगलें. ताजबावडी हा तलाव १६२० त ताज सुलतानेच्या सन्मानार्थ बांधिला. ह्याच्या प्रवेशवाटिकेवर ३५ पावलें लांबीची उंच कमान असून तिच्या दोन बाजूंस दोन अष्टकोनी मनोरे, वर घुमट असलेले, असे आहेत. या मनोऱ्यांत म्युनिसिपालिटीचीं ऑफिसें आहेत, असें वाटाड्यानें सांगितलेलें पुसट आठवतें. कमानीखालून आंत उतरलें म्हणजे तलावाच्या चारी बाजूंस

असलेल्या रुंद पायऱ्या लागतात. त्या पायऱ्याच्या आंत कोठें संपतात कोण जाणे! तलाव चौकोनी असून त्याची प्रत्येक बाजू २२३ पावलें आहे. समोरील तिन्ही बाजूंच्या मध्यावर खोल्या केल्या आहेत, त्यांपैकीं एका खोलींत विष्णु-पंचायतन ठेविलें आहे. तलावावर मोटा होत्या, आतां त्या चालू नाहींत.

अदालत, आराष आणि आनंद हे तीन महाल युरोपियन अधिकाऱ्यांस राहण्यास दिले असल्यानें ओळखीशिवाय त्यांत प्रवेश होत नाहीं. आनंद महालाच्या पश्चिमेस गगन महाल अथवा सभागृह आहे. ह्या महालाच्या प्रवेशद्वारावरील टोलेजंग कमान पाहण्यासारखी आहे. तिच्या दोन बाजूंस आणखी दोन लहान कमानी आहेत. हा महाल आदिलशाह ह्यानें १५६१ त बांधला, असें तेथील पत्रकावरून कळतें. आंतील बाजूस दरबार भरण्याचा भव्य दिवाणखाना आहे. दिवाणखान्यावर दोन मोठ्या लांकडी खांबांवर आधारलेलीं जनानी दालनें होतीं. तीं दालनें आतां नसून तिकडे जाण्याचे जिने मात्र शाबूत आहेत. 'काप गेले आणि भोंकें राहिलीं!' सभागृहाच्या मध्यभागीं ६० पावलें घेराची कमान सभागृहांत खांब टाकण्याची पाळी येऊं नये म्हणून बांधलेली आहे. शिल्पज्ञांच्या मतें ती फारच ठेंगणी झाली आहे. विजापूरच्या बादशहांनीं ह्याच दरबारांतील सिंहासनावर बसून महाराष्ट्र आणि कर्नाटक प्रांतांवर राज्य चालविलें व शेवटीं दिल्लीपतीनें ह्याच ठिकाणीं त्यांच्या-कडून शरणचिठ्ठी घेतली.

गगन महालाशेजारीं सातमजली राजवाडा आहे. हल्लीं ह्याच्या सात मजल्यांपैकीं पांच कायम आहेत. ह्यांची उंची १०० पावलें आहे. हा वाडा दुसऱ्या इब्राहिमनें १५८३ त बांधिला. पूर्वी तो फारच मोठा होता असें पडक्या भिंताडांवरून (म्हणजे पडकीं भिंताडें पाहून किंवा त्यांच्यावर उभें राहून) अनुमान करितां येतें. ह्याच्या निरनिराळ्या मजल्यांवर नळ आणि कारंजीं आहेत. भिंतींवर रंगविलेल्या चित्रांपैकीं एकाच चित्राची पार्श्वभूमि अवशिष्ट राहिली आहे. तेथें इब्राहिमाची आवडती स्त्री रंभा हिचें सोन्याच्या वर्खाचें चित्र होतें, व तो वर्ख मराठे लोकांनीं खरवडून नेला म्हणतात. इमारतीचें लांकडी काम लुटून नेलें असल्यानें हिच्यांत शोभिवंत असें कांहींच राहिलें नाहीं. तिचे जिने इतके अरुंद व ठेंगणे आहेत कीं, लठ्ठ माणसास

त्यांतून खालींवर जातां येत नाहीं. सातमजलीवरून शहराचा देखावा चांगला दिसतो. इमारत उतरून खालीं आल्यावर मोठें पटांगण लागतें. पटांगणाच्या दुसऱ्या अंगास चिनी महाल नांवाचा लांब, रुंद आणि उंच दिवाणखाना आहे. त्याच्यावर खोल्यांच्या रांगा असून त्यांत जिल्ह्याचीं ऑफिसें आणिलेलीं आहेत.

इतकीं स्थळें पाहतां पाहतां संध्याकाळ झाली आणि मी आमच्या यजमानांच्या घरीं परत गेलों. रात्रीं स्वप्नांत सर्व इमारतींच्या दर्शनाची उजळणी झाली. बादशहा, सरदार, राजे ह्यांच्या दरबारासहि मीं स्वप्नांत भेट दिली. गगनमहालांत बालशिवाजी सिंहासनस्थ बादशहानें दिलेलीं वस्त्रें धिःकारपूर्वक नाकारतो आहे असें दृश्य मला झोंपेंत दिसलें. स्वप्नयुक्त झोंपेंतूनच जागा झाल्यावर सकाळचीं सर्व कामें उरकलीं आणि राहिलेलीं ठिकाणें पाहण्यास निघालों.

प्रथम विजापुरांतील सर्वांत मोठी तोफ लांडा कसाब ही पाहिली. ह्या तोफेची लांबी २२ पावलें आणि हिच्या तोंडाचा व्यास ४।। पावलें असून हिचें वजन ६६ खंडी असावें असा अंदाज तेथें लाविलेल्या पत्रकावर होता. ह्या तोफेपासून थोडया अंतरावर उंचवटे आहेत. औरंगजेबानें स्वारी करते वेळीं तोफा डागण्यासाठीं बांधलेले हे मोर्चे आहेत. लांडा कसाब तोफेवर आणि तिच्या मोर्च्यावर त्याच्या तोफांच्या गोळयांच्या खुणा अजून दिसतात. ही तोफ पाहिल्यानंतर शहरच्या पश्चिम तटावरील सर्वांत मोठ्या बुरुजावर लांडा कसाब तोफेपेक्षां मूर्तीनें लहान पण कीर्तीनें थोर अशी मुलूख-इ-मैदान तोफ पाहण्यास गेलों. ही कोणत्या तरी मिश्र धातूची अहमदनगर येथें सन १५४९ त ओतविली आहे. ह्या तोफेच्या तोंडाशीं दोन बाजूंस दोन हत्ती कोरले आहेत. हिची लांबी लांडा कसाबपेक्षां चार पावलांनीं कमी असली तरी हिच्या तोंडाचा व्यास पांच पावलें आणि काना अडीच पावलें व्यासाचा आहे. हिच्या तोंडांत मोठा मनुष्य सहज बसूं शकतो आणि मुलें उभीं राहूं शकतात. हिचीं छायाचित्रें हिच्या तोंडांत मनुष्य बसवूनच काढिलीं जातात. तोफेच्या मागील बाजूस एक खळगा खणलेला आहे, गोलंदाजानें तोफ डागल्यावर धक्का बसूं नये म्हणून पाण्यांत बसण्याकरितां तो केला

आहे असें सांगतात. ही तोफ आंत गोळा घालून अशी एकदांच उडविली होती आणि त्या वेळीं गोलंदाज धक्क्यानें ताबडतोब मेला, पुष्कळ घरें पडलीं आणि कित्येक बायकांचे गर्भपात झाले अशी आख्यायिका आहे. विजापूरचें नांव गोलघुमट आणि मुलूख-ई-मैदान ह्या दोन गोष्टींकरितांच विशेष प्रसिद्ध आहे. ही तोफ पाहून मी उपली बुरुज पाहण्यास गेलों. उपली म्हणजे गवरी. एका गवरीवाल्या बाईनें आपल्या पैशानें हा बांधिला अशा आख्यायिकेवरून ह्याला हें नांव पडलें आहे. हा बुरुज तटाला लागून नाहीं, तर मनोऱ्यासारखा स्वतंत्र बांधिलेला आहे. ह्याच्यावर दोन लांब आकाराच्या तोफा आहेत. त्यांपैकीं एक ३० पावलें लांबीची तोफ लोखंडाचीं वाटोळीं कडीं एकमेकांस चिकटवून तयार केली आहे.

शहरच्या पश्चिमेस असलेला इब्राहिम रोझा पाहावयाचा राहिला होता. उंच जोत्यावर व चौकोनी भिंतींच्या आंत समोरासमोर उभ्या असलेल्या दोन सुंदर इमारतींचें हें नांव आहे. दोन इमारतींच्या मध्यें कारंजें आणि भोंवतीं हिरवें कुरण आहे. तेथें पूर्वी शाही बगीचा होता. पूर्वेकडील इमारतींत दुसरा इब्राहिम, त्याची राणी ताजसुलताना व कुटुंबांतील इतर चार माणसांचीं थडगीं आहेत. ज्या गाभाऱ्यांत थडगीं आहेत. तो चौकोनी असून त्याच्या चारी भिंतींच्या मध्यावर दारें आहेत. भिंतींच्या दगडांत सुंदर खिडक्या कोरलेल्या आहेत. ह्या गाभाऱ्याची दगडी पटई शिळा एकमेकींशेजारीं बसवून खांबाच्या आधाराशिवाय तयार केलेली पाहून प्रेक्षक चकित होऊन जातात. गाभाऱ्याच्या बाहेरील पडवींत हिंदु कारागिरीचे खांब लाविले आहेत. ताज सुलताना मेल्यानंतर तिला पुरण्याकरितां तिच्या प्रेमळ पतीनें हें मंदिर १६२६ मध्यें बांधिलें, पण सुलतानेच्या अगोदर बिचारा स्वतःच पैगंबरवासी झाला आणि थडग्यांत पडून तिची वाट पाहूं लागला.

रोझ्यासमोर असलेली मशीद, तिचे खोल खोदलेले झोकदार कंगोरे आणि डौलदार कळस यांकरितां प्रसिद्ध आहे. हिच्या कंगोऱ्यांपासून खालीं जड दगडी साखळदंडाचे तुकडे लोंबत राहिले आहेत. ह्या साखळदंडाच्या दुव्यांत सांधा कोठेंहि दिसत नाहीं. अर्थात् प्रत्येक साखळदंड एकाच दगडाचा कोरून तयार केला असला पाहिजे असें स्पष्ट होतें. म्हैसूरच्या नव्या राजवाड्याच्या

बाहेरील भिंतीस देखील असे नवे साखळदंड टांगलेले माझ्या पाहण्यांत आले. त्यावरून ही कला जिवंत आहे असें दिसतें.

सर्व शहराभोंवतीं कोट आहे. कोटाच्या भिंतीच्या दोन बाजूंस दगडी थर असून मध्यें माती दाबून भरली आहे. भिंतीस लागून ठिकठिकाणीं बुरूज आहेत. त्यांवर तोफा ठेवण्याकरितां फरशा केल्या आहेत. भिंतीशेजारचा खंदक आणि शहरांतून बाहेर येण्याची गुप्त वाट यांचे अवशेष कोठें कोठें दिसतात. कोटाचा परीघ ३ कोस आहे. कोटाला पांच वेशी आहेत. अर्धा कोस परिघाचा आंतला कोट अमीर-उमरावांच्या वाड्यांकरितां बांधिलेला होता. ह्या आंतल्या कोटाला आरकिल्ला असें नांव होतें. पूर्वी तोरवे व बेगम तलाव ह्या दोन तलावांपासून पाणी नळानें आणवून शहरांतील तलावांत सोडलें होतें. हल्लीं शहरांतील तलावांत पाणी क्वचितच असतें. गांवांत नळ झाले आहेत आणि प्रतिदिवशीं तब्बल दोन तासपर्यंत पाणी मिळूं शकतें !

शहर पाहून झालें आणि मीं यजमानांचा निरोप घेऊन कर्नाटकांतील दक्षिण भाग पाहण्यास आगगाडीनें विजापूर सोडिलें.

विजापूरसंबंधीं ऐतिहासिक माहिती मिळते ती अशीः—

ह्या गांवाचें मूळचें नांव विजयपूर असें होतें आणि तें चालुक्य राजांच्या ताब्यांत होतें, असें शके ९९६ त खोदलेल्या एका शिलालेखावरून दिसतें. चालुक्यांकडून तें यादवांच्या आणि त्यांच्या ताब्यांतून मुसलमानांकडे तें गेलें. पुढें बेदरच्या बादशहाचा युसफ सुभेदार ह्यानें युसफ अदिलशाह हें नांव धारण करून स्वातंत्र्य प्रस्थापित केलें. त्याच्या वंशांतील नववा बादशाह शिकंदर ह्याच्या हातून औरंगजेबानें सगळें आदिलशाही राज्य जिंकून घेतलें. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निजाम, पेशवे आणि सातारकर छत्रपति हे विजापूरचे मालक झाल्यावर १८४८ पासून तें इंग्रजांकडे आलें. बादशाही अमलांत ज्याची वस्ती वीस लक्षांपर्यंत गेली होती व जें संपत्तीचें आगर होतें, त्याच शहरांतील रस्त्यांत निवडुंग पसरला; अमीर-उमरावांच्या रंगमहालांत कोल्हीं-कुत्रीं, डुकरें व गाढवें जाऊन धुमाकूळ घालूं लागलीं. ही स्थिति पाहून विजापूर हें जिल्ह्याचें ठाणें केल्यास ही दुर्दशा संपेल, असें वाटून सरकारनें

कलादगी जिल्हा मोडून विजापूर जिल्हा केला, रस्ते साफ केले, इमारती दुरुस्त केल्या व इमारतींच्या दगडास हात लावण्याची मनाई केली.

आतां तेथें नवीन घरें होत आहेत. नवीन घरें बांधतांना जुन्या फरशा व भिंती जमिनींत लागतात! नळ झाले आहेत व वस्ती वाढत आहे, पण—पण......

गेला तो नृपती, तदन्वय तसा! सामन्त कोठें अतां?
त्याची ती नगरी सुरम्य वनिता शालाहि वाताहता!
गेलें वैभव ये फिरूनि कसचें? तो काळ गालीं हंसे,
कालाचा महिमा अगाध समजें, तद्भक्ष्य सारें असे.

**परिशिष्ट**—हा लेख १९१४ मध्यें लिहिला होता. आतां तीस वर्षांत लेखनपद्धति पुष्कळ बदलली असल्यानें ह्या लेखाचें वळण जुनाट वाटतें. पण लेखकाची मानसिक ठेवण दर्शविण्याकरितां मूळ लेख फरक केल्याशिवाय बहुतेक जशाचा तसा दिला आहे. १९३५ मध्यें मीं पुन्हां विजापूर पाहिलें. गोलघुमटांत आतां तीन वेळच प्रतिध्वनि निघत होते. इमारतीची डागडुजी चालली होती. शहरांतील वस्ती पुष्कळ वाढलेली दिसली. धाब्याचीं घरें कमी झालीं असून नवीन पद्धतींचीं घरें दिसूं लागलीं होतीं. विजापूर ह्या नांवानें उडालेल्या गोंधळाची १९२९ मध्यें घडलेली सत्यकथा येथें वाचकांच्या करमणुकीसाठीं देतों.

एक मराठी गृहस्थ विजापुरास जाणार होता. त्याला माहिती देणारानें सांगितलें कीं, "दादरच्या स्टेशनवर विजापूरचं तिकीट सुमारें ७ रुपयांस विकत मिळतं. सरासरी ३५० मैल आहे मुंबईहून विजापूर. रात्रीं मेलमध्यें बसावं, सकाळीं गाडी बदलून लहान गाडींत बसावं कीं दुपारीं बाराच्या सुमाराला विजापूर! कोणत्या स्टेशनवर गाडी बदलायची तें लक्षांत नाहीं, पण आठ वाजतां येतं स्टेशन."

गृहस्थ ग्रे. ई. पे. स्टेशनऐवजीं मुं. ब. सें. इं. रेल्वेच्या तिकीट ऑफिसांत गेला आणि पावणे सात रुपये देऊन त्यानें विजापूरचें तिकीट घेतलें. नंतर तो

काठेवाड मेलमध्यें बसला. 'विजापूरला जातांना गाडी कोठें बदलायची ?' असें त्यानें इतर उतारूंस विचारिलें. त्यांनीं सांगितलें, 'अमदाबादला'. सकाळीं ८ वाजतां अमदाबादला गाडी बदलून तो विजापूरला जाणाऱ्या लहान गाडींत बसला आणि बारा वाजतां विजापूरला पोंचला.

तेथें गेल्यावर त्याला कळलें कीं, आपण आपल्या इच्छित कर्नाटकी विजापूरला आलों नसून बरोबर उलट दिशेस आणि तितक्याच अंतरावर असणाऱ्या गुजराती विजापुरास आलों आहों !

---

## पुळ्याचा गणपति : : : : २

विद्यादैवत व मंगलकारक मानिलेल्या श्रीगजाननाचीं महाराष्ट्रांत जीं मुख्य आठ स्थानें आहेत, त्यांतील मूर्तीस 'अष्टविनायक' असें म्हणतात. हीं देवळें मोरगांव, पुळें, मुरूड, मढे, थेऊर, लेण्याद्रि, ओझर आणि रांजनगांव येथें आहेत. त्यांपैकीं पुळें हा गांव रत्नागिरीपासून सहा कोस आहे, आणि यंदा ( १९१७ ) मला नोकरीनिमित्त रत्नागिरीस राहण्याचा प्रसंग आल्यामुळें येथें असेपर्यंत पुळ्यास जाऊन यावें असा विचार केला. दोन दिवसांची सुट्टी मिळतांच सहशिक्षक रा. पुंडलीक व विद्यार्थी फाटक यांच्याबरोबर तेथें जाण्यास निघालों. फाटक याचें घर पुळ्यास असल्यानें उतरण्याची सोय चांगली होती. गाडी-रस्ता सोयीचा नसल्यानें कोंकणांतील बहुतेक प्रवास पायींच करावा लागतो ( १९१७ ). त्याप्रमाणें हाहि प्रवास पायींच करावा लागणार असल्यानें सामान वाहण्यास एक गडी बरोबर घेतला.

दिवस पावसाळ्याचे असल्यामुळें उन्हाची धास्ती नव्हती. म्हणून दुपारीं चाललें असतां रत्नागिरींत दुपारचें जेवण वेळेवर घेऊन संध्याकाळच्या आंत पुळ्यास पोहोंचतां येईल असा विचार करून दुपारीं पाऊण वाजतां आम्ही रत्नागिरीच्या सड्यावरून निघालों. अर्धा कोस चालल्यावर गांव संपलें आणि • मैल दर्शविणारा ' बापदगड ' ( फादरस्टोन ) लागला. वर्णनांत सांगावयाचें

अंतर येथूनचेंच देणार आहे. दीड कोसावर शिरगांव येथील सरकारी शेतकी-खात्याचें प्रयोगक्षेत्र आहे. जरा पुढें गेलें कीं, दादलवाडा नांवाची मुसलमान खलाशी लोकांची वस्ती लागते. ही वस्ती खाडीच्या कडेनें असल्यामुळें तेथें मोठमोठ्या होड्या नांगरून ठेविलेल्या दिसल्या. आणखी अर्धा कोस गेल्यावर काळबादेवी नांवाची खाडी लागली. ही फार रुंद व खोल असल्या-मुळें तरींत बसून ओलांडावी लागते. आम्ही खाडीच्या कांठाशीं पोंचलों तेव्हां ती पैलतीरावर होती. अर्धा तास वाळवंटांत बसून आम्हांला ती ऐलतीरावर येण्याची वाट पाहावी लागली.

तर आल्यावर इतर सहा माणसांसह आम्ही तिच्यांत दाटीनें बसलों. तरीला भेग पडून आंत पाणी येत होतें तें पोहोऱ्यानें उपसून काढावयाचें काम एक उतारूच करीत होता. नाव हाकारण्याचें काम एकच नावाडी करीत होता. तर चालविण्याचें काम मक्त्यानें दिलेलें असल्यामुळें उतारूस मक्तेदाराच्याच तरीवर अवलंबून राहणें भाग होतें. तरींत बसल्यावर वीस मिनिटांनीं पलीकडे पोंचलों. तेथें काळबादेवीचें देऊळ व खलाशी लोकांची मोठी वस्ती आहे.

खडकाळ वाट सोडून आतां आम्ही समुद्रकिनाऱ्यावरील पुळणीवरून चालूं लागलों. कोंकणांतील कातळांवर चालून भेगा पडलेल्या तळपायांना ही मऊ, बारीक वाळू तुडवितांना फार आराम वाटला. एखाद्या मऊ काश्मिरी गालिच्यावरून चालल्यासारखा भास होत होता. डाव्या हाताला सों सों आवाज करीत सोसाट्यानें किनाऱ्यावर आदळणाऱ्या समुद्राच्या लाटा, उजव्या हाताला नारळींच्या, माडांच्या पुंजक्यांत वसलेल्या लहान लहान गांवांचा आल्हादकारक देखावा, वरून सूर्याचा ताप न व्हावा म्हणून मेघराजांनीं स्वदेहाचें केलेलें छत्र आणि खालीं धरणीमातेनें घातलेल्या पुलीनरूपी पाय-घड्या यांच्या योगानें दोन कोसांची चाल केव्हांच संपून गेली.

रत्नागिरीहून चार कोस आल्यावर पुळणींतली वाट संपून अऱ्याची तर लागली. ही खाडी अरुंद आणि उथळ असल्यानें तरीकरितां अडून बसावें लागलें नाहीं. खाडी ओलांडल्याबरोबर एक उंच घाटी लागली. ही पक्क्या पायऱ्यांनीं बांधलेली आहे. घाटीची उंची पुण्याच्या पर्वतीच्या उंचीइतकी

वाटली. माथ्यावर एक वडाचें झाड आहे. ज्यांचे हात अगर पाय दुखावले असतील असे लोक त्या झाडाखालच्या देवास नवस करतात आणि देव नवसास पावला तर लांकडी हात अगर पाय तयार करवून देवास वाहतात. देवाकडून खरोखरचे हातपाय मिळवून मोबदल्यादाखल त्यास लांकडी हातपाय अर्पण करणें हा मोठा फायदेशीर सौदा आहे खरा! ह्या वडापासून घाटीस उतार लागतो. घाटीच्या उत्तर पायथ्याशीं वरें नांवाचें गांव आहे. एका बाजूस अरें व दुसऱ्या बाजूस वरें हा अनुप्रास ठीक आहे, पण अरेला कोरे किंवा तुरे अधिक शोभलें असतें.

जरा पुढें गेल्यावर पुनः एक लहानशी तर आणि घाटी लागली. अगोदरच चढण्याउतरण्यास अवघड असलेल्या ह्या घाटींत पावसाच्या योगानें घसरडें झालें असल्यामुळें फारच जपून चालावें लागतें. ह्या दोन्ही घाट्यांवर वाढलेल्या वडांच्या व आंब्यांच्या झाडांच्या फांद्या बुंधाच्या पूर्वेकडल्याच बाजूला लागलेल्या आहेत. पश्चिमेकडील समुद्रावरून सोसाट्यानें वाहणाऱ्या वाऱ्याची ही करामत पाहून बरीच मौज वाटली. घाटी उतरल्यावर रत्नागिरीपासून साडेपांच कोसांवर भंडारीपुळें नांवाचें लहानसें गांव लागलें. भाताच्या हिरव्यागार शेतांनीं, उंच नारळींनीं आणि आंबा, फणस व वडाच्या प्रचंड वृक्षांनीं ह्या गांवाला रम्य शोभा आणिली आहे. गांव संपतांच पुनः घाटी लागली. तिच्या माथ्यावर चढतांच अर्धकोस अंतरावरील पुळयाच्या गणपतीच्या देवळाचें कौलार त्याच्याजवळची गोलडोंगर नांवाची वर्तुलाकार सुंदर टेंकडी आणि देवळाच्या कडेला किनाऱ्यावर आदळणारें सूर्यास्ताच्या वेळचें रौप्यरसाप्रमाणें चकचकणारें समुद्राचें पाणी यांचा मनोहर देखावा दृष्टीस पडला. रत्नागिरीहून सहा कोस पूर्ण झाल्यावर पुळें गांव लागतें. आम्ही तेथें सहा वाजतां पोंचलों. खडकाळ आणि चढउताराच्या वाटेनें चालल्यानें आमचे पाय थकून गेले होते.

आम्ही फाटक ह्या विद्यार्थ्याच्या घरीं प्रवेश करितांच त्याच्या वडिलांनीं हात जोडून, "गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः" हा श्लोक म्हणत आमचें अंतःकरणपूर्वक स्वागत केलें. 'संध्याकाळ झालेली असल्यानें दुसऱ्या दिवशीं स्नानोत्तर दर्शन घ्या' असा यजमानांचा आग्रह पडल्यावरून आम्हीं ती रात्र विश्रांतींत

घालविण्याचें ठरविलें. रात्रीं जेवण केल्याबरोबर अंथरुणावर कलंडलों व लगेच दमल्यामुळें गाढ झोंप लागली.

समुद्रकिनारा रा. फाटक यांच्या घरापासून फार तर एक हांकेवर (फर्लांग) असेल. पावसाळी लाटा किनाऱ्यावर आदळून गंभीर आवाज करीत होत्या. त्यांच्या नादांतच झोंप लागली, त्यांच्या क्षुब्धतेनें स्वप्नें पडलीं आणि त्यांच्या प्रचंड गर्जनेनें सकाळीं लवकरच आम्हांस जागें केलें.

सकाळीं स्नान आटोपून सोंवळीं नेसून पूजासाहित्याच्या पंचपात्र्या आणि 'किंचित् व्यावहारिक द्रव्यम्' घेऊन देवळाकडे निघालों. पुळें गांवांत पाखाडीच्या (फरसबंदी) वाटा असल्यामुळें चालण्यास बरें वाटतें. देऊळ लांबट आणि हातोडीच्या आकाराचें आहे. देवळाच्या प्रवेशद्वाराजवळ माडाची बाग लागते. तिचें उत्पन्न देवस्थानास मिळतें. बागेच्या पलीकडे असलेल्या तीन धर्मशाळा, आम्ही गेलों तो दिवस उत्सवाचा किंवा यात्रेचा नसल्यानें, रिकाम्या दिसल्या. धर्मशाळांच्या पलीकडे जामदारखाना आहे. यांत देवाचे ३१ बहुमूल्य सोन्याचे अलंकार, रुप्याचीं ताटें, वाट्या, अभिषेकपात्रें, वाजवावयाचें शिंग आदिकरून वस्तु आहेत. गजाननाच्या चांदीच्या दोन मूर्ति असून त्यांपैकीं एक अठराशें तोळे वजनाची आहे. जामदारखान्यांतील सामानाची एकंदर किंमत सात हजार रुपये आहे (१९१७) असें म्हणतात.

जामदारखान्याच्या डाव्या बाजूस गोलडोंगरांतून वाहणारा स्वच्छ पाण्याचा झरा आहे, यास 'नाभिगंगोदक' असें नांव आहे. गोलडोंगरास गणपतीची निराकार मूर्ति (?) असें समजण्यांत येतें, व हा झरा त्या मूर्तीची नाभि आहे असें मनांत योजून त्यास हें नांव देण्यांत आलें आहे. नाभिगंगोदकाजवळ सभामंडप आणि त्याच्या दोहों बाजूंस सोपे आहेत. प्रतिदिनीं सकाळीं गांवांतील ब्राह्मण पुरुष ह्या सभामंडपांत आन्हिक कृत्यें करण्यास बसतात. सभामंडपाच्या मध्यभागीं देवालयाचा गाभारा आहे. बांधणीवरून असें दिसतें कीं, तो सभामंडपाच्या आधीं स्वतंत्र बांधला असावा. गाभाऱ्यांत शिरल्यावर दोन पायऱ्या खालीं उतरावें लागतें. आंतील बाजूस काळ्या दगडाची फरशी केली आहे. देवाची स्वयंभू मूर्ति कोनाड्यासारख्या खोबणींत पश्चिमाभिमुख अशा दिशेस बसली आहे कीं, सूर्यास्ताच्या वेळीं आपले

किरण त्या मूर्तीवर क्षणमात्र पाहून मगच सूर्यनारायण अरबी समुद्रांत बुडी मारितात.

वास्तविक पाहतां हा गणपति स्वयंभू असल्यानें ह्याला घडवलेल्या मूर्तींच्यासारखा आकार नाहीं, तथापि गोलडोंगरास ‘निराकार मूर्ति’ आणि स्वयंभू पाषाणास ‘साकार मूर्ति’ अशीं नांवें देण्यांत आलीं आहेत. मूर्तीलगत तीर्थ सांठविण्याकरितां खळगा केला आहे. स्वयंभू मूर्तीवर पांढऱ्या गारगोटींचे कांहीं खडे आहेत, यांस तिचे दंत समजतात; तथापि हे दंत एका रेषेंत देखील नाहींत, केवळ पांढरे आहेत म्हणून दंत म्हणावयाचें झालें! आम्हीं चार चार आणे महादक्षिणा देवापुढें ठेविली ती पुजाऱ्यानें घेतली. कारण या देवळाचा असा नियम आहे कीं, आठ आण्यांपेक्षां कमी ठेविलेले पैसे पुजाऱ्यानें घ्यावयाचे व जास्त ठेवले असल्यास देवस्थानाकडे जमा व्हावयाचे. ह्या पद्धतीमुळें गणपति व पुजारी यांचे हितसंबंध परस्परविरुद्ध होतात आणि गजाननाला लोकांनीं थोडेच पैसे ठेवावेत अशी दुरिच्छा पुजाऱ्याला स्वाभाविक होते. महादक्षिणा ठेवून नमस्कार करून आणि ‘वक्रतुंड महाकाय’ हा श्लोक म्हणून आम्ही गाभाऱ्यांतून वर आलों. गाभाऱ्याला घुमट आणि त्यावर सोनेरी मुलाम्याचा कळस आहे. सभामंडपाच्या छपरापर्यंत सुद्धां त्या कळसाची उंची पोंचत नाहीं.

गाभाऱ्याबाहेर सभामंडपांत तांब्याच्या पत्र्यावर उठविलेली गणपतीची आकृति दिसली. ‘ती कशाकरितां ठेविली आहे’ असें विचारल्यावर रा. फाटक यांनीं सांगितलें कीं, ‘ज्या वेळीं देवाला शेंदूर थापतात त्या वेळीं शेंदूर वाळेपर्यंत मूर्तीची पूजा न करितां ह्या तांब्याच्या पत्र्यावरील आकृतीची पूजा करितात.’

देवदर्शन झाल्यावर आम्ही प्रदक्षिणा घालण्यास निघालों. ही प्रदक्षिणा नुसत्या देवळाभोंवतींच नव्हे तर गोलडोंगर आणि देऊळ या दोहोंभोंवतीं घालावी लागते. प्रदक्षिणेची वाट गोलडोंगराच्या कडेनें वर्तुळाकार पावकोस परिघाची आहे. सर्व वाटेस फरसबंदीची पाखाडी केली आहे. वाट मनोहर झाडींतून आणि केवड्याच्या बेटांतून गेली आहे. केवड्याचें पान श्रीगजाननमहाराजांचें आवडतें असल्यामुळें हीं बेटें मुद्दाम लाविलीं आहेत कीं मूळचींच आहेत हें समजत नाहीं. केवड्याचा सुगंध नाकास आणि रम्य नैसर्गिक दृश्य

डोळ्यांस आनंदवीत असल्यानें प्रदक्षिणा लांबलचक व चढउताराची असूनहि श्रम झाल्यासारखें वाटलें नाहीं.

प्रदक्षिणेच्या अर्ध्या वाटेवर आम्हांस आश्रमवजा दगडी घर लागलें. हें मौनीबुवा नांवाच्या साधूंना राहण्यासाठीं त्यांचे भक्त दापोलीकर रा. लेले नांवाच्या गृहस्थांनीं अर्पण केलें असल्याचें समजलें. या साधुमहाराजांचें दर्शन घेण्यासाठीं आम्ही आश्रमांत गेलों. तेथें बुवा एका पाटावर भिंतीशीं टेंकून बसलेले होते आणि त्यांचे शिष्य समोरच्या बाजूस कायसें वाचीत होते. आम्ही जाऊन त्यांच्या पायां पडलों व समोर बसलों. त्यांनीं मौनव्रत स्वीकारलें असल्यामुळें त्यांस बोलावयाचें नव्हतें, तथापि 'अ–अ' असा आवाज काढून ते खुणांनीं विचारीत. त्यांनीं आमच्या पुळेकर मित्रास 'हे कोण' अशा अर्थाची प्रश्नार्थक खूण केली असतां त्यानें आमचा पेशा व राहण्याचें ठिकाण त्यांस सांगितलें. बुवांनीं आमचें नांव विचारण्याकरितां पुनः प्रश्नार्थक खूण केली, तथापि आम्हांस ती समजेना, तेव्हां त्यांनीं शेजारीं ठेवलेली पाटी हातांत घेऊन 'नाव' [नावर अनुस्वार नव्हता] हा शब्द तिजवर काढून आम्हांस दाखविली. मग आम्हीं आपलीं नांवें त्यांस सांगितलीं; तों आश्रमांत पोस्टाचा शिपाई आला. त्यानें बुवांच्या दोन मनीऑर्डरी आणल्या होत्या. मनीऑर्डरीच्या पत्त्यावर बुवांचें नांव 'श्रीसद्गुरु सदानंदमहाराज' असें असल्याचें समजलें. महाराज अ–अ शब्द काढून व खुणा करून पोस्टमनाशीं पुष्कळ संभाषण करीत होते. त्यांचें लक्ष्य मनीऑर्डरीकडे लागलेलें पाहून आम्हीं त्यांजपुढें एक एक आणा दक्षिणा ठेवून पायां पडून त्यांचा निरोप घेतला.

सदानंदमहाराजांचें मौनव्रत इतकें शिथिल कां ? म्हणून चौकशी करतां कळलें कीं, त्यांची बारा वर्षांची मुदत दहाबारा दिवसांनींच संपणार होती व नंतर ते विवाह करून गृहस्थाश्रमी बनणार होते; तेवढ्याकरितां त्यांनीं आपल्या भक्तजनांस आज्ञापत्रें पाठवून पैसे पाठवून देण्यास सांगितलें होतें, म्हणून मनीऑर्डरी येत असत.

प्रदक्षिणा संपूर्ण होण्याचे जरा आधीं देवालयाच्या स्वयंपाकाची धर्मशाळा लागते. या धर्मशाळेंत माघ महिन्यांतील उत्सवांत ब्राह्मणभोजन घालण्यांत येतें. शिवाय दर चतुर्थीस पारणें फेडण्यांत येतें. पारण्याच्या वेळीं होणारीं

ब्राह्मणभोजनें गांवांतील लोक पाळीपाळीनें करतात; आणि त्यांस 'गण' अशी संज्ञा आहे. धर्मशाळेच्या जवळ समुद्रावरील चौथरा आहे. येथें धक्का बांधलेला असून धक्क्यापासून समुद्रापर्यंत जाण्यास पायऱ्या बांधल्या आहेत; पण त्या वाळूंत बुजून गेल्या असल्यामुळें आमच्या दृष्टीस पडल्या नाहींत. उत्सवाच्या वेळीं येथें आगबोटी थांबतात असें म्हणतात. समुद्रावरील चौथरा सांगलीकरांनीं बांधला.

पुष्कळ यात्रेकरू येथें समुद्रस्नानाची मजा अनुभवतात आणि 'सागरे सर्वतीर्थानि' या वचनाप्रमाणें सर्व तीर्थांत स्नान करण्याचें पुण्य मिळवितात. आम्हांस, आधींच स्नान करून सोवळ्यानें आल्यामुळें समुद्रस्नानाची मौज अनुभवितां आली नाहीं. समुद्रावरील चौथरा पाहून आम्हीं प्रदक्षिणा पूर्ण करून पुनः गणपतीचें दर्शन घेतलें व 'देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं' या न्यायानें किंचित् विश्रांति घेऊन जामदारखान्याच्या माडीवरील नगारखाना पाहण्यास गेलों. तेथें एक भली मोठी नौबत व नगारे, सनया वगैरे वाद्यें आणि एक बंदूक व एक गंज खात म्यानांत पेन्शन घेत स्वस्थ पडलेली तरवार हीं आहेत. नगारखान्यांतील चौघडा दररोज सकाळीं, संध्याकाळीं आणि मध्यरात्रीं हजेरी देतो आणि उत्सवाच्या दिवशीं व सणावारीं प्रत्येक प्रहरास वाजतो.

नगारखाना पाहून आम्ही दहा वाजण्याचे सुमारास आमच्या यजमानांचे घरीं आलों व दुपारीं जेवण करून दीड वाजतां रत्नागिरीस परत जाण्यास निघालों व साडेसहा वाजतां घरीं पोंचलों.

आम्ही पुळयास ज्या मित्राचे येथें उतरलों होतों, त्याचे वडील वे. शा. सं. जनार्दन विठ्ठल फाटक यांनीं "श्रीक्षेत्र गणपति-पुळें माहात्म्यवर्णन" नांवाचें लहानसें पुस्तक लिहिलेलें आहे, त्याची एक प्रत मीं घेतली. तिचे आधारानें पुढील ऐतिहासिक माहिती दिली आहे.

* * *

सन १६०० च्या सुमारास पुळें गांवचे खोत भिडे नांवाचे होते. त्यांजवर मोगलाई धामधुमींत कांहीं संकट आलें असतां ते आपलें आराध्यदैवत आगरगुळें गांवचा गणपति याचें ध्यान करीत समुद्रतीरावरील केवड्याच्या वनांत बसले. तेव्हां गणपति प्रसन्न होऊन त्यांच्या स्वप्नांत आला व म्हणाला,

'मी तुझ्याकरितां आगरगुळ्याहून स्वयंभू स्वरूपानें गोलडोंगरांत आलों आहें.' खडकावरील झाडी साफ करून पाहिल्यावर भिडयांस तो गणपति दिसला. त्यावर गवती छप्पर बांधून स्वतः देवाची पूजा करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. आगरगुळ्याच्या देवळांत देवाचा कोनाडा मात्र शिल्लक आहे; पण आंत देवाची मूर्ति नाहीं, हा ह्या दंतकथेच्या सत्यतेचा पुरावा आहे. मामलेदार फिरतीवर गेला म्हणजे त्याच्या रिकाम्या दिसणाऱ्या खुर्चीप्रमाणें आगरगुळ्याच्या गणपतीचा कोनाडा दिसतो.

पुळ्याच्या देवस्थानची कीर्ति वाढत जाऊन शिवाजीमहाराजांचे प्रधान आण्णाजी दत्तो सचीव हे दर्शनास आले. पूर्वीचें गवती छप्पर काढून टाकून त्यांनीं गाभारा बांधिला. पेशव्यांच्या अमदानींत पुळ्यापासून अडीच कोसांवरील कोतवडें गांवचे हरभटजी पटवर्धन ह्यांनीं पुळ्यास जाऊन बरींच वर्षे तपश्चर्या करून मंगलमूर्तीची कृपा संपादन केली. नंतर ते नशीब काढण्यास देशावर गेले असतां त्यांचे पुत्र उदयास आले. त्यांचेच वंशज सांगली, मिरज, जमखिंडी, कुरुंदवाड आणि तासगांव ह्या संस्थानांचे अधिपति झाले. ह्या पुळ्याच्या गणपतीस आपलें कुलदैवत मानणाऱ्या संस्थानिकांनीं देवास पुष्कळ नेमणुका करून दिल्या असून त्याच्या दर्शनास ते वारंवार येतातहि. सांगलीकरांनीं देवळाचा सभामंडप बांधिला, तर कै. श्री. बाळासाहेब मिरजकरांनीं चांदीच्या दोन मूर्तींपैकीं थोरली मंदिरास अर्पण केली आहे.

गाभाऱ्यावरील सोनेरी कळस कोल्हापूर प्रकरणांत गाजलेले कारभारी माधवराव बर्वे यांनीं दिला. पेशव्यांच्या कारकीर्दींतील परशुराम रामचंद्र मामलेदार यांनीं जामदारखाना बांधिला व बाग तयार केली. श्री. सौ. रमाबाईसाहेब पेशवे ह्यांनीं धर्मशाळा बांधविली. बुंदेले सरदारांनीं गांवांतील व प्रदक्षिणेच्या वाटेवरील पाखाडी बांधिली. ह्याप्रमाणें मोठमोठ्या इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचे हात ह्या मंदिरावरून फिरलेले आहेत. म्हणून ह्या देवळाच्या धार्मिक महत्त्वाप्रमाणेंच त्याचें ऐतिहासिक महत्त्वहि उल्लेखनीय आहे.

ह्या विघ्नहर्त्याचे उत्साह भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत व माघ शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत असे वर्षांतून दोनदां होतात. यांपैकीं दुसरा उत्साह विशेष महत्त्वाचा असतो. उत्साहाच्या वेळीं देऊळ शृंगारणें, देवास

अलंकार चढवून त्याची मिरवणूक काढणें, कथा-कीर्तनें करविणें, ब्राह्मण-भोजन घालणें, हे सर्व प्रकार इतर ठिकाणच्या उत्सवांप्रमाणें होतातच, पण आणखी एकदोन प्रकार विशेष मजेदार होतात ते येथें नमूद करितोंः—

( १ ) " गणेशचतुर्थीच्या दिवशीं प्रातःकाळीं चौघड्याचा डंका झाल्याबरोबर दर्शनाकरितां आलेले अन्त्यजांशिवाय सर्व ब्राह्मणेतर गाभाऱ्यांत जाऊन मंगलमूर्तीला शिवून दर्शन व तीर्थप्रसाद घेतात. याप्रमाणें हा दर्शनविधि दोनप्रहरीं बाराच्या डंक्यापर्यंत चालतो. या मुदतींत कोणाहि ब्राह्मणेतराला देवाला शिवण्याला प्रत्यवाय नाहीं. डंका होतांच हा दर्शनविधि बंद होतो. ह्या सहा तासांवांचून अन्य वेळीं ब्राह्मणेतरांनीं सभा-मंडपांतूनच दर्शन घ्यावें, असा परिपाठ चालू आहे. ह्या होणाऱ्या स्पर्शास्पर्शाची निवृत्ति करण्याकरितां भाद्रपद शुद्ध एकादशीचे रात्रीं गांवचे धर्माधिकारी व भिक्षुक मिळून अभिषेकपूर्वक देवाची अर्चा करितात.

( २ ) " दुसरा प्रकार दसऱ्याचे दिवशीं होतो. सकाळीं संस्थानचे खर्चांतून चौघड्याची पूजा होते. पहिल्यानें सर्व हत्याराची व वाद्यांची पूजा करून नंतर बकरा बळी द्यावयाचा असतो. त्याच्या गळ्यांत फुलाची माळ घालून त्याचें पूजन करितात. हा बळी पूजेचे वेळींच अर्पण करण्याची चाल आहे. त्याचा पुढील विधि ( चट्टामट्टा ! ) रात्रीं नोकरलोकांकडून होतो. चौघडा हें स्थान पीराचें आहे असें प्राचीन काळापासून लोक सांगतात. ह्यामुळें हा बळी देण्याचा दरसालचा प्रघात आहे." ( पुळें-महात्म्य )

बकरा बळी घेऊनहि ब्राह्मणेतरांस वर्षांतून सहा तासांपेक्षां अधिक भेट न देणाऱ्या देवाला विचित्र म्हटलें पाहिजे. बाकी यांत देवाचा दोष नसून त्याच्या नांवाखालीं बकरा गट्ट करणाऱ्या भक्तांचीच लबाडी आहे. जनतेनें खटपट करून विघ्नहर्त्या मंगलमूर्तीच्या सोंवळ्या मूर्तीपुढें होणारी हिंसा बंद केली पाहिजे ( १९१७ ). ज्यांच्यावर कोंकणांत जाण्याचा प्रसंग येईल त्यांनीं हें रम्य आणि महत्त्वाचें स्थळ पाहिल्याशिवाय राहूं नये, अशी माझी शिफारस आहे.

**मंगलमूर्ति मोरया !**

## आमची जुनागडची सफर : : : : ३

ज्याप्रमाणें मुंबई इलाख्यांतील कॉलेजांपैकीं क्रिकेटमध्यें विजयी होणाऱ्या कॉलेजांत एक वर्ष विजयचिन्ह म्हणून ठेवण्याकरितां नॉर्थकोट चॅलेंज शील्ड फिरत असतें त्याप्रमाणें काठेवाड आणि गुजराथ प्रांतांतील विजयी कॉलेजाकरितां गायकवाड कप नांवाचें विजयचिन्ह फिरतें ठेविलें आहे. आमच्या बडोदा कॉलेजानें या कपाकरितां एक सामना जिंकला व बहुद्दिन कॉलेजशीं होणाऱ्या दुसऱ्या सामन्याकरितां जुनागडास जाण्याचें ठरलें. आमची टीम ता. ४ सप्टेंबर १९२३ रोजीं निघावयाची होती व तिच्याबरोबर एक प्रोफेसर धाडण्याच्या वहिवाटीप्रमाणें या खेपेस आमच्या कुलपतींनीं माझी रवानगी करण्याचें ठरविलें.

त्याप्रमाणें ता. ४ रोजीं संध्याकाळीं आम्ही सर्व बडोद्याच्या स्टेशनावर फास्ट पॅसेंजर पकडण्यासाठीं जमलों. पुष्कळ वर्षांत नव्या दमाच्या विद्यार्थ्यांच्या संगतींत गुरुशिष्यभाव विसरून ( बाकी अलीकडे हा भाव उतरलेलाच आहे म्हणा ) मिसळावयाचें असल्यानें मला फार आनंद झाला. त्यांत कॉलेजच्या प्रोफेसरांना सरकारी खर्चानें सफरी ठोकण्याचे व कामावर नसतांहि आपोआप आपली हजिरी मांडली जाण्याचे प्रसंग क्वचितच येत असल्यानें तो आनंद द्विगुणित झाला. संध्याकाळीं ५। वाजतां आगगाडी आम्हांस घेऊन

निघाली. येथून अहमदाबादपर्यंतचा प्रदेश सपाट असून झाडीनें आच्छादिलेला आहे व झाडेंहि मोठमोठालीं आहेत. प्रदेश सुपीक असल्यानें गेल्या सालीं पाऊस कमी होता तरी हिरवाचार दिसत होता. संध्याकाळीं दिसेनासें होईपर्यंत ही शोभा पाहून मग गप्पा, फराळ व पत्ते यांत आमच्या मिस्रूड फुटलेल्या बाळगोपाळांनीं वेळ घालविण्यास सुरुवात केली. विरमगांव येथें रेल्वेचा रुंद गेज संपतो, तेथें रात्रीं दहा वाजतां आमची गाडी जाऊन थडकली व बाकीचा रस्ता काटण्याकरितां मीटर गेजच्या गाडीची वाट तासभर पाहावी लागली. ही लांबलचक गाडी मेसाण्याहून निरनिराळ्या रेल्वेंचे थोडेथोडे डबे घेऊन अकराच्या सुमारास गजगतीनें प्राप्त झाली. आमच्या ट्रिपचे पंच रा. नूलकर व मी एका कंपार्टमेंटांत चढलों व दोन कोचांवर गाद्या पसरून पहुडलों. हा डबा मोर्वी संस्थान रेल्वेचा होता.

हळूहळू कोचाच्या अंगांत भरलेला काथ्या आमच्या वजनानें गळूं लागला आणि खालच्या फळ्या तुटून आम्हीं कोचांच्या खालीं भुईवर जोरानें शयन केलें. बरें झालें, गाडी आधींच चालू झालेली होती म्हणून, नाहींतर आमच्या शिष्यमंडळीनें गुरुजींची विटंबना पाहून टाळ्या देण्यास कमी केलें नसतें.

पहाटेस एका टेकडीच्या पायथ्याशीं वसलेलें अति सुरेख रचनेचें वांकानेर शहर गाडीच्या डाव्या अंगास दृष्टीस पडलें, कांहीं वेळानें दिसेनासें झालें व मग गाडीच्या उजव्या अंगास अगदीं जवळ आलेलें दिसून दृष्टिभ्रमाचा चमत्कार वाटला. शहरांतील बहुतेक इमारती आणि मध्यभागचा राजवाडा पोरबंदरी दगडानें बांधिल्यासारखा दिसत होता. नाटकाच्या पडद्यावर रंगवलेल्या देखाव्यासारखें रेखीव आणि रमणीय दृश्य समोरून जात होतें. काठेवाड खडकाळ पण सपाट आणि गुजराथपेक्षां नापीक वाटला. त्यांतलीं झाडें खुरटलेलीं दिसलीं. वाटेनें मोर पुष्कळच दृष्टीस पडत होते. मला ह्या प्रवासांत दोनचार मोराचीं पिसें सांपडलीं व तीं मोठ्या काळजीनें संभाळून घरीं आणण्याच्या प्रयासांत मी होतों; पण एका स्टेशनवर मालाच्या दोन वाघिणी मोरपिसांच्या गठ्ठ्यांनीं लादलेल्या पाहून मला त्या दोनचार पिसांची इतकी लाज वाटली कीं, मुकाट्यानें वळकटींतून काढून तीं मीं बाहेर फेंकून दिलीं. वाटेंतील सर्व स्टेशनांवर पुऱ्यांच्या एवढ्या परीघाच्या आणि

बोटभर जाडीच्या खव्याच्या वड्या विकावयास येत होत्या. त्यांस ते पेढा म्हणत होते.

आमची गाडी तासास सहा कोस वेगानें मार्ग कापीत सकाळीं आठ वाजतां राजकोटास पोंचली. तेथें मोर्वी रेल्वेची हद्द संपून राजकोट संस्थान आणि गोंडळ अशा दोन रेल्वे सुरू होतात. राजकोट संस्थान रेल्वे पश्चिमेस जामनगरकडे जाते ( १९२३ ) व गोंडळ रेल्वे दक्षिणेस जुनागडकडे जाते. आमच्या आगगाडीचे दोन तुकडे झाले. कांहीं डबे जामनगरकडे जाणाऱ्या गाडीस जोडले आणि बाकीची गाडी आम्हांस घेऊन राजकोट शहराच्या अगदीं मध्यभागांतून दक्षिणेस जाऊं लागली. राजकोट शहर फार टुमदार आणि पांढऱ्या दगडाच्या घरांनीं शोभिवंत दिसतें. मात्र आगगाडीच्या रुळांच्या दोन्ही बाजूंचा उपयोग गांवांतले लोक प्रातर्विधीसाठीं करीत असल्यानें खिडकींतून खालीं बघण्याची सोय नव्हती. दुपारीं तीन वाजतां जेतलसर जंक्शन नांवाचें स्टेशन लागलें. गाडींतील गर्दीनें, उन्हाच्या तापानें आणि गाडीच्या मंद गतीनें सर्वजण हैराण झाले. रा. नूलकर आणि मी उपाहारगृहांत चहा घ्यावयास बसलों असतां जवळच दुसऱ्या टेबलाशीं चहा घेत बसलेल्या आमच्या एंजिन-चालकास नूलकर म्हणाले, "मिस्टर, तुम्ही आहां फारच दयाळू अंतःकरणाचे !"

"कसें काय आहे तें, सर ?" एंजिन-चालक बिचकल्यासारखें करून म्हणाला.

"रुळावरून एक गोगलगाय चालली होती, तिचा जीव बचावण्याकरितां तुम्हीं एंजिन अगदीं सावकाश चालविलं होतं, असं माझीं मुलं म्हणत होतीं." नूलकर गंभीरपणानें बोलले.

"व्हॉट यू मीन ?" असें रागानें बोलून एंजिन-चालकानें लांबच्या टेबलाचा आश्रय घेतला.

विरमगांवपासून जेतलसर फक्त ८० कोस आहे; पण एवढ्या अंतरांत तीन ठिकाणीं एंजिन आणि आगगाडीचा चालकवर्ग यांच्या बदल्या झाल्या आणि एवढ्या अंतरास पंधरा तास लागले. सदर्न मराठा रेल्वेनें प्रवास करणाऱ्या आमच्या दक्षिण महाराष्ट्रीय बांधवांनीं देखील सौराष्ट्रीय प्रवाशांची कींव

करण्याजोगी आहे. जेतलसरपासून जुनागड संस्थान रेल्वेची हद्द लागली. जेतलसर सोडून पांच कोस आल्यावर रुक्ष मैदानी प्रदेश संपून डोंगराळ भूमिभाग डोळ्यांपुढें आला आणि झाडांनीं व गवतानें हिरवें आच्छादन घातलेल्या आपल्या तीन उंच शिंगांनीं आकाशास टक्कर देणाऱ्या विशाल गिरनार पर्वताचें दर्शन होऊन सर्व अध्वखेद नष्ट झाला.

जुनागडास पोंचल्यावर आम्ही सरकारी पाहुणे असल्यानें तेथील नेटिव गेस्ट हौसमध्यें आमची बरदास्त ठेवण्यांत आली. हें गेस्टहौस म्हणजे पांच मजली जुना राजवाडा असून तो इतका विस्तीर्ण आहे कीं, आम्ही उतरलों होतों त्या वेळीं, नबाबांच्या बहिणीचा साखरपुडा व्हावयाचा असल्यानें, आणखी दोन-अडीचशें पाहुणे तेथें उतरले होते तरी आम्हांस त्यांची व त्यांस आमची दादहि लागली नाहीं. संध्याकाळीं साखरपुड्याचा समारंभ झाला. त्या वेळीं गाण्याची मैफल झडली व सर्व दरबारी मंडळींच्या-साहेबी फॅशनचे कपडे घातलेल्या ऑफिसरांच्या अंगावर देखील-रंग उडविण्यांत आला. अशा प्रसंगीं जनान्यात तर रंगाचे हांडेच्या हांडे रिकामे करतात असें म्हणतात.

आम्ही उतरल्यावर एक दिवस विश्रांति घेतली व नंतर सामन्यास प्रारंभ झाला. जुनागड कॉलेजची खेळण्याच्या कामांतील ख्याति विशेष होती, पण आमचीहि तयारी पूर्वींच्या कोणत्याहि वर्षापेक्षां अधिक होती. श्री. दादासाहेब घोरपडे हे आमच्या संघाचे कप्तान सव्यसाची म्हणून नाणावलेले होते. राणे, शिर्के, नायर, वडगांवकर, वैशंपायन हे खेळाडू बडोद्याची बाजू संभाळण्यास समर्थ योद्धे होते. दादासाहेबांनीं शतक काढिलें, आणि गोलंदाजीहि उत्कृष्ट केली. आमचा सारखा जय होत असल्यानें खेळ चालू असतांना एकसारख्या तारा आम्ही बडोद्यास पाठवीत होतों. शेवटीं दीडशें धांवांनीं आमचा जय झाला आणि नॉर्थकोट ढाल पहिल्यानेंच आम्हांला मिळाली. त्यानंतर बडोदा कॉलेजनें पुष्कळदां क्रिकेटक्षेत्रांत पराक्रम गाजविला आहे, पण प्रारंभ ह्या वर्षी झाला.

सामना सुरू होण्यापूर्वी आम्हीं शहर पाहण्यासाठीं एक फेरफटका मारिला. शहरची वस्ती सुमारें ४० हजार असून तें टुमदार दिसतें. सर्व शहराभोंवतीं

असलेला जुना कोट शाबूत ठेविला आहे व बाहेरून शहरांत येण्यास दरवाजे आहेत. शहर, इस्पितळ, लायब्ररी, नवा व जुना राजवाडा, मंदिरें व मठ यांच्या इमारतींमुळें खुलून दिसतें. द्वारकाधीशावर हुंडी पटविणारा प्रसिद्ध साधु नरसी मेहता येथेंच होऊन गेला. त्याच्या घराचें जोतें दाखवितात, त्यावर पारवे वगैरे पांखरांस चारा घालितात. शहरच्या उत्तरेच्या बाजूच्या दरवाज्यानें आम्ही निघून दुतर्फा बागा असलेल्या पक्क्या सडकेनें दोन कोस अंतरावर असलेल्या शंकर बागेंत गेलों. ही बाग फारशी मोठी नाहीं, पण तींतील सरकारी सिंहगृह मला वाटतें सर्व पृथ्वींत अद्वितीय असेल. एक लांब चाळ बांधिली असून तींत दहाबारा जोडखोल्या आहेत व प्रत्येक जोडखोलींत पांचसहा लहानमोठ्या वनराजांचें एकेक कुटुंब कैद करून ठेविलेलें आहे. सूर्य-प्रकाशाच्या किरणांचा प्रवेश या पिंजऱ्यांत क्वचितच होत असेल; आणि त्यामुळेंच कीं काय सर्व सिंह चावऱ्या कुत्र्याइतकेच हिंस्त्र दिसले. त्यांचीं पिलें तर अंगास हात देखील लावूं देत होतीं. अर्थात् आमच्याबरोबरच्या विद्यार्थी मित्रांनीं त्यांची मनसोक्त चेष्टा करून करमणूक करून घेतली.

गिरनारचें अरण्य ही एकच जागा हिंदुस्थानांत सिंहाच्या शिकारीची असल्यानें पुष्कळ राजेरजवाडे व 'साहेब' लोक तेथें सिंहांवर गोळया झाड-ण्यास जुनागडचे राजपाहुणे म्हणून येतात. पुष्कळदां जंगली सिंह हेरला जात नसल्यानें शिकारी-महाशयास रिक्त हस्तानें माघारीं जाण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून पाळींव वनराजास रानांत सोडण्यांत येतें असें कांहीं बेजबाब-दार लोकांनीं आम्हांला सांगितलें. त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवणें सोयीचें नाहीं.

ह्या बागेंत एक आयनेमहाल आणि एक अजबखाना आहे. उपरोक्त ठिकाण नांवाप्रमाणें अजब आहे.

सामना संपल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्ही गिरनार पाहण्यास सरकारी वाहनांतून निघालों. शहराच्या पूर्व बाजूस दोन कोस अंतरावर पर्वताचा पायथा आहे. वाटेंत जागोजाग देवळें, मठ व धर्मशाळा ह्यांत आपापले बोजे समोर टाकून यात्रेकरू एकमेकांस प्रवासवर्णनें सांगत बसले होते. भस्मचर्चन करून रुद्राक्षें परिधान केलेले साधू गांज्याच्या चिलमी पीत

आध्यात्मिक चर्चा करीत होते. आमच्या बरोबरचे पंच रा. रामभाऊ नूलकर ह्यांचा विशेष परिचय याच प्रसंगीं मला घडला. मोठा आनंदी आणि विनोदी प्राणी! गिरनार चढतांना दोन बैरागी चिलीम पीत असलेले त्यांना दिसले. त्यांनीं पट्दिशीं एकाच्या हातची चिलीम हिसकावून आपल्या तोंडास लाविली. हा हॅट, बूट, पँटवाला साहेब आपली चिलीम ओढतांना पाहून ते बैरागी चकित झाले. " वाहवा, क्या मजा आती है!" असें म्हणून रामभाऊंनीं चिलीम परत दिली आणि एक पैसा बैराग्याला दिला. बैरागी म्हणाला, " साहेब, पहिले एक पैसेमां दो चिलीम मिलती थी अब देखो हाल एक आनेमे एकबी मिलती नहीं! क्या अफसोस की बात है!" रामभाऊ म्हणाले, " बाबाजी, यह तो सब कलिजुगका प्रभाव है."

" ही चिलीम पिणें तुम्हांला कसें आवडतें " असें साहजिकच मीं रामभाऊंस विचारलें. ते म्हणाले, " प्रोफेसरसाहेब, मी ह्या बैराग्यांसारखाच सात वर्षं लंगोटी लावून सातपुड्याच्या जंगलांत फिरत होतों. तिथें मला ही चिलीम पिण्याची सवय लागली. ह्या भिकार कागद नेसलेल्या सिगारेटपेक्षां गांज्याची चिलीम किती श्रेष्ठ अन् उल्हासदायक आहे म्हणून सांगूं? केवळ विलायतचा शिक्का नाहीं म्हणून गांज्याला आपण धिक्कारतों—"

रामभाऊंच्या वैराग्याचें कारण समजून घेण्याची मला फार उत्सुकता उत्पन्न झाली; परंतु आमचे खेळाडू मित्र भोंवतीं जमले आणि सामन्याची चर्चा सुरू झाली.

गिरनार रस्त्यावर अर्ध्या वाटेंत अशोकाच्या शिलालेखांची एक अस्सल प्रत आहे. अशोकानें ह्या लेखांस धम्मलिपी असें नांव दिलेलें आहे. एका पांढऱ्या खडकावर चांगला पृष्ठभाग बघून एकेक ह्याप्रमाणें चौदा आदेश येथें ब्राह्मी लिपींत कोरलेले आहेत. ते अजूनहि सुवाच्य आहेत. अशोकाच्या काळीं देखील गिरनार हें यात्रेचें मोठें ठिकाण असावें व यात्रेकरूंनीं वाचण्यासाठीं ह्या आदेशांची एक प्रत त्यानें तेथें कोरविली असावी. ह्या खडकावर जुनागड संस्थाननें छप्पर घालून भोंवतीं भिंत बांधली आहे; यामुळें ऊन्ह, पाऊस किंवा गुरांढोरांची ये-जा यांपासून लेखांचें रक्षण होतें. विद्यार्थिमित्रांना मी उत्साहानें शिलालेख पाहण्यास थांबवूं पाहत होतों; पण " त्यांत

काय पहायचं आहे?" असें म्हणून सर्वजण पुढें चालते झाले. आमच्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानलालसेवर चांगलाच प्रकाश पडला ह्या तिरस्कारयुक्त अवहेलनेनें!

अशोक-पाषाणापुढें थोडें अंतर गेल्यावर सुवर्णरेखा नांवाची लहानशी नदी लागली. यात्रेस येणारे लोक ह्या नदीच्या पाण्यांत आपले देह बुचकाळून पुढें गिरनारास जातात. आमच्या तीर्थांच्या घाणेरड्या सांचवणीच्या पाण्यानें मुमुक्षूंचे जडदेह जरी अधिक घामट होत असले तरी त्याच्या योगानें त्यांची आध्यात्मिक उन्नति होण्यास तें पाणी उपयोगी पडतें. जडवादी आधुनिकांस ही मख्खी कोठून समजणार? त्यांस बाजूस सरकावून आपण आपले मुचकुंद महादेवाच्या देवळांत जाऊं या. ही पहा गुहा. ह्या गुहेंत मुचकुंद राजा पांघरूण घेऊन वर्षानुवर्ष झोंप घेत पडलेला होता. कालयवनाला भ्यालेला श्रीकृष्ण पळत येऊन ह्या गुहेंतच दडला. निजलेला मुचकुंद हाच कृष्ण आहे असें वाटून कालेखाननें त्याच्या तोंडावरचें पांघरूण ओढलें. मुचकुंदानें डोळे उघडून ताबडतोब कालेखानचें भस्म केलें. ही गोष्ट कोणाला खोटी वाटत असल्यास त्यांनीं ही गुहा प्रत्यक्ष पाहावी. मुचकुंदगुहेच्या पुढें गेल्यावर आम्हांला दामोदरजीचें मोठें घाट बांधून काढिलेलें कुंड लागलें. गिरनारा जातीचे ब्राह्मण गोर (पंड्ये) शिष्यमंडळीच्या पापाचें मूळ जो पैसा त्याचें ओझें उतरतात. कुंडावर दामोदरजीचें कडेकोट देवालय आहे. आणखी पुष्कळ कुंडें आणि देवळें यांच्या गर्दीतून वाट काढीत आम्ही गिरनारी दरवाजापाशीं येऊन थडकलों आणि गाड्यांस रजा दिली.

वर चढणाऱ्या यात्रेकरूंकडून माणशीं एक आणा कर घेतात, पण आम्ही सरकारी पाहुणे असल्यानें करमुक्त होतों. आमचे गोलंदाज राणे यांस आदल्या दिवशीं ताप आलेला असल्यानें त्यांच्याकरितां आम्हीं एक डोलीहि मागून घेतली होती. सुमारें १०,००० पायऱ्यांची फरसबंदी वाट सोडत काढून बांधली गेली आहे. इतक्या पुष्कळ पायऱ्या असलेली पायवाट महाराष्ट्रांत देखील कोणत्याहि स्थानाची नाहीं. वर चढूं लागलें म्हणजे जसजसें उंच जावें तसतशीं डोंगरावरील झाडें ठेंगणीं होत गेलेलीं दिसतात. दोनशें पावलें चढल्यावर जुनागड शहरचा देखावा दृग्गोचर होतो. पर्वताखालील सर्व प्रदेश समुद्रा-

सारखा सपाट असल्यानें अतिविस्तीर्ण भूप्रदेश डोळ्यांसमोर येतो. वाटेनें एकसारखीं देवळें व मठ आहेत, त्यांत विश्रांति घेतां येते. १००० पावलें चढल्यावर भर्तृहरीची गुंफा लागली. तेथें पायवाटेवर मंडप घालून वेल चढवून रमणीय जागा केली आहे. आम्हीं देवापुढें पैसे ठेविल्यावर तेथील बावाजींनीं आम्हांला झऱ्याचें थंडगार पाणी पिण्यास दिलें. भर्तृहरीच्या श्लोक-शतकांच्या वाचनानें आम्हांला जो आनंद वाटला होता त्यापेक्षां अधिक आनंद भर्तृहरीच्या गुंफेंत घेतलेल्या विश्रांतीनें आणि प्यालेल्या थंड पाण्यानें झाला.

चढूं लागल्यापासून सुमारें एक तासानें आम्ही गिरनारच्या जैन मंदिराच्या कोटाजवळ पोंचलों. त्याच्या दरवाजाशीं सरकारी अतिथिगृह असून त्यांत मक्तेदारामार्फत चहा व फराळाची सोय होऊं शकते. दुसरी एक मोठी धर्मशाळा, कांहीं डाळेचुरमुऱ्याचीं दुकानें आणि पाण्याचें कुंड तेथें आहे. आंत गेल्यावर डाव्या बाजूस कोरलेला नागरी लिपींतला संस्कृत श्लोकबद्ध शिलालेख भिंतीवर शाबूत स्थितींत असलेला दिसला. तो संवत् १११५ तला आहे. त्यांत यदुवंशांतील राजांचीं नांवें आहेत. हल्लींचे जुनागडचे नबाब मूळचे यादववंशांतील क्षत्रिय राजे, राज्याच्या बचावासाठीं मुसलमान झाले, असें लोकहितवादींनीं ऐतिहासिक गोष्टींत लिहिलें आहे.

नेमिनाथाच्या मंदिरांत शंभरांहून अधिक मूर्ती व चारशेंवर पादुका आहेत। पार्श्वनाथाच्या मंदिरांत सारख्या-सारख्या मूर्ती तितक्याच असून सभामंडपांतील दगडी खांबांची आणि छताची नक्षी मनास थक्क करण्यासारखी आहे. याशिवाय श्वेतांबर व दिगंबर ह्या दोन्ही पंथांच्या जैनांचीं देवळें पुष्कळ आहेत. दगडावर कोरीव काम करण्यांत कारागिरांनीं इतकी कमाल केली आहे कीं, कांहीं ठिकाणीं कागदाइतक्या पातळ फुलांच्या पाकळ्या दगडांत कोरून तयार केल्या आहेत. देवळांतल्या मूर्ती ध्यानस्थ जिनांच्या ठरीव सांच्याच्या आहेत. त्यांना गंधफूल वाहिलेलें दिसलें नाहीं.

हीं सर्व देवळें एकाच आवारांत बांधिलीं आहेत. देवळाजवळचा भीमकुंड नांवाचा डोह भीमानें पाताळांत जाण्यास वाट काढण्यासाठीं लाथ मारून खोदला. पांडवांस वनवासांत पाठवून व हिंदुस्थानभर त्यांच्याकडून लेणीं, गुहा, डोह आणि देवळें इत्यादि लोकोपयोगी कृत्यें करवून दुर्योधनादिकांनीं

आम्हांवर अगणित उपकार करून ठेविले आहेत. जैनांचीं देवळें पाहून आम्ही डोंगराच्या माथ्यावर जाऊं लागलों. एका जागीं ३५०० फीट असें एका दगडावर गुजराथींत कोरलें आहे. ती समुद्रसपाटीपासूनची उंची असल्यास आम्ही पायथ्यापासून तीन हजार फूट वर आलों असा अर्थ झाला.

गिरनारच्या तीन शिखरांतलें सर्वांत उंच शिखर आतां आम्ही चढलों. ह्या पहिल्या शिखरावर अंबाजी देवीचें देऊळ आहे. ह्या उंच स्थानींसुद्धां पाण्याचा झरा आहे आणि पाणी इतकें थंड असतें कीं लोटेच्या लोटे भरून पाणी गट्ट केल्याशिवाय थकलेल्या प्रवाश्यांची तृप्ति होत नाहीं. अंबाजीचें देऊळ चांगलें प्रशस्त आहे व देवीची मूर्ति हिडीसपणापासून अगदीं अलिप्त आहे. देवीपुढें तुपाची समई अहोरात्र जळत असते. ह्या शिखरावरून सुमारें चारशें पावलें खालीं उतरून पुनः वळणावळणाच्या वाटेनें दत्ताच्या शिखरावर आम्ही चढलों. ह्या वेळीं कांहीं दक्षिणी यात्रेकरू बायका वरून खालीं येत होत्या. रामभाऊ नूलकरांनीं त्या दृष्टीस पडतांच चढत्या पायरीला डोकें टेकलें. ह्या बायका वरल्या अंगास थबकल्या. त्यांतली एक म्हातारी म्हणाली, "बया बया, ह्या साहेबाला घेरी येती आहे वाटतं?"

रामभाऊ नम्रपणानें म्हणाले, "नाहीं हो, मातोश्री, मी तुमच्यापुढें दंडवत घालतों आहें. काय पुण्य वर्णावं तुमचं! इतकी अवघड यात्रा करून तुम्ही सगळ्या जिवंत परत चाललां आहां ह्यावरूनच तुमच्या पदरीं केवढं पुण्य असेल तें उघड दिसत आहे. अहाहा! मरावं अन् तुमच्या पोटीं जन्माला यावं!"

रामभाऊंचे उद्गार ऐकून आम्हां सर्वांस हंसू आवरेना. त्या बायांना हें बोलणें भोळेपणाचें होतें कीं, चावटपणाचें होतें तें उमगेना. शेवटीं आम्ही विरुद्ध दिशांनीं मार्गक्रमण करूं लागलों. दत्ताचें शिखर उंचींत अंबाजीच्या शिखरापेक्षां कमी आहे; परंतु सुईच्यासारखें उंच सरळ व बारीक आहे. शेवटल्या पन्नास अवघड पायऱ्यांवरून एका वेळीं एकाच माणसास चतुष्पाद होऊन जातां येतें. वरतीं श्री दत्ताच्या पादुका आहेत व त्यांवर लहानशी दगडी छत्री आहे. दत्त हा मुख्यत्वेंकरून महाराष्ट्रीय देव असल्यानें ह्या शिखरावर येणाऱ्या मुमुक्षूंत दक्षिण्यांची संख्या विशेष असते. शिखरावरील पठार इतकें लहान आहे कीं, श्रीदत्ताची छत्री व प्रदक्षिणेची वाट ह्यांशिवाय

बाकीच्या जागेंत ५–६ माणसांना देखील बसतां येत नाहीं. दर्शन घेतांच उतरावें लागतें. दत्ताच्या पलीकडे कालिका मातेचें शिखर आहे, पण तेथें आम्ही गेलों नाहीं. हीं तीन शिखरें प्राचीन काळीं ज्वालामुखी असावीं असा भूगर्भवेत्त्यांनीं अंदाज केलेला आहे.

वर जातांना आम्ही दत्तापर्यंतच्या सहा हजार पायऱ्या जरी विशेष त्रासाशिवाय चढलों तरी उतरतांना मात्र पुरी खात्री झाली. खुद्द जुनागडचे रहिवासी उभ्या आयुष्यांत दोनचार वेळांपेक्षां जास्त वेळ गिरनारच्या शेवटपर्यंत कां जात नाहींत, डोलीवाले मजूर दर माणशीं सहा रुपयांसारखा भारी दर कां घेतात व बाहेर गांवचे यात्रेकरू गिरनारची वारी वारंवार कां करीत नाहींत ह्या सर्व शंका पायऱ्यांच्या एकेका वळणाबरोबर सुटत चालल्या. पायऱ्या चांगल्या तरी ह्या जवळजवळ असल्यानें उतरतांना धांवतां येत नाहीं. पुण्याच्या पर्वतीच्या पायऱ्यांसारखा ढाळ दिल्यानें चढण्या-उतरण्यास सोयीच्या आहेत, तशा ह्या नाहींत. ज्या बायांबापड्यांस डोल्या करण्याचें सामर्थ्य नाहीं त्यांस तर उतरतां जीव नकोसा होतो. आम्ही खालीं येतांना त्या पायऱ्यांनीं आम्हांला हैराण केलें. पाय मोडतात कीं काय असें सर्वांस वाटूं लागलें. दर वळणापाशीं वाटावें कीं आतां गिरनार दरवाजा येईल, पण एक संपले कीं दुसरें वळण समोर दत्त म्हणून उभें राहायचें. असें होतां होतां जीव घामाघूम झाला आणि दीर्घ काळानें दरवाजा दिसतांच आम्हांला जो आनंद झाला त्याची बरोबरी, बोट लागलेल्या कोंकणच्या उतारूस कुलाब्याची दांडी पाहून जो आनंद होतो त्यासच करितां येईल.

गिरनारवरून उतरून आम्ही उपरकोट किल्ला पाहण्यास गेलों. दाराशींच असलेले गणपति आणि मारुति ह्यांच्या भव्य मूर्तीवरून हा हिंदु राजांनीं बांधला आहे असें स्पष्ट होतें. जुनागड शहरचा हा रक्षक शहराला पायाशीं धरून तयारीनें उभा ठाकला आहे असें भासतें. किल्ल्यांतील टांक्यांतून शहराला पाण्याचा पुरवठा होतो. आंत नवघण नांवाचा कुवा बांधला असून त्यांत उतरण्यासाठीं वर्तुलाकृति पायऱ्या दगडांत खोदिल्या आहेत. कुव्यांत उतरल्यावर आंत बसण्यासाठीं चौक केला आहे. एक मोठी विहीर, तोफा, भुयारें आणि जुम्मा मशीद हीं किल्ल्याचीं उपांगें आहेतच.

जुनागड पाहून झाल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं दक्षिणेस पंचवीस कोसांवर समुद्रकिनारीं वसलेल्या वेरावळ शहरची सफर करून तेथून थेट बडोद्यास परत जाण्याचें ठरविलें, व रात्रभर कष्टार्जित झोप घेऊन सकाळीं चंबूगवाळें आणि आमच्या खेळाडूंस यश मिळवून देणारीं आयुधें बांधून आम्ही स्टेशनवर गेलों. जातांना अतिथिगृहाच्या दरवाजाशीं बसलेल्या अरब पहारेकऱ्यांनीं नूलकरसाहेबांस कव्याचा पेला पिऊन निघण्याचा आग्रह केला. एका कुंडींत रक्षामिश्र निखारे होते. ते बाजूस करून त्यांनीं सोनाराच्या मुशीसारखें मातीचें बोळकें बाहेर काढिलें आणि त्याचें डोकें फोडून आंतील कडू कवा ( कॉफी ) नूलकरांस पिण्यास दिला. त्यांनीं दोन घोटांत तो स्वाहा केला. मींहि थोडासा कवा चाखून पाहिला पण तो कडू जहर वाटला. हें अरब लोकांचें आवडतें पेय आहे असें मला सांगण्यांत आलें.

जुनागड आणि वेरावळ ह्या भागांत पुष्कळ नद्या वाटेंत लागल्या. मात्र त्यांत मोठी अशी एकहि नदी नव्हती. गढ्यामुद्धां पुष्कळ लागल्या. हल्लींच्या शांततेच्या व भयंकर आयुधांच्या काळांत उपयोग नसल्यानें त्या शेतांच्या वयांचें काम करीत आहेत. पूर्वी वाघेर व रजपूत लोकांच्या मोठमोठ्या टोळ्या काठेवाडांत लुटालूट करीत त्यामुळें तेथें ह्या गढ्यांची फार जरूर होती. अजूनहि सरहद्दीखेरीज इतर कोणत्याहि प्रांतापेक्षां काठेवाडांतच लुटारूंचा उपद्रव अधिक आहे.

सकाळीं अकरा वाजतां काठेवाडचा भूसागर संपत जाऊन दक्षिणक्षितिजा-वर जलसागराची हळूहळू वक्राकार होत आकाशास मिळणारी आकृति दिसूं लागली; तोंच वेरावळच्या स्टेशनांत आम्हीं प्रवेश केला. हें गांव जुनागड संस्थानांतच असल्यानें आम्हांस स्टेशनाजवळील सरकारी बंगल्यांत उतरतां आलें. लगेच आम्ही गाड्या आणि ट्राममधून समुद्रस्नानास गेलों. ज्या जागीं श्रीकृष्णास निर्याणकाळीं व्याधानें बाण मारिला त्याच जागीं जोरानें येणाऱ्या लाटांच्या माऱ्यांत आमच्या बालमित्रांनीं स्नान केलें. " सर, तुम्ही या कीं पोहायला ! " असा विद्यार्थ्यांनीं मला आग्रह केला. आपल्याला पोहतां येतें हें दाखविण्याची उत्कट हौस असूनहि भिजविण्यास कपडे नाहींत म्हणून ती मला मनांतल्या मनांत दाबून टाकावी लागली. पण आमचे मित्र रामभाऊ

नूलकर यांनीं नेकटायचा कडदोरा आणि हातरुमालाची लंगोटी करून समुद्रांत उडी घेतली. मीं ह्या वेळांत काठेवाडच्या सर्वच किनाऱ्यावर विशेष आढळणाऱ्या शंखशिंपा गोळा करण्यांत वेळ घालविला.

स्नानानंतर नेटिव गेस्ट हौसमध्यें आम्हीं जेवण केलें आणि शहर पाहिलें. वेरावळ मोठें शहर नाहीं पण तेथील घरें बहुतेक नवीं व श्रीमंती थाटाचीं आहेत. परदेशीं जाऊन अपार संपत्ति मिळवून उपभोग घेण्याकरितां स्वग्रामीं परत येणाऱ्या हिंदु आणि मुसलमान धर्मांच्या गुर्जर बांधवांचीं हीं घरें आहेत. आमच्या महाराष्ट्रांतील लहान गांवें ओसाड पडत आहेत तर गुजराथेंतील खेड्यापाड्यांतसुद्धां आजतागाईत पद्धतीच्या इमारतींचें बांधकाम चालू असतें.

स्नानानंतर आम्ही जवळच एक कोसावर असलेल्या प्रभासपट्टण ऊर्फ सोरटी सोमनाथास जाण्यास निघालों. सोमनाथाचें देवालय समुद्रकांठीं अवशेषरूपानें भरतीच्या लाटांचा मारा खात दीनवाण्या स्वरूपांत उभें आहे. मंदिराचा वर्तुलाकृति गाभारा, पुढील सभामंडपाचा लंबचौकोनी भाग, भिंतींच्या दगडांवर कोरलेलीं चित्रें एवढाच अवशेष पुराणवस्तुसंशोधन खात्यानें जागोजाग लटकावलेल्या पाट्यांच्या पहाऱ्यांत गतवैभवाची साक्ष देण्यास शिल्लक राहिला आहे. जवळच एका हाकेवर सोमनाथ जिंकणाऱ्या एका मुसलमानाचें थडगें मोठ्या थाटांत विराजत आहे. विचारी मन हें दृश्य पाहून खिन्न होऊन जातें. पण शेंकडों अज्ञानी यात्रेकरू बदली सोमनाथाचें दर्शन घेऊन प्रसन्न चित्तानें माघारे जात असलेले पाहून अज्ञान हेंच सौख्य अशा अर्थाच्या सुभाषिताचें सत्य मनाला पटतें.

हें भग्न मंदिर पाहून भोंवतीं भक्कम कोट असलेल्या प्रभासपट्टण गांवांत आम्ही शिरलों. हें खेडें असून यांत बोळ व जुनीं घरें आहेत. सोमनाथाचें गायकवाड सरकारनें इ. स. १८१२ त बांधविलेलें व त्यांच्याच खर्चानें चाललेलें नवीन देऊळ या गांवांत आहे. हिंदूंच्या सर्व उद्ध्वस्त क्षेत्रांचा जीर्णोद्धार व नवकर्म हीं मराठ्यांनींच केलीं आहेत हें मराठानिंदक मॉडर्न रिव्ह्यू टोळीनें ध्यानांत घेण्यासारखें आहे. ह्या नव्या देवालयाची बांधणी साधी व शुद्ध मराठी आहे. आंत जातांच मोठ्या ओवऱ्यांची विस्तीर्ण धर्मशाळा, धर्मशाळेच्या

आंगणांतून दुसऱ्या दरवाज्यानें देववळाचा परिसर, त्यांत मध्यभागीं पांढरा रंग दिलेलें साधें पण भव्य देऊळ. गाभाऱ्यांत दिखाऊ शिवलिंग आहे, पण गाभाऱ्याच्या दारामागून अरुंद अंधारी जिन्यानें २५ पावलें खालीं गेल्यावर खरें पूजेचें लिंग दिसतें. त्याची यथाशास्त्र पूजाअर्चा अहोरात्र चाललेली असते. मोंढे आडनांवाचे दक्षिणी पुजारी तेथें पिढीजाद आहेत. "आमच्या आठ पिढ्या इथें ह्या देवाच्या पायाशीं गेल्या, बापजी!" त्यांनीं आम्हांला सांगितलें. मुसलमानांनीं हल्ला केल्यास वरचें लिंग ते फोडतील व भुयारांतलें सुरक्षित राहील अशा समजुतीनें ही दोन शिवलिंगांची व्यवस्था केली असावी असें भटजींचें मत होतें.

सोमनाथाचें दर्शन घेऊन परत गेस्ट हौसांत जाऊन उपाहार संपवितों इतक्यांत आम्हांस परत नेणाऱ्या आगगाडीची शिटी ऐकूं आली; म्हणून आम्हीं लगबगीनें स्टेशनावर जाऊन गाडी पकडली. अस्ताला जात असणारें आरक्त सूर्यबिंब, विचित्र पोषाक केलेले काठेवाडी शेतकरी, दिवसभर कलकल करून संध्याकाळीं घरट्यांकडे जाणारीं पांखरें, सूर्याच्या अस्ताकडे आपली लोभिष्ट नजर लावून हलकेंहलकें प्रफुल्लित होत जाणारा चोरटा चंद्र इत्यादि रसिकप्रिय सत्त्वांकडे पाहण्याकडे गिरनारच्या चढउतारानें अर्धे लंगडे केलेले पाय चोळीत क्रिकेटच्या सामन्याची अभिमानपुरःसर चर्चा करण्यांतच आम्ही दंग झालों होतों. सबंध रात्र व दिवस आगगाडींत घालवून दुसऱ्या दिवशीं रात्रीं ९॥ वाजतां आम्ही बडोद्यास येऊन थडकलों.

# बडोद्यांतील जलप्रलय : : : : ४

सन १९२७ च्या जुलै महिन्यांत तारीख २५ ते २७ पर्यंत महापूर आला होता. पुराच्या वेळीं मी बडोद्यांत होतों इतकेंच नव्हे तर राहत्या घरांत कंबरेइतकें पाणी शिरल्यानें गृहत्याग करावा लागला होता. पाणी ओसरल्या-वर मी कॉलेजांतील विद्यार्थ्यांची टोळी बरोबर घेऊन खेड्यापाड्यांत संचार करून दुःखग्रस्तांस साह्य केलें होतें. ह्या प्रसंगीं माझे मित्र आणि त्या वेळचे ज्ञानप्रकाशकार रा. काकासाहेब लिमये यांच्या निमंत्रणावरून पुराचीं बातमी-पत्रें मीं लिहून त्यांस पाठविलीं आणि तीं पुरानंतर सातआठ दिवसांत ज्ञान-प्रकाशांत प्रसिद्ध झालीं. ह्या बातमीपत्रांतील मनोरंजक आणि प्रसंगवर्णनपर भाग येथें पुनर्मुद्रित करीत आहें व तो वाचकांस आवडेल अशी आशा आहे.

( १ )

बडोदें हें शहर गुजराथ प्रांताच्या मध्यभागीं असून समुद्रसपाटीपासून अवघ्या शंभर फूट उंचीवरील अफाट मैदानावर वसलेलें आहे. येथील नदी विश्वामित्री एरवीं एकाद्या ओहोळाप्रमाणें भासते व ती पूर्वेकडून वाहत येऊन ढाढर नदीला मिळते व ढाढर नदी खंबायतच्या आखातास मिळते. हें आखात बडोद्यापासून पन्नास मैलांवर आहे. या सगळ्या प्रांतांत रेताड जमीन असून दगड औषधालाहि सांपडत नाहीं. घरांचे पाये मातींतच असतात, त्यामुळें ते

कधींहि पक्के होत नाहींत. उलट जमिनींतील लोण्यानें सारखे खचत असतात. घरें विटांचीं, जोतीं देखील बिटांचीं अतएव कचीं. वार्षिक सरासरी पाऊस तेहतीस इंच. इतकी प्रास्ताविक माहिती पुराच्या स्वरूपाचा भयानकपणा ध्यानांत यावा म्हणून दिली आहे.

**पूर्वस्थितिः**— गतवर्षी सरासरीच्या सव्वापट पाऊस गुजराथेंत पडून आधींच जमीन ओली झालेली होती. तलावांतून पाणी सांठलें होतें, त्यांत यंदां उन्हाळा कमी तीव्र झाला त्यामुळें जमीन तहानेली नव्हती व तलावासहि अतिवृष्टीचें पाणी समाविष्ट करून घेण्यास वाव राहिला नव्हता. साधारणपणें दरसाल उष्णता व बाष्पीभवन यांच्या योगें जमीन पावसाळ्याच्या आरंभीं इतकी कोरडी पडते कीं पावसाचे पहिले दहा इंच जमीन ओली करण्यास खर्ची पडतात. परंतु यंदां येथें आर्द्रा नक्षत्राबरोबर जो पाऊस सुरू व्हावयाचा तो मृगांतच सुरू झाला. ता. ९ जूनला थोडे शितोडे पडले व ता. १३ जून-पासून एकसारखी झड लागली. ता. १५ जुलैला येथें सात इंच पाऊस पडून अवघ्या एक महिन्यांत वार्षिक सरासरी भरली. सगळे तलाव तुडुंब भरले व बडोदें स्टेशन व शहर यांच्या मधल्या पुलावरून पाणी वाहूं लागलें. यापूर्वी १९२१ सालीं सप्टेंबरांत असें पाणी वाहिलें होतें, तें यंदां पावसाळ्याच्या तोंडींच झालें. बडोद्याला पाणीपुरवठा करणारें आजव्याचें सयाजी सरोवर स्वयंचलित पूर-दरवाजे उघडून वाहूं लागलें आणि नको हा पाऊस असें सर्वांस होऊन गेलें.

**सोमवारची काळरात्रः**—परंतु, ईश्वरी योजना वेगळी होती. ता. २४ जुलै रविवार रोजीं रात्रभर सपाटून पाऊस पडला, तो नऊ इंच भरला. या पावसानें विश्वामित्रीला पुनः इतका पूर आला कीं, पाणी नदीच्या पात्रांत राहीनासें होऊन आसपासच्या प्रदेशांत घुसलें. सयाजी गंज नांवाच्या बडो-द्यांतील श्रीमंतांच्या वस्तीचा भाग नदी व स्टेशन यांच्यामध्यें सखल भागांत आहे, त्यांच्या रस्त्यावर कंबरेइतकें पाणी झालें. शहराच्या सखल भागांवरील रस्त्यांवर गुडघाभर पाणी झालें व त्यामुळें सोमवारीं शाळा-कॉलेजेंहि बंद राहिलीं, इतकेंच नव्हे, तर कोर्टे, कचेऱ्या हींहि सर्व नोकरांस हजर राहणें अशक्य झाल्यानें लौकर दुपारींच बंद करण्यांत आलीं. ज्यांचीं घरें नदीपलीकडे होतीं

त्यांच्यापैकीं ताबडतोब जे घरोघर गेले तेच योग्य वेळीं मुक्कामास पोहोंचले, पण पुष्कळ लोकांची आपल्या कुटुंबांशीं ताटातूट झाली. सयाजी गंजांत घरें असणाऱ्या पुष्कळ बड्या इसमांस गांवांत मुक्काम करावा लागला, उलट गांवांतले पुष्कळ लोक स्टेशन, सयाजी गंज, काप वगैरेकडे गुंतून राहिले व सर्वांच्या कुटुंबांस काळजी लागली.

सोमवारीं संध्याकाळीं पाणी जरा कमी झालें तें कदाचित् आखातास ओहोट असल्यानें कमी झालें असावें. परंतु रात्रीं नऊ वाजतां मकरपुऱ्याजवळचा टेंभीचा तलाव फुटला. टेंभी गांव वाहून गेलें व हर्णी आणि मकरपुरा अर्धीअधिक वाहून गेलीं. या तीन गांवांतले निदान दोनशें लोक पाण्यानें नेले असावे, असा अंदाज आहे.

**माणसें घरांखालीं सांपडलीं**:— सोमवारच्या काळरात्रीची आठवण बडोदेंकर जन्मभर विसरणार नाहींत. विजेच्या तारांवर वृक्ष पडून दिवे बंद झाले, तार ऑफिस बंद झालें, वारा सोसाट्याचा, वरून पावसाची झड व खालून पुराचें पाणी वाढूं लागलेलें! सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें! तळमजल्यांवर पाणी आल्यानें लोक माड्यांवर जाऊन नामस्मरण करीत बसले! रात्रीं अकरा वाजतां या पुराचें नवें स्वरूप दिसून आलें व तें म्हणजे धडाधड घरें पडणें हें होय. येथील प्रजामंडाळाचा आत्मा रा. साने, वकील ( स्वतः ते मुंबईस गेले होते ), यांच्या घरच्या पिछाडीची भिंत ओली होऊन वाऱ्याच्या जोरानें शेजाऱ्याच्या छपऱ्यावर पडली व तें घर एकाएकीं खालीं आलें. आंत सकपाळ नांवाचें गरीब मराठे कुटुंब राहत असे, त्यांतील एक तरुण पुरुष खेरीजकरून बाकीचीं सात माणसें लांकडांविटांखालीं चेंगरलीं. 'मेलों मेलों, काढा,' अशा दहावीस किंकाळ्या ऐकूं आल्या. परंतु त्या पुरुषभर पाण्यांत, दाट अंधारांत, भोंवतालीं पडणाऱ्या विटा-कौलांच्या माऱ्यांतून जाण्यास माणसें सज्ज होण्याच्या आंतच तीं सात माणसें गुदमरून मेलीं. त्यांत दोन तरुण स्त्रिया, एक म्हातारा, एक म्हातारी, एक मुलगा व दोन अर्भकें होतीं. त्यांचीं प्रेतें चार दिवसांनीं काढिलीं तेव्हां कुजून चाललीं होतीं. सान्यांची मंडळी खुशाल आहेत.

**जंबू बेट**:— दांडिया बाजारांत व आसपास दक्षिणी लोकांची मोठी

वस्ती आहे. हा भाग बराच खोलांत आहे. याला लागून जंबूबेट नांवाची वस्ती आहे, तें ओहोळाच्या कांठीं आहे. यांतून पाण्याचा जोराचा प्रवाह वाहत होता. जंबूबेटांतील रस्त्यावर पांच फूट पाणी झालें. त्यांतील बरींच घरें गरिबांचीं कच्चीं कुयटारू होतीं. तीं धडाधड एकामागून एक पडूं लागलीं. लोक बायकामुलांस घेऊन कसेबसे वस्त्रानिशीं बाहेर पडून चारपांच भक्कम घरें आहेत त्यांत आसरा घेऊं लागले. एक बाई चारपांच मुलांसह राहत होती, तिनें एका भोयास दोनशें रुपये समोरच्या घरांत पोहोंचविण्यासाठीं दिले! लक्ष्मणबोवांचे राममंदिरांत रामचंद्राच्या पायांना पाण्यानें स्पर्श केला, इतक्यांत एक वड उमळून मंदिराच्या छपरावर कोसळला आणि त्यामुळें तेथील बुवांची होमशाळा, पडशाळा यांवरील छपर खालीं आलें. मंदिरांत बायका-पुरुषांची मोठी वस्ती आहे, ती सर्व मंडळी नगारखान्यांत शिरून बसली व त्यांच्या वजनानें नगारखाना डळमळूं लागला. पहांटेचे वेळीं त्यांना मुजुमदारांच्या आखाड्यांतील स्वयंसेवकांनीं नावांतून सोडविलें.

**बेल्जमवर ताणः—** जंबू बेटांत रा. बर्वे नांवाचे निवृत्त शिक्षक स्वतः दुसऱ्या मजल्यावर व कुटुंबांतील माणसांस तिसऱ्या मजल्यावर बसवून स्वतःला सुरक्षित समजत होते. येथील वकील रा. तांबे यांनीं त्यांना उतरण्याचा खूप आग्रह केला, पण ते उतरले नाहींत व अर्ध्या तासांत घर खालीं आलें. तांबे वगैरेंनीं सर्वांस बाहेर काढिलें. खुद्द बर्वे मास्तरांस चेंगरून बराच मार लागल्यानें ते दुसऱ्या दिवशीं वारले. आपला बातमीदार ज्या घरांत राहतो त्याच्या पिछाडीच्या घरांतील दोन कुटुंबें आधींच त्याच्या घरांत आलीं. दुसरें कुटुंब सामान घेऊन बाहेर पाऊल टाकतें न टाकतें तोंच धाड धाड धाड आवाज होऊन पिछाडीचें घर कोसळलें व त्याच्या धक्क्यानें शेजारच्या घरची चांदईची भिंत पडली. तिच्यांतच जिना असल्यानें शेजारच्या घरांतील दोन बिऱ्हाडें खिडक्यांतून झेलून आणावीं लागलीं. जंबूबेट, दांडियाबाजारचा पश्चिम भाग व खारीबाव रस्ता हीं पाहून रा. श्रीधरराव शिंदे हे म्हणाले, "मीं बेल्जममधली जर्मनांनीं उध्वस्त केलेलीं गावें पाहिलीं पण त्या गांवांत देखील इतका हृदयद्रावक देखावा दिसला नाहीं!"

**फत्तेपुऱ्याचें मैदान झालें:**—फत्तेपुरा व काळुपुरा हे शहरचे दोन भाग शहरच्या कंगाल वस्तीचे आहेत. यांतील घरें सोमवार सकाळपासून आंत पाणी शिरल्यानें ओस पडूं लागलीं. पुरुष मुलांना खांद्यांवर घेऊन व बायका मडकींगाडगीं डोक्यांवर घेऊन त्यांच्या मागून कमरेइतक्या पाण्यांतून निवाऱ्याच्या जागीं जात आहेत, असा देखावा पाहून जर्मन युद्धाच्या वेळच्या चित्रांची आठवण होत होती. हे लोक बडोद्यांतील प्रसिद्ध भव्य इमारतींत जाऊन तळ देत होते. सर्व सरकारी इमारती या लोकांचीं आश्रयस्थानें बनल्या. परंतु राहिलेसाहिले हट्टी लोक होतेच. रात्रीं सटासट घरें पडूं लागलीं तेव्हां त्यांच्यांत ओरड सुरू झाली, या लोकांत गब्रू नांवाच्या मुसलमान पहिलवानानें साथीदारांसह उत्कृष्ट कामगिरी बजानिली. शिवाजी-उत्सवांत हिंदूंना मारण्यास उठलेले पहिलवान आपण खाल्लेला मार विसरून जाऊन हिंदूंस खांद्यांवर घेऊन सुरक्षित जागीं नेतांना जर अंधारांत कोणाला दिसले असते तर आनंदाश्रूंनीं त्याचे डोळे भरून आले असते. काळुपुऱ्यांतील निम्मीं घरें बसलीं, व फत्तेपुऱ्याच्या जागीं मैदान उभें आहे. या भागांत प्राणहानि जरा कमी झाली. कारण लोक वेळेवर मदत मिळवून निवाऱ्याच्या जागीं गेले होते.

पहांटे तीन वाजतां पुराची कमाल मर्यादा झाली. बातमीदाराच्या घरांत दीड फूट पाणी झालें होतें, पांच कुटुंबांतील माणसें एकत्र बसून परस्परांस लटकीं आश्वासनें देत होतीं. घनगर्द अंधार, मुसळधार पाऊस, सोसाट्याचा वारा, आसपास घटके अर्धघटकेनें पडणाऱ्या घरांचा कडकडाट यांच्यायोगें सर्व भयभीत झालीं होतीं. तान्हीं मुलेंदेखील घाबरल्यासारखीं दिसत होतीं. दर पंधरा मिनिटांनीं खालीं जाऊन पाण्याचा ठाव घेण्याचें काम चाललें होतें. उजाडण्याची मार्गप्रतीक्षा करतां करतां एकदांचे पावणेसहा वाजून भोंवतालचा भाग दिसूं लागला, व मंगळवार उजाडला.

(२)

मंगळवार ता. २६ उजाडला. पोलिस लोकांची मोठी तुकडी पोलिस लाइन्स वाहून गेल्यामुळें कलाभवनांत अडकली होती. सैन्यांतील शिपाई बिचारे आपापल्या बायकामुलांचें रक्षण कसें होईल याच्या काळजींत पडले

होते. इंग्लिश सोल्जर्सना लग्न करण्याची परवानगी कां नसते याचें कारण लक्षांत आलें. मोठमोठे सरकारी अधिकारी विश्वामित्रीपलीकडे असल्यानें त्यांनाहि कांहीं करतां येणें शक्य नव्हतें. बडोद्यांत पोहणारे लोक थोडे, यामुळें लोकांचा बचाव करण्याचें काम स्वयंसेवकांकडूनच होणें शक्य होतें. सांगलीस कृष्णा नदीच्या पुरांत उड्या टाकणारे, मुजुमदारांच्या आखाड्याचे मल्ल व येथील कॉलेजचे प्रोफेसर नानासाहेब आपटे यांनीं आखाड्यांतील पोहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मदतीनें सव्वाशें माणसांस सुस्थळीं पोंचविलें. भोई लोक तर चोऱ्या करण्यांत व लोकांकडून वाटेल तसे पैसे उकळण्यांत गुंग झाले होते. दांडिया बाजारांतील रा. हजरनीस यांचें घर अर्धे पडलें तेव्हां त्यांच्या समोरून भोई लोकांनीं त्यांचें सामान लांबविलें; त्यांचा पाठलाग करावा तर रस्त्यांत डोक्याइतकें पाणी! ओरडावें तर मदतीला येतो कोण?

**रोग्यांचे हालः**— सोमवारींच टेलिफोनच्या तारा तुटल्यानें नदीपलीकडली हकीकत येण्याचें बंद झालें होतें. कोणी म्हणे 'सयाजीगंज सगळा बुडाला व माणसें वाहून गेलीं,' कोणी म्हणे 'ते लोक कॉलेजच्या इमारतींत जाऊन बसले आहेत;' परंतु नक्की बातमी येणार कशी? नदीच्या अलीकडे येथलें स्टेट जनरल हॉस्पिटल सखल भागीं आहे. इस्पितळाच्या हद्दीच्या मधून एक ओढा जातो, त्यांतून अथांग पाणी जोरानें वाहत होतें, यामुळें एका भागांतून दुसऱ्या भागांत जाणें दुरापास्त झालें. पलीकडील भागांत प्रसूतिगृह आहे, त्यांत पाणी शिरूं लागलें, म्हणून बाळंतिणींस भिजतच दुसऱ्या भागांत आणून ठेविलें होतें. या भागाचा संबंध तुटल्यानंतर रोगी लोकांचे फारच हाल झाले. अन्न संपून गेल्यानें रोग्यांस एक दिवस कडकडीत उपास पडला. बुधवारीं ओढ्यावरून दोर फेंकून त्याला भांडीं बांधून अन्न पोंचविलें. पण मंगळवारीं पाण्याला इतका जोर होता कीं, रोग्यांच्या नातलगांनीं वाटेल तितके पैसे देण्याचें कबूल केलें तरी आंत उतरण्याचें धारिष्ट कोळीभोयांनाहि झालें नाहीं.

आतां नदीच्या पलीकडे काय प्रकार झाला तें पाहूं. अर्थात् याची बातमी गुरुवारपर्यंत आम्हांला लागली नव्हती. स्टेशन व नदी यांच्यामध्यें सयाजीगंज, पब्लिक पार्क, कॉलेजचें भव्य पटांगण आणि कँप हे भाग आहेत. एका

बाजूनें नदीचें पाणी चढत होतें तर दुसऱ्या बाजूस बी. बी. रेल्वेची ३० फूट उंचीची भिंत ( एंबॅन्कमेंट ) तें पाणी अडवून धरण्याचें काम करीत होती. रेल्वे भिंतीच्या योगें पाणी तुंबून जलप्रलय कसे होतात याचा अनुभव बंगाल प्रांतांत पूर्वी आलेलाच आहे, त्याचा प्रत्यय गुजराथेंत आला. यामुळें हा भाग विशेषच जलमय झाला होता. पादरा ( येथून ९ मैल ) गांवांतील लोकांनीं रेल्वेची भिंत फोडून पाण्यास वाट करून दिली तशी बडोद्यास केली असती तर अनर्थ कमी झाला असता. नदीच्या कांठीं पब्लिक पार्क नांवाच्या विस्तीर्ण उद्यानांत प्राणिसंग्रहालय होतें. त्यांतील पांचसहा सिंह, एक वाघ, कांहीं कांगारू, ससे, एक झिब्रा, निरनिराळ्या जातींचीं हरणें व सांबरें, दोन अजगरें, जातीजातींचीं वानरमाकडें हे सर्व प्राणी पाण्यांत कोंडले जाऊन प्राणांस मुकले. ह्यांचीं कुजलेलीं प्रेतें शुक्रवारीं नजरेस पडलीं.

**कॉलेज विद्यार्थ्यांची प्रशंसनीय प्रवृत्तिः**— या पार्कसमोर ‘ पथरी चाळ ’ नांवाची दगडांनीं बांधलेली चाळ आहे. ती मजबूत समजून पुष्कळांनीं तिचा आश्रय घेतला. परंतु तिच्यावर मोठा थोरला पिंपळ आपटला व चाळीचा अर्धा भाग कडाडला. पंधरा माणसें दगडाखालीं चेंगरून मेलीं, तीं शुक्रवारीं निघालीं ! पथरी चाळीशेजारीं शास्त्री ( गंगाधरशास्त्री पटवर्धनांचे वंशज ) यांचा बंगला पडूं लागला. त्यांत कुंटे नांवाचे एंजिनियर व मालक राहत असत. ते ‘ मदत करा, बचावा,’ असें ओरडूं लागले. बडोदा कॉलेज तेथून हांकेच्या अंतरावर आहे. कॉलेजांतील बहाद्दर विद्यार्थी शिवाभाई पटेल यानें प्रोफेसरांच्या उभें राहण्याच्या व्यासपीठाचा तराफा करून दोन सोबत्यांच्या साह्यानें वरील मंडळींस कॉलेजच्या इमारतींत आणून सोडलें !

कॉलेजची इमारत कृत्रिम उंचवट्यावर व अति प्रचंड आहे. आसपासचे २५० व कॉलेज रेसिडेन्सीचे २५० विद्यार्थी असे ५०० लोक, घोडे, गुरें वगैरे त्याच्या आश्रयाला होते. विद्यार्थ्यांनीं शिक्षणाची संस्कृति निदर्शनास आणून स्वतः दोन दिवस उपास सोसून आश्रित गोरगरिबांस स्वतःचें अन्न दिलें. कॉलेजच्या भिंतीवर कुचेष्टापर ‘ लेखन ’ करणाऱ्या विद्यार्थ्यांनीं जागोजाग

"Today 27 July
500 lives in danger."
"God is great and merciful."
"Resignation–the only resource."

अशीं भाविक वाक्यें खडूनें लिहिलीं होतीं. यावरून ताज्या रक्ताचे तरुणहि किती घाबरून गेले होते याची सर्वांस कल्पना येईल. कॉलेजचे प्रोफेसर सॉअॅरिस यांचा बंगला कांपाउंडांतच आहे, त्याचा तळमजला बुडाला होता. त्यांच्या बटलरचा दहा वर्षांचा मुलगा प्रवाहांत सांपडून वाहूं लागला; त्याला सोडविण्यासाठीं प्रो. शेवडे यांनीं जिवापाड मेहनत केली व स्वतःच्या जिवावर बेतेपर्यंत शिकस्त केली, पण तो मुलगा वाहत गेला. सांपडला नाहीं.

**स्टेशन मास्तरांचा दयाळूपणाः**—कॉलेजसमोर सयाजीगंजांत बहुतेक अधिकारी राहतात. ते वरच्या मजल्यावर बसून राहिले होते. त्यांत कोणीहि दगावलें नाहीं. सयाजीगंजाजवळ स्टेशन खूप उंचीवर आहे. स्टेशनच्या हद्दींतील १५० नोकर लोक रेल्वे गाड्यांतून बाहेरगांवावरून आलेले व बडोद्यावरून जाऊं इच्छिणारे, परंतु मध्येंच डांवून राहिलेले ३००, व आसपासचे ४०० असे सुमारें ८५० लोक स्टेशनवर तळ देऊन राहिले होते. स्टेशनमास्तरनें त्यांच्याकरितां पार्सलें फोडून त्यांस खाऊं घातलें. मंगळवारीं रेल्वे दळणवळण अजीबात बंद होतें. बुधवारपासून गोधऱ्याकडे एक गाडी वाटाडें एंजिन पुढें घालून जाऊं लागली. तारा अजीबात बंद झाल्या. एक दूरस्थ सिग्नल आपल्या १०० फूट उंचीच्या देहानें पृथ्वीस साष्टांग प्रणिपात घालता झाला! दोन छोटे पूल इतके जाया झाले कीं, ते दुरुस्त होण्यास अजून सहा महिने लागतील. २५ गाडीवाले स्टेशनवर अडकून राहिले. पैकीं १० जणांचे घोडे वाहून गेले. दोन घोड्यांचीं प्रेतें पुलाच्या कमानीला गुंतून राहिलेलीं मीं गुरुवारीं पाहिलीं. सयाजीगंजांतल्या लोकांचे पुष्कळ घोडे व गुरें वाहून गेलीं. एका गाडी-कारखान्यांतील कोऱ्या गाड्या वाहून गेल्या.

**दुष्काळांत तेरावा महिनाः**—मंगळवारीं इतिहासभक्त रा. विनायकराव वाकसकर यांच्या घराची दक्षिणेकडील चांदईची भिंत पडून चार-मजली घर उघडें पडलें. सुदैवानें दोन तास आधीं त्यांनीं आपलीं माणसें बाहेर

काढिलीं होतीं, त्यामुळें कोणासहि दुखापत झाली नाहीं. मंगळवारीं हेड पोस्टांत ४ फूट पाणी झालें, पत्र-पेट्यांत पाणी सांठलें. या दिवशीं सकाळीं आठ वाजेपासून तासास एक इंच याप्रमाणें पाणी कमी होऊं लागलें तें रात्रीं बरेंच कमी झालें व लोकांच्या जिवांत जीव येऊं लागला. तोंच तोफा झडल्या, बंबखाने जागोजाग आहेत त्यांतून बिगुलें फुंकलीं व चौकशी करतां कळलें कीं, सयाजी सरोवरांत पाणी फार झाल्यानें तें सोडून देत आहेत व पुनः पाणी चढणार !

पुनः लोक हवालदील झाले. त्या रात्रीं झोंप कोणाला येणार ? पाणी पुनः मध्यरात्रीं चढलें, पण तें सोमवार रात्रींपेक्षां अर्धा फूट कमी चढलें व बुधवारीं सकाळला बरेंच हटलें. मंगळवारीं सकाळीं संपणाऱ्या २४ तासांत १४ इंच व बुधवारीं १० इंच पाऊस झाला ! कॉलेजच्या पटांगणावरील वेधशाळा वाहून गेली, पण इतर पर्जन्यमापकांवरून आंकडा घेतला.

**शर्थीनें बचावलेलें मूलः**—बुधवारीं पाणी कमी असल्यानें जिकडे तिकडे हिंडतां येऊं लागलें, परंतु सयाजीगंज-स्टेशनची हालहवाल कळली नाहीं. नदींतून वाहत जाणारीं प्रेतें दर दहादहा मिनिटांनीं दिसत होतीं. पाण्यांत घातलेलें एक गोजिरवाणें बाळ हॉस्पिटलच्या ओढ्यांतून वाहत आलें, तें भोई लोकांनीं धरलें व अद्याप मातृविभागांत सुस्थितींत आहे. हें बाळ आधुनिक काळचा कबीर-नामदेव ठरतें, कीं एखाद्या मोठ्या इस्टेटीचें वारसदार ठरून एकाद्या कादंबरीचा नायक ठरतें तें पाहावयाचें आहे. त्याचे आईबाप जिवंत असून ते त्याचा शोध करीत असतील, कीं ते महासागरांत लीयमान झाले असतील ? एका मराठा बाईनें तारेच्या खांबावर चढून आपला बचाव करून घेतला; व आपलें वस्त्र लोंबकळत सोडून नवऱ्यास वर खेंचून घेतलें, व तशा स्थितींत ते छत्तीस तास राहिले होते. एका जन्मठेपीच्या कैद्यानें तारेवर अडकलेल्या कित्येक इसमांचा बचाव केला. त्याच्या शौर्यामुळें त्याला बिनशर्त मुक्त करण्यांत आलें. सोमवारपासून झाडांवर बसून राहिलेल्या चारपांच इसमांना बुधवारीं पाण्याचा जोर कमी झाल्यावर होड्यांतून आणिलें. एक इसम मात्र भूक व झोंप यांच्या ग्लानीनें झाडापासून सुटून पाण्यांत पडून मेला !

**प्रेतें पाण्यांत टाकून दिलीं**:—एका ख्रिस्ती गृहस्थाचें मूल रोगानें मेलें. त्याला तीन दिवस मूठमाती देण्याचें थांबविलें. पण प्रेताला घाण येऊं लागल्यानें निरुपायानें तें ट्रंकेंत घालून पाण्यांत सोडून दिलें. चोरांना ट्रंकेंत ऐवज असेलसें वाटून त्यांनीं ट्रंक फोडली. मूल बाहेर फेंकून दिलें, तें पूर ओसरल्यावर छिन्नविच्छिन्न गवसलें. एका हिंदु बाईचें प्रेत पाण्यांत टाकून दिलें, कारण जाळण्याच्या स्मशानावर दोन पुरुष पाणी होतें. गुरुवारीं तें प्रेत इंदिरा एवेन्यू रस्त्याच्या पायपथावर पडलेलें दिसलें. दोन माणसें ड्रेनेजच्या मॅनहोलांत मेलेलीं सांपडलीं. याप्रमाणें बुधवारचा दिवस गेला. पूर ओसरला होता, पण पाऊस कमी नव्हता. उद्यां गुरुवार अमावास्या. उद्यां पाऊस हटेल असें सर्वांस वाटूं लागलें. कारण पौर्णिमा व अमावास्या या दिवशीं हवेंत बदल होतो. बुधवारीं दिवसां व रात्रीं मिळून १० इंच पाऊस झाला. याप्रमाणें रविवार ते बुधवारपर्यंत ४ दिवसांत ४३ इंच पाऊस झाला. पूर्वीचा ३४ व हे ४३ मिळून ७७ इंच पाऊस ४९ दिवसांत झाला! या वेळचा सरासरी पाऊस फक्त १५ इंच असतो!

( ३ )

**आप्पलपोटेपणाची कमाल**:—कँपांत ( गु. कापांत ) कमी अनर्थ झाला नाहीं. सर्व घरांचे तळमजले अर्धेअधिक पाण्यांत बुडाले असल्यानें लोक माड्यांवर बसून राहिले होते. कचीं घरें कोसळत होतीं. पोस्ट-मास्तर व त्यांची पत्नी अशीं दोघें पोस्टांत पाणी शिरलें तेव्हां टेबलावर बसलीं, टेबलावर पाणी आलें तेव्हां त्याच्यावर पेटी व पेटीवर पाणी आलें तेव्हां तिच्यावर खुर्ची ठेवून १८ तास होतीं. कांहीं गोऱ्या रेल्वे अधिकाऱ्यांनीं त्यांची स्थिति पाहिली. परंतु जवळ होडी असूनहि त्यांस मदत केली नाहीं. रोमन कॅथालिक चर्चच्या घंटा-घरावर तीस ख्रिस्ती इसम दाटीदाटीनें बसून राहिले होते, ते एकंदर ४८ तास तसेच होते. आमच्या गोऱ्या होडीवाल्यांनीं त्यांच्यापैकीं एक युरोपियन बाई व दोन मुलें काय तीं काढलीं. बाकीच्यांना तसेंच ओरडत व चर्चची घंटा जोरानें वाजवीत ठेविलें!

पण या गोऱ्या लोकांना हंसावयास नको. घाची ( गुजराथी तेली )

लोकांची एक होडी दांडियाबाजारांतून फिरत होती, ती फक्त घाची लोकांनाच मदत करीत होती; इतर लोकांची कितीहि भयानक परिस्थिति असली तरी तिच्याकडे ते लक्ष देत नव्हते. सरकारी किताब धारण करणारा एक हिंदु आपल्या नातलगांसहि आपल्या बंगल्यांत फिरकूं देत नव्हता; व ज्याप्रमाणें मुजुमदार, तांबे, पावसकर, नवाथे प्रभृति गृहस्थ चार दिवसपर्यंत झीज सोसून येणाऱ्या सर्वांस दरवाजे उघडे ठेवून त्यांचा पाहुणचार करीत होते, त्याप्रमाणेंच अनेक गृहस्थ स्वतःचें घर शाबूत असून इतरांस आंत येण्यास मज्जाव करून कृपण व दुष्ट मनोवृत्ति प्रकट करीत होते. माणसांची व घरांची उत्तम परीक्षा या वेळीं होत होती.

**वातावरणांत सजीवता आलीः**—गुरुवार रोजीं दुपारीं पाऊस बंद होऊन अमावास्येचा अनुभव आला. पूर भराभर ओसरून गेला. शुक्रवारीं सकाळीं सयाजीगंज व शहर यांच्या दरम्यान जातां येतां येऊं लागलें. मोठ्या पुलाचा एक कठडा साफ वाहून गेला. चार दिवसांत पाळीवखेरीज एकहि पक्षी दृष्टीस पडला नव्हता. पण सकाळींच कोकिळांनीं कूजन करून दुर्दिन दूर झाल्याची घोषणा केली. कावळे, चिमण्या, मैना हिंडूं लागल्या व वानरें अर्ध्या मोडलेल्या घरांचा निकाल लावण्यासाठीं त्यांच्यावरून उड्या मारूं लागलीं.

पुराचे वेळी लोकांना मदत करणाऱ्या गृहस्थांचीं नांवें वर दिलींच आहेत. त्याशिवाय राजपुत्र श्री. धैर्यशीलराव यांचें नांव न देणें अक्षम्य होईल. श्रीमंत भर पावसांत व पुरांत घोड्यावरून हिंडून लोकांना काढण्याचें काम अविश्रांतपणें करीत होते. पूर ओसरल्यावर त्यांनीं हातांत कुदळफावडें घेऊन पडलेल्या घरांचा काट माल व्यवस्थेशीर लावण्याचें काम जातीनें केलें. पूर-दुःखनिवारण मंडळाचे ते अध्यक्ष आहेत व ५००० रुपये फंडास स्वतःच्या पैशांतून त्यांनीं दिले आहेत. प्रो. माणिकराव यांनीं सरकारांतून हत्ती आणवून माड्यांवर अडकून धोक्यांत राहिलेलीं २० कुटुंबें सुरक्षित स्थळीं आणिलीं. क्रिकेटपटु वि. ना. अभ्यंकर व त्यांचे मित्र यांनीं पत्र्यांचा तराफा करून तेंच काम केलें. आतां फंड गोळा करणें, गोरगरीबांस मदत करणें

वगैरे कामें करणाऱ्या लोकांचीं नांवें आपल्या सोसायटीचे बातमीदार येथें आले आहेत ते देतीलच.

पुरानंतर चोऱ्यांना ऊत आला, परंतु स्वयंसेवकांच्या वीस चमूंनीं शहरचा बंदोबस्त उत्तम ठेविला आहे. श्री. सरदार मुजुमदार व त्यांच्या पत्नी, प्रो. आपटे व जोशी, डॉ. जोशी, कॅ. जाधव इ. मंडळीहि रात्रीं जागून पहारा करीत असते.

**घ्यावयाचा उपदेशः**—पुरानें काय शिकविलें? वाइटांतून चांगलें निघतें त्याप्रमाणें पुरानेंहि चांगल्या गोष्टी केल्या आहेत. हिंदु व मुसलमान यांच्यांत शिवाजी-उत्सवापासून जी तेढ सुरू झाली होती ती मिटली व श्रीमंत-गरिबांतला भेदहि किती त्याज्य असतो हें दाखवून दिलें. बडोदें हें आखाड्यांकरितां प्रसिद्ध आहे. मुसलमानांचा मारामारींत पाडाव केला तो आखाड्यांतील विद्यार्थ्यांनीं व पुरांत लोकसेवा केली तीहि त्यांनींच. जागोजाग व्यायामशाळा स्थापण्याची व पोहण्याचे तलाव काढण्याची किती जरूर आहे हें समजलें. प्रत्येक पुरुषालाच काय पण प्रत्येक स्त्रीला पोहतां येईल तर अशा प्रसंगीं कोणीहि डगमगणार नाहीं. शहरांत होड्यांचा संग्रह असला पाहिजे व तो करण्यासाठीं नौकांचे अड्डे (बोटिंग क्लब) जागोजाग स्थापन झाले पाहिजेत. बडोद्याच्या सुरसागरांत बोटिंग क्लब असता तर नावांचा तुटवडा भासला नसता.

बडोद्यांतील प्रत्येक ठिकाणची सपाटी काय आहे, हें आतां ईंचाच्या दशमांशापर्यंत बिनचूक समजलें आहे. पाण्याच्या खुणा आणखी दोनतीन वर्षें नष्ट होणार नाहीत. त्यांची नोंद ठेवून नवीन घरें बांधतांना त्यांचें जोतें पुराच्या कमाल मर्यादेपर्यंत ठेविलें पाहिजे, असा नियम म्यु.नें करावा. चुन्याचें घर पडलें नाहीं, हें लक्षांत ठेवून घराच्या निदान पश्चिम व दक्षिण भिंती होतां होईतों चुन्यांत केल्या पाहिजेत. त्या दिशांस वडपिंपळासारखा वृक्ष पडतांना घराच्या आटोक्यांत येईल इतका उंच वाढूं देऊं नये. येथलीं बरींच घरें झाडांच्या योगें चुरा झालेलीं आहेत. येथल्या भुसभुशीत जमिनींत झाडें आपलीं मुळें बळकट रोवून बसत नाहींत, यामुळें, जरा वादळ आलें कीं,

वृक्ष पडण्याचा महाराष्ट्रास अपरिचित देखावा दिसतो. बडोद्यांतील खानेसुमारीप्रमाणें २१०० घरें जमीनदोस्त झालीं आहेत, २५०० घरांस तडे जाऊन तीं खिळखिळीं झालीं आहेत व बाकीच्यांचें आयुष्य निदान पांच वर्षांनीं कमी झालें आहे. खेडयापाडयांची स्थिति दारुण झाली आहे. घरेंदारें, बैल व आउतें यांचाच पत्ता नाहीं तर पिकांची स्थिति कशी आहे कोण विचारतो? गुजराथेनें महाराष्ट्राला वारंवार मदत केली आहे व कित्येक महाराष्ट्री संस्था गुजराथ्यांच्या पैशावरच चालल्या आहेत. महाराष्ट्राचा हात नेहमीं पसरलेला असावा हें अभिमानास्पद नाहीं. या प्रसंगीं महाराष्ट्र आपल्या दारिद्र्याची पुरचुंडी सोडून गुजराथेच्या मदतीस धांवणार नाहीं काय?

आज ३–४ दिवसांपासून पर्जन्यानें उघाड दिली असून शहरांतील बहुतेक व्यवहार सुरू झाला आहे. २–३ दिवसांपासून तारेचा व पोस्टाचाहि बहुतेक व्यवहार सुरू झाला आहे. मुंबईकडील आगगाडीचा व्यवहारहि २–३ दिवसांत चालू होईल असें वाटतें. शहरांतील सडलेल्या धान्याची व मेलेल्या जनावरांची वगैरे व्यवस्था शहर सुधराईकडून कैद्यांच्या व रयतेच्या मदतीनें बहुतेक साफ होत आली आहे. शहरांत ठिकठिकाणीं संकटनिवारणार्थ लोकांकडून मदतीसाठीं मंडळी फिरत असून बाहेरगांवाहूनहि बरीच मदत व आश्वासनें येऊं लागलीं आहेत. शहर म्युनिसिपालिटीकडून ज्या लोकांचीं घरें पडलीं असतील त्यांस बिन-परवानगीनें व बिन-लागतीनें मूळच्या पायावर घरें पुन्हां बांधण्याची सवलत देण्यांत आली आहे. भयंकर जलप्रलयानें जमीनदोस्त झालेल्या घरांची संख्या २५०० वर असून कमीजास्त पडलेल्या घरांची संख्या ४००० जवळ असल्याचें सरकारी तपासणीवरून समजतें. बडोदें शहरांत घरें वगैरे पडल्यानें ५० मनुष्यें दगावलीं असून खेडेगांवांतून पुष्कळ प्रेतें नदींतून वाहत आलेलीं जाळण्यांत आलीं.

**सरकारी मदतः**—श्रीमंत सरकारकडून नामदार दिवाणसाहेब कृष्णमाचारी यांच्या सहीनें आज रोजीं सरकारी आज्ञापत्रिकेंत ( गव्हर्मेंट गॅझेटमध्यें ) असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे कीं, स्थानिक अंमलदारांनीं सरकारी धर्मशाळा व इमारती निराधार लोकांस आश्रयासाठीं तात्कालिक रिकाम्या करून द्याव्यात. तसेंच बडोदें प्रांताकरितां तूर्त कपडे व खुराकाकरितां रु. पंधरा

हजार व चालचलाऊ झोंपड्या बांधण्याकरितां रुपये दहा हजार मंजूर करण्यांत आले असून मे. अलोनी सरसुभेसाहेब यांचेमार्फत ही व्यवस्था करण्यांत आली आहे. तसेंच मे. सरसुभेसाहेब यांनीं दरेक तालुक्यांत व गांवांत किती व कशा प्रकारचें नुकसान झालें आहे याचा तपास करून संपूर्ण माहिती सरकारांत सादर करावी. दरम्यान बडोदें प्रांताकरितां शेतीकरितां बीं व जनावरें यांकरितां पंचवीस हजार रुपयांचें तगाई लोन देण्यांत यावें. शेतकी खात्याचे डायरेक्टर मे. सानेसाहेब यांचेमार्फत शेतकऱ्यांस बीं-बियाणें तात्कालिक देण्याकरितां तूर्त पांच हजार रुपयांची मदत देण्यांत आली आहे. खेडेगांवांतील लोकांस घरें बांधण्याकरितां लांकडें, रेती, दगड वगैरे फुकट देण्याबद्दल मे. सरसुभेसाहेब यांनीं सत्वर जाहिरनामा प्रसिद्ध करावा व सवड असेल तेथें जंगलखात्याकडून स्वस्त्या किंमतींत घरें बांधण्याजोगा इमारतींसाठीं माल देण्यांत यावा. गरीब लोकांस लहान लहान रकमा तगाईच्या शर्तीनें द्याव्यात. गरीब लोकांस तगाई सत्वर व बरोबर मिळत असल्याबद्दल वहिवाटदार यांनीं स्वतः जातीनें खात्री करण्यासाठीं फिरत जावें. ज्या सरकारी नोकरांचीं घरें वगैरे पडलीं असतील त्यांनीं त्यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत लोन मिळण्याकरितां अर्जी करावी. बडोदें प्रांताचे सुभेसाहेब यांचे सहीनें असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे कीं, हल्लींच्या भयंकर आपत्प्रसंगीं निराधार लोकांस मदत देण्यांत येईल. अशा रीतीनें सर्व व्यापारीवर्गानें वागण्याची त्यांची फरज असून इमारती-उपयोगीं दगड, विटा, चुना, माती, धान्य, तूप, तेल, दूध, भाजीपाला वगैरे वस्तू कोणीहि जास्त किंमत घेऊन विकूं नयेत. याविरुद्ध वर्तन करण्यांत आल्यास सरकार त्यांस योग्य ती शिक्षा करील. तसेंच रेडक्रॉस सोसायटीचे मंत्री व चीफ मेडिकल ऑफिसर डॉ. चंद्रचूडसाहेब यांजकडून फिनाइल व क्रूड ऑइल मोफत मिळण्याबद्दल प्रसिद्ध करण्यांत आलें आहे.

**महाराजांची तारः**—येथील नवीन वर्ष ता. १ ऑगस्टपासून सुरू होत असून चालू सालचें राज्याचें खर्चाचें बजेट जरी श्री. महाराजसाहेबांकडून मंजूर होऊन आलें आहे, तरी खर्चाचे बाबतींत दरेक खात्यानें चालू परिस्थिति लक्षांत घेऊन शक्य तितकी बचत करण्याबद्दल हुकूम झाला आहे. एकंदरींत येथें शहरांत सुमारें १५००० लोक आज निराधार झाले असून सरकार व प्रजावर्ग

शक्य त्या रीतीनें आपआपल्यापरी मदत करीत आहेत. कचेऱ्या सोमवार ता. १ पासून सुरू झाल्या असून न्यायमंदिरहि आजपासून सुरू झालें आहे. कॉलेज, कलाभवन व इंग्रजी हायस्कूल येत्या ता. ८ पासून सुरू होईल. श्रीमंत महाराजसाहेबांकडून आज रोजीं एवियाहून 'Do all you can to help the distressed' अशी पुन्हा दुसरी तार आली आहे. अतिवृष्टि-संकटनिवारणार्थ दीड लक्ष रुपयांची तगाईनें प्रांतवार देण्याकरितां मजूर झाल्याचें समजतें. या राज्यांतील वातनी शेट किलाचंद देवचंद यांनीं मुंबईहून येथील निराधार फंडास रु. २५००, खेडेगांवांतील संकटग्रस्त लोकांसाठीं २५०० व बडोदा कँपांतील निराधार लोकांस रु. २५०० मिळून एकंदर साडेसात हजार रुपयांची तारेनें मदत केली आहे. येथील स्वामी श्रीविद्यानंदजीमहाराज हल्लींच्या संकटनिवारणार्थ धर्माच्या कार्यासाठीं भक्तमंडळीसह शहरांत मदतीसाठीं भिक्षा मागत फिरत असून त्यांनीं आज ४-५ दिवसांत धान्य, कपडे व रोकड मिळून सुमारें १०-१२ हजार रुपयांची मदत मिळविली असल्याचें समजतें. तसेंच प्रांतांतील पट्टण येथील शेट न्याहालचंद लल्लूभाई यांनीं नामदार दिवाणसाहेबांकडेच दोन हजार रुपये पाठविले आहेत. अतिवृष्टि-संकटनिवारणार्थ फंडाच्या मदतीसाठीं समितीमार्फत येत्या रविवार ता. ७ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां प्रो. माणिकराव यांचे व्यायामशाळेंतून एक मोठी मिरवणूक कमेटींतील सभासद, ऑफिसर, शेठसावकार, व्यापारी व नागरिक जन यांसह सर्व शहरभर निघणार असून त्या प्रसंगीं लोकांनीं रोकड व कापड यांची मदत करावी, असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. बडोदें प्रांताप्रमाणें कडी प्रांतांत पाटण, सिधपूर, विसनगर वगैरे भागांतहि ३०-४० इंचांवर पर्जन्य पडून हजारों घरें व गुरांचा नाश झाल्याच्या खबरा येत आहेत. बडोदें प्रांतांत पेटलाद, वाघोडिया, भादरण, सावळी वगैरे ठिकाणीं तर ४ दिवसांत सुमारें ५० इंचांपर्यंत पर्जन्यवृष्टि होऊन शेंकडों घरें जमीनदोस्त झालीं असून मनुष्यें, जनावरें यांची प्राणहानीहि पुष्कळ झाली आहे. शेती तर सर्वस्वीं सर्व भागांतील साफ धुऊन गेली असून खरीपाच्या पिकांची आशाहि पुढें राहिली नाहीं. सारांश, अतिवृष्टीमुळें झालेल्या भयंकर नुकसानीपासून लोकांस मदत करण्यासाठीं सरकार, व्यापारी, अधिकारी व इतर

लोकांकडून शक्य तितके प्रयत्न होत असून बाहेरगांवांहून मदती येत आहेत. तरी पण या महासंकटांतून पार पडण्यास पुष्कळ द्रव्याची, कार्यवाहकांची व स्वयंसेवकांची हल्लीं अत्यंत जरूरी असून निराधार झालेल्या खेडेगांवांतील शेतकऱ्यांची स्थिति तर अत्यंत करुणाजनक व हृदयद्रावक झाली आहे. त्यांस शहरांतील लोकांपेक्षांहि खऱ्या मदतीची अत्यंत आवश्यकता आहे.

अतिवृष्टीच्या भयंकर आपत्तीमुळें व दैवी कोपानें बडोदें राज्यांतील अर्धा भाग व गुजराथेंतील बराच भाग पायमल होऊन गेला असून रेल्वे व्यवहार व टपाल आतां बहुतेक चालू झालें असल्यामुळें प्रत्यक्ष नजरेनें पाहिलेलीं व अनुभविलेलीं शेंकडों मनुष्यें हल्लीं येथें येत आहेत. त्यांच्या करुणाजनक स्थितीनें व कहाणीनें कठोर-हृदयी मनुष्यांच्या अंतःकरणासहि पाझर फुटल्याशिवाय राहणार नाहीं. बडोदें राज्यांतील चार जिल्ह्यांपैकीं बडोदें प्रांतांत तर बहुतेक खेड्यांतील जनावरांचा, घरादारांचा सर्वस्वीं नाश झाला आहे. कडी प्रांतांत हजारों घरें पडून शेंकडों गांवें व खेडीं घरादारांवांचून बेचिराख झालीं आहेत. या भागांत शेतीच्या पिकास मात्र नुकसानी कमी होण्याचा संभव आहे. नवसारी प्रांतांत व काठेवाडांतील गायकवाड सरकारच्या ताब्यांत असलेल्या अमरेळी प्रांतांत अतिवृष्टीनें फारसें नुकसान लागलेलें नाहीं. एकंदरींत बडोदें राज्यांतील अर्ध्या भागांत जलप्रलयानें भयंकर नुकसान पोहोंचलें असून या कोपामुळें आपत्तींत आलेल्या खेडेगांवांतील सर्वस्वीं निराधार झालेल्या शेतकरी वर्गास आतां सर्व प्रकारच्या मदतीची आवश्यकता आहे. जर त्यांचें रक्षण अशा विपन्न स्थितींत झालें नाहीं तर राज्यांतील पुढील स्थिति मुळींच सुधारणें शक्य नाहीं. बडोदें हें राजधानीचें शहर असल्यामुळें येथें नोकरचाकर व व्यापार, उद्योग पूर्ववत् सुरू झाल्यासारखें दिसूं लागलें आहे. पुष्कळ धनिक नागरिकांकडून, दयाळू परोपकारी लोकांकडून व सरकारी रीतीनें मदत मिळाल्यामुळें येथील लोकांपेक्षां खेडेगांवांतील गरीब शेतकऱ्यांच्या पुढील स्थितीकडे लोकांनीं व सरकारांनीं आतां पाहावयाला सुरुवात केली आहे.

(यापुढील भागांत वेगळाल्या संस्थांनीं, व्यक्तींनीं आणि सरकारनें केलेल्या मदतीचें वर्णन दिलें होतें, तें आतां कंटाळवाणें वाटण्याचा संभव असल्यानें गाळून टाकलें आहे.)

---

# उत्तर काठेवाडचा प्रवास : : : : ५

सरकारी नोकरीच्या निमित्तानें उत्तर काठेवाडांत फिरण्याचा योग मला १९२९ मध्यें प्रथम आला. पांच वर्षांपूर्वी जुनागडच्या सफरींत दक्षिण काठेवाडच्या सोरठ भागांत संचार झाला होता. उत्तर काठेवाडांत द्वारका असल्यानें कामाबरोबरच तें 'धाम' उरकून घ्यावें अशा विचारानें घरांतील मंडळीस बरोबर घेतलें आणि मावशीसहि पुण्याहून बोलावून आणून यात्रेंत समाविष्ट केलें. एके संध्याकाळीं काठेवाड एक्सप्रेसनें बडोदें सोडलें. विरामगांवास ती गाडी विराम पावली. हें शहर इंग्रजी मुलूख आणि संस्थानी प्रदेश यांच्या सीमेवर आहे. काठेवाडांतील संस्थानिक मुंबईच्या व्यापाऱ्यांशीं चढाओढ करून इंग्रज सरकारचें जकातीचें उत्पन्न बुडवितात अशी ओरड मुंबईच्या वणिक्‌वर्गानें केल्यामुळें इंग्रज सरकारनें विरमगांवच्या स्टेशनवर जकातीची कोंडी केली आहे. उतारूंचें सर्व सामान येथें तपासून पाहतात. जकात चुकविण्याच्या नाना प्रकारच्या हिकमती प्रवासी करतात आणि तपासणी-अधिकारीहि उतारूंस डब्यांत कोंडून ठेवून त्यांची चांगलीच विटंबना करितात.

विरमगांवास मीटर मापाच्या गाडींत आम्ही बसलों. सकाळच्या वेळीं वांकानेर शहराजवळून गाडी जाऊं लागली. हें टेकडीच्या पायथ्यावर नदीच्या कांठीं पांढऱ्या सफेत पोरबंदरी दगडानें बांधलेलें सुंदर शहर उतारूंच्या

डोळ्यांस फारच आल्हाददायक वाटतें. नाटकाच्या पडद्यावर काढलेला देखावा विजेच्या प्रकाशांत जसा रम्य दिसतो तसेंच हें शहर दिसत होतें. ह्या भागांत मोर-लांडोरी इतस्ततः बागडत असलेल्या पाहून मुलांस फार मौज वाटत होती.

सकाळीं नऊ वाजतां राजकोट जंक्शन स्टेशनावर आम्हीं ही गाडी सोडिली आणि जामनगर-द्वारका रेल्वेच्या गाडींत बसलों. पूर्वी राजकोटपासून जामनगरपर्यंतच रूळवाट होती. जामनगरपासून द्वारकेवरून ओखाबंदरापर्यंतची वाट १९२४ सालीं सुरू झाली. त्याच्या अगोदर द्वारकेची यात्रा पोरबंदरवरून समुद्रमार्गानें किंवा जामनगरपासून बैलगाड्यानें करावी लागे. जामनगर सुटल्यावर पुढील भूमिभाग अगदीं रूक्ष, निर्जन व निर्जल आहे. त्रिधारी निवडुंगाशिवाय दुसरें कसलेंहि झाड दृष्टीस पडत नाहीं. मोर-लांडोरींची संख्या कमी होऊन हरिणांचे कळप असंख्य दृष्टीस पडतात. संध्याकाळीं गाडीच्या दोन्ही अंगांस समुद्राचें पाणी असल्याचा भास झाला. डाव्या हातास समुद्र आणि उजव्या हातास कच्छचें आखात आहे, असें एका सहप्रवाश्यानें सांगितलें. नवानगर ( जामनगर ही ज्याची राजधानी आहे तें ) संस्थानच्या हद्दींतून आतां आम्हीं गायकवाड सरकारच्या ओखामंडळ तालुक्यांत प्रवेश केला.

ओखामंडळ ( संस्कृत उषामंडळ ) तालुक्यांत चांगलीं मिठागरें आहेत. येथें पाऊस फार कमी असल्यानें मीठ पिकविण्यास दीर्घ अवधि मिळतो आणि त्यामुळें मिठापासून गायकवाड सरकारास बरीच किफायत झाली असती. परंतु हिंदुस्थानच्या दुसऱ्या टोंकास असणाऱ्या बंगाल प्रांताशिवाय इतरत्र ओखामंडळांतील मिठाची निर्यात करण्यास इंग्रज सरकारचा प्रतिबंध आहे ! त्यायोगें वाहतुकीचा खर्च किंमतीवर चढून हें मीठ विलायती मिठा-इतकेंच महाग पडतें. आमच्याच गायकवाडी राज्यांत उत्पन्न होणारें मीठ आम्ही आफ्रिकेंत व बंगाल्यांत पाठवितों आणि आम्ही उरणच्या आगरांतलें मीठ खातों. द्राविडी प्राणायामाचा हा मासला और आहे असें कोणीहि म्हणेल. ओखामंडळांत मात्र एक रुपयाला पक्का मणभर मीठ मिळतें.

गाडीच्या जवळच तयार मिठाचे ढीग पडले होते. ऋषिपंचमीस उपयोगी

पडावें म्हणून दोनचार ओंजळी मीठ आम्हीं शिपायांकडून चोरविलें आणि सामानांत कोंबलें.

द्वारका स्टेशन दोनतीन कोसांवर राहिलें तेव्हां तेथील दगडी घरें, त्यांच्या मधोमध असणारें मंदिराचें उंच शिखर आणि द्वारकानगरीच्या पलीकडील समुद्र यांचा भव्य देखावा दिसूं लागला. स्टेशन येतांच गोर ( पंड्ये, बडवे ) लोकांचा घोळका भोंवतीं जमला. त्यांच्यांतून मार्ग काढीत आम्हीं गाडी ठरवून सरकारी मुशाफरी बंगला गाठला.

दुसऱ्या दिवशीं आम्ही गांवांतल्या बोळांतून वाट काढीत मंदिरीं गेलों. वाटेंत 'बाजू !' असें ओरडत एक मनुष्य चालला होता आणि सर्व वाटसरू त्याच्या गर्जनेस भिऊन आजूबाजूच्या भिंतींत दडत होते. गाडीबिडी दिसत नसून बाजूस होण्याची सूचना कशी मिळत आहे असें आश्चर्य वाटून मी मागें वळून पाहतों तों लोकांनीं "भंगिओ छे ! बाजू हये !" अशी ताकीद दिली. ह्या बनावावर प्रवचन ठोकण्याचा मोह मी आंवरून धरतों. सुज्ञेषु किंबहुना ?

मंदिराच्या भव्य आवाराभोंवतीं कोटवजा हवेली आहे. तींत सरकारी कचेऱ्या आहेत.

मंदिर फारच मोठें आहे. त्याच्या कळसाची उंची सुमारें सवाशें फुट असावी. कळसावर एक भलें मोठें तिरंगी निशाण फडकत होतें. आदल्या दिवशीं एका कॉंग्रेस-भक्तानें पांचशें ब्राह्मणांस भोजन घातल्यामुळें त्याच्या गौरवार्थ हें वीस वार कापडाचें निशाण आज चढविलें होतें. द्वारकेच्या गुगळी ब्राह्मणांस जो भोजन घालील त्याचा झेंडा असा उंच राहतो.

द्वारकाधीशाचें दर्शन घेण्यास आम्ही गेलों तेव्हां देव्हाऱ्याचें दार बंद होतें. बरेच स्त्रीपुरुष दार उघडण्याची वाट पाहत होते. चारपांच माळी-माळिणी फुलांचे व तुळशीचे हार गिऱ्हाइकांस विकीत होत्या. ह्या रूक्ष प्रदेशांत मोगऱ्याचे व गुलाबाचे हार इतके स्वस्त कसे मिळतात कोण जाणे ? कांहीं वेळानें दार उघडलें. द्वारकाधीशाचें दर्शन होतांच भक्तजन आनंदित झाले. देवाभोंवतीं पंचारती ओवाळण्यांत आली. घंटा, शंख आणि नगारा ह्यांचा

घोष झाला. 'जय द्वारकाधीश !'च्या गर्जनेंत आरती संपली. मग आम्ही मंदिराचे नागमोडी जिने चढत व एक जिना संपवून दुसऱ्या जिन्यांत प्रवेश करतांना खोल खोल होत जाणाऱ्या सभामंडपाकडे पाहत डेऱ्यावर गेलों. डेरा म्हणजे सभामंडपावरील घुमट. ह्या डेऱ्यास दिवे ठेवण्यासाठीं शेंकडों टेंगळें केलीं आहेत; तीं लाडवांसारखीं दिसतात म्हणून ह्या डेऱ्यास 'लाडवा डेरा' असें क्षेत्रोचित नांव पडलें आहे.

डेऱ्यावरून दृष्टि दूरवर फेंकतां येते; पश्चिमेस क्षितिजापर्यंत पसरलेल्या सागराच्या मृगागमदर्शक प्रचंड लाटा; पूर्वेस दूरवर पसरलेलें माळरान व त्या बाजूच्या क्षितिजाशीं चमकणारी कच्छच्या आखाताची रुपेरी किनार; उत्तरेस आणि दक्षिणेस न संपणारें माळरान आणि खालीं गांवांतील वाड्यांचीं छपरें असा देखावा दिसत होता. अंगास वारा जोरानें लागत असल्यामुळें पडण्याच्या भयानें आम्ही कळसास टेकून उभे होतों. डोळ्यांचें पारणें फिटल्यावर खालीं उतरून आम्ही देवळांतील उपमंदिरांचें दर्शन घेऊं लागलों.

मुख्य मंदिर श्रीकृष्णाचें आहे, पण त्याच्या अभिमुख गरुडाचें देऊळ नसून देवकी माताजींचें देऊळ आहे. एका अंगास बळरामदादांचें मंदिर आहे. आम्ही गेलों त्या वेळीं दादांच्या जलक्रीडेची तयारी झाली होती. मंदिराच्या छोट्या सभामंडपांत झाडांच्या फांद्या उभ्या करून बागेचें दृश्य बनविलें होतें. मधोमध एक मोठें पीप पाण्यानें भरून ठेविलेलें होतें व त्यांत एक सहा आणेवाली होडी तरंगत होती. जस्ती पत्र्याचीं दोन बदकेंहि त्यांत संचार करीत होतीं. रबरी नळीचें एक कारंजें पाण्याची धार उडवीत होतें. ह्या सर्व खटाटोपाचा उपयोग बळरामदादांना होत असो कीं नसो, पण बाहेरील उष्णतेंतून या सभामंडपांत आल्याबरोबर आम्हांस मात्र थंड वाटलें.

मंदिराच्या आवारांत श्रीशंकराचार्यांचा मठ आहे. हा शारदा मठ चार धामांपैकीं एक असल्यानें त्यांत मोठा थाटमाट असेल असें आम्हांस वाटत होतें; परंतु प्रत्यक्ष अगदींच शुकशुकाट वाटला. श्री एका व्यासपीठावर विराजमान होऊन जमिनीवर बसलेल्या एका गृहस्थास कसला तरी हिशेब सांगत होते. आसपास जागा झाडणाऱ्या गड्याशिवाय कोणीहि मनुष्य उभें

नव्हतें. ह्यावरून श्रींनीं विशेष लोकप्रियता वा पूज्यता संपादित केली नव्हती असें अनुमान आम्हीं केलें.

मंदिराच्या दक्षिणद्वारानें बाहेर पडून चोपन्न दगडी पायऱ्या उतरून गोमती कुंडाशीं आलों. तेथें कांठाशीं श्रीशंकराचार्यांचें मंदिर नवथर बांधिलें असून, जसे जैन-मंदिरांत सारखे सारखे चोवीस तीर्थंकर बसविलेले असतात तसे, त्यांत आद्य शंकराचार्यांपासूनचे ५-२५ आचार्य संगमरवरी मूर्तींच्या रूपानें बसविले आहेत. त्यांचें दर्शन घेऊन आम्ही गोमती कुंडावर गेलों. यात्रेकरू लोक प्रथम कुंडावर स्नान करून नंतर दर्शन घेतात.

गोमती कुंडावर सरकारी कराचा एक रुपया व ग्रामपंचायतीचे कराचा एक आणा याप्रमाणें रु. १-१-० भरावा लागतो (१९२८). या कुंडांत एका नाल्यावाटें समुद्राचें पाणी आणून सोडिलें आहे. कुंडाभोंवतीं पायऱ्या आहेत व त्यांवर सहस्रावधि खेकडे चिकटून बसलेले असतात, पण ते भाविक यात्रेकरूंच्या वाटेस जात नाहींत. कुंडाच्या घाणेरड्या पाण्यांत बुचकळी मारून गंध लावून पैसा उपटूं पाहणाऱ्या भिक्षुकांस हुलकावण्या देत आम्ही मुक्कामावर परत आलों.

दुसऱ्या दिवशीं समुद्रकिनाऱ्याने फिरत आम्ही श्री रुक्मिणीच्या मंदिराशीं गेलों. ह्या पांढऱ्या दगडाच्या लहानशा मंदिराच्या भिंतीवरील चित्रांचे कडपे खाऱ्या हवेमुळें तुटून पडत चालले आहेत. गोकुळांतील लीलांची पुनरावृत्ति श्रीकृष्णानें द्वारकेंत सुरू केल्यामुळें रुक्मिणी रागावून एक कोसावरील ह्या मंदिरांत येऊन बसली. अद्यापि श्रीकृष्णानें तिची समजूत घातली नाहीं. पंढरपूरला देखील रखमाई वेगळया देवळांत उभी आहे असें आम्हीं ऐकिलें. ह्या मंदिराजवळच रूपेण नांवाचें उघडें बंदर आहे. नोव्हेंबरपासून मेपर्यंत या बंदरीं मुंबई-कराची लाइनीच्या आगबोटी धक्क्यापासून दीड मैलावर नांगरतात. आम्ही जूनमध्यें गेलों असल्यानें आगबोटी, गलबतें इत्यादि जलयानांचा मागमूसहि नजरेस पडला नाहीं. रुक्मिणी मंदिरापासून थोडयाच अंतरावर सीमेन्ट करण्याची गिरणी आहे. दगडी कोळसा लांबून आणावा लागत असल्यानें तिची व्हावी तशी भरभराट होत नाहीं (१९२८).

द्वारकेस चारपांच दिवस राहून आम्ही बेट शंखोद्धार येथें जाण्यास निघालों. बेटास जाण्याचे दोन मार्ग आहेत; एक आगगाडीनें ओखा बंदरापर्यंत व तेथून मचव्यानें; किंवा दुसरा सडकेनें मिंदरडा बंदरापर्यंत व तेथून मचव्यानें. मिंदरड्याच्या वाटेंत दोन तीर्थें असल्यानें तिकडून जाण्याचा आम्हीं विचार केला व दुपारीं मोटारनें द्वारका सोडली. अगदीं रखरखीत सपाट मैदानांतून पांच कोस गेल्यावर आम्ही नागेश्वर महादेवाचे मंदिराशीं पोंचलों. येथें एक लहानसा पुण्याच्या टिळक तलावायेवढा तलाव आणि त्याच्याभोंवतीं झाडी आहे. मोठ्या निर्जल प्रदेशांत हें एक ओएसिसच असल्यानें पशुपक्ष्यांचें हें विश्रामस्थानच बनलें होतें. त्यांतून गुर्जर प्रदेशांतील अहिंस्रतेवर विश्वसून मोर-लांडोरी, खारी, घोरपडी व हरणे यांसारखे बुजरट प्राणीहि भर दुपारीं मनुष्यवस्तींत येऊन निःशंकपणें जलसेवन करीत किंवा झाडांच्या शीतल पालवीचा आश्रय घेत होते.

नागेश्वराचें देवालय आहे अगदीं साधारणच. परंतु त्याला बारा ज्योतिर्लिंगांत ढकलण्याचा तेथील पुजाऱ्यांचा बेत दिसतो व त्याला द्वारकेच्या गोरांचा पाठिंबा आहे. नागेश्वरास वंदन करून मोटारीनें आणखी दोन कोस गेल्यावर गोपीतलाव लागला. श्रीकृष्णानें द्वारकाधीश झाल्यावर याच तलावांत जुन्या ओळखीच्या गोपींसह जलक्रीडा केली व त्यायोगें रुक्मिणी रागावून तिनें वेगळें मंदिर थाटलें. आम्ही तलावाशीं जातांच पावती बुक काढून एका युवकानें आम्हांस हटकलें, "केटला माणस छे? ...आपो बारा आनाना पैसा."

"शाना पैसा?" आमच्यापैकीं एकानें पुशिलें.

"गोपीतलावमां न्हावाना. एक आणो आप्यावगर पाणीने स्पर्श करवानो नथी." त्यानें जोरानें सांगितलें.

गोपीतलावांतील पाण्याच्या रंगाकडे पाहून आम्हीं त्यास सांगितलें, "अरे भाई, तमे अमोने एकेक आणो दक्षिणा आपशो तो पण अमो आ तलावना पाणीने स्पर्श नहीं करीशुं!" हें ऐकून तो "च्याट बनला".

श्रीकृष्णानें जेव्हां गोपीतलावांत जलक्रीडा केली, तेव्हां त्याचें पाणी अधिक

स्वच्छ असेल अशी आशा आहे. गोपीतलावावरील देवांचीं दर्शनें घेऊन प्रत्येकापुढें एकेक पै ठेवून आम्ही पुनः निघालों व पांच मिनिटांत मिंदरडा बंदरावर दाखल झालों. द्वारकेहून हें १६ मैल आहे. हें बंदर कच्छच्या आखाताच्या कांठीं आहे. येथें मचव्यांत बसून चार मैल प्रवास करून आम्ही शंखोद्धार बेटांत आलों. हें आखातांतील दोहों बेटांतील एक आहे. त्याची लांबी व रुंदी सुमारें चार व तीन मैल आहे. हें बेट हा बडोदें सरकारचा एक पेटा किंवा महाल आहे.

"बेट हीच श्रीकृष्णाची खरी द्वारका; पुराणांत वर्णिल्याप्रमाणें हिच्या सर्व बाजूंस समुद्र आहे. हल्लीं ज्या गांवाला द्वारका म्हणतात तें नंतर वसविलें गेलें आहे." असें बेटांतील पुजाऱ्यांचें म्हणणें आहे. द्वारका आणि बेट यांच्या पुजाऱ्यांच्यामधला झगडा चालू होतांच रणछोडरायजींना डाकूरचा भक्त बोडाण्यानें डाकुगिरी करून आपल्या गांवीं पळवून आणिलें! श्रीकृष्णाच्या अष्ट नायिकांचीं वसतिगृहें बेटांतच आहेत. बाकीच्या सोळा सहस्र स्त्रिया वाळवंटांतच कोठें तरी दडून बसलेल्या आहेत.

बेटांतील देऊळ हें मंदिरवजा नाहीं, मोठ्या अनेकचौकी वाड्यासारखें आहे. पाऊणशें वर्षांपूर्वी बेटांतील मंदिर वाघेर लोकांच्या बंडांत उध्वस्त झालें आणि हा वाडा उभारण्यांत आला. एका चौकांत रणछोडरायाची मूर्ति पश्चिमाभिमुख आहे व तिच्यासमोर देवकीची बैठक आहे. रणछोडरायास नित्य छप्पन्न भोग चढवितात. नैवेद्याचा सर्वांत कमी दर सव्वा पांच रुपये आहे. चरणस्पर्शाचा दर आठ आणे आहे. दरांचें कोष्टक फळ्यावर लाविलेलें आहे. द्वारकेचा नैवेद्य बराच स्वस्त म्हणजे सव्वा रुपयापासून चढता आहे. आम्ही सकाळीं दर्शनास गेलों तेव्हां आरती चालली होती. आरती करणारा पुजारी चांगला तुळतुळीत, लठ्ठ, केसांचा भांग काढलेला आणि दागिन्यांनीं सजलेला होता. एका नोकरानें चांदीचा तांब्या त्याच्यापुढें केला. पुजाऱ्यानें त्यास हात लावल्यावर नोकरानें देवाला स्नान घातलें.

दुसऱ्या नोकरानें फुलांचें तबक पुढें केलें. त्यांतील चार फुलें पुजाऱ्यानें श्रीचरणीं वाहिलीं.

पहिल्या नोकरानें आपल्या हातांत दिलेली घंटा खुळखुळ वाजवून पुजाऱ्यानें नोकराजवळ परत केली.

दुसऱ्या नोकरानें हातांत दिलेली पंचारति ओवाळून भालदाराच्या ललकारणींत पुजारी निघून गेला !

राधिकेच्या बैठकींतील महंत म्हणजे आमच्या धर्माची जिवंत मस्करीच आहे. हा महाराष्ट्रीय कऱ्हाडा ब्राह्मण लांब केसांची वेणी घालून आणि लुगडें नेसून राधिकेची भूमिका करीत असतो. सेवेच्या वेळेखेरीज एरवीं तो पुरुषवेशांतच असतो. ह्या बृहन्नडेचें दर्शन भाविक लोकांस फार स्पृहणीय वाटतें. बलरामदादांच्या देवडींत जलक्रीडेची व्यवस्था द्वारकेंतल्याप्रमाणेंच ठेविली होती. एकंदरीनें दादा जलक्रीडेचे आणि रायजी पक्वान्नांचे भोक्ते दिसतात. मुख्य मंदिरांत एका माडीवर पाटी लटकत होती. तिच्यावर लिहिलें होतें :

> देखिये सोनेकी द्वारका
>
> एक आना देकर सोनेकी द्वारका देखिये.

समुद्रांत बुडालेली सोन्याची द्वारका या माडीवरून आपण पाहूं या, असें माझी मुलगी म्हणाली; परंतु लहान मुलांचे कान धरून त्यांस उचलून जशीं सूर्याचीं पिलें दाखवितात त्यांतलाच हा प्रकार असेल असें वाटून आम्हीं एक आणा खर्च केला नाहीं.

मुख्य देऊळ सोडून आतां आम्ही गांवांतलीं इतर देवळें पाहण्यास गेलों. शंखोद्धार तलाव हें एक मोठें कुंड आहे. घोट्याइतकें खोल पाणी ह्यांत आहे आणि काळ्या गलिच्छ बेडकांचें वास्तव्य पायऱ्यांवर मोठ्या प्रमाणांत आहे. श्रीविष्णूनें मत्स्यावतार धारण करून शंखासुराचा उद्धार केला तो ह्या तलावाजवळच. त्यामुळेंच ह्या तलावाला आणि भोंवतालच्या बेटाला शंखोद्धार हें नांव पडलें आहे. आमच्या व्युत्पत्तिप्रिय मुलास असें वाटत होतें कीं, मोठमोठे वाजविण्याचे शंख येथें सांपडतात ( हें खरें आहे ) म्हणून याचें नांव शंखोद्धार पडलें असावें.

तेव्हां त्याची मोठी बहिण म्हणाली, "तसं नव्हे रे. तुझ्यासारख्या शंखांचा इथें उद्धार होतो म्हणून ह्याला तें नांव पडलं आहे."

व्युत्पत्तिशास्त्रज्ञ म्हणाला, "तुझ्यासारख्या घंटा जागोजाग असतांना शंखांना आपला उद्धार करून घ्यायला इथें यायला कशाला पाहिजे?"

गांवांतल्या पांचपंचर्वास देवळांपुढें पै पै ठेवून दोन रुपयांचा चुराडा करून आम्ही समुद्रकांठीं गेलों. बेटाच्या किनाऱ्यावर मोठाले शंख, शिंपा, कवड्या आणि अनेक प्रकारचे प्रवाळ सांपडतात. ही समुद्रकांठची संपत्ति गोळा करून विकण्याचा मक्ता दरवर्षी लिलावानें देण्यांत येतो. बेट आणि द्वारका येथून आमच्या मुलांनीं शंख, दगड, समुद्रफेन, कवड्या, पिवळी गोपीचंदनाची माती, शिंपा आणि मुलांच्या पोटांतल्यावर उगाळून देण्याचे किडे इत्यादि संपत्तीनें दोन पिशव्या भरून घेतल्या.

बेटांतली वस्ती सुमारें तीन हजार आहे. निम्याहून अधिक लोक मुसलमान खलाशी आहेत. कोंकणच्या आगबोटींवर त्या बाजूचे खलाशी पुष्कळ दिसतात. बेटांतून ओखाबंदर आणि त्यांत उभ्या असलेल्या बोटी यांच्या छोट्या आकृती स्पष्ट दिसतात. ओखाबंदर आणि द्वारका यांच्या मध्यें खेपा घालणारी आगगाडी अडीच कोश अंतर तोडीपर्यंत स्पष्ट पण चिमुकल्या आकाराची दिसते. ओखाबंदर हें ओखामंडण द्वीपकल्पाचें ईशान्य टोंक असून त्याच्या एका बाजूस अरबी समुद्र व दोन बाजूंस कच्छचें आखात आहे. दोन महासागरगामिनी आगबोटी एकाच वेळीं धक्क्यास टेकून नांगरू शकतात. रेल्वेची लाइन धक्क्यावर असल्यानें बोटींतून एकदम वाघिणींत माल उतरतां येतो. बंदरावर गुदामें बांधिलीं आहेत. बंदरालगत रेल्वे स्टेशन आहे.

हें नमुनेदार बंदर गायकवाड सरकारच्या मालकीचें असल्यानें आम्हांला तें पाहून साहजिकपणेंच अभिमान वाटला. ओखाबंदर रेल्वे–मार्गानें सोडून आम्ही द्वारकेकडे जाऊं लागलों. वाटेंत मिठापूर नांवाचें नवें गांव वसलेलें लागलें. येथें निरनिराळ्या क्षारांचा कारखाना निघणार आहे असें कळलें. 'येथून द्वारका किती लांब आहे?' असें आम्हीं एका सहप्रवाश्यास विचारिलें. तो म्हणाला, "पांच गांव". पण मध्यें एकच गांव जाऊन द्वारका शहर दिसूं

लागलें. मीं म्हटलें, "पांच गांव कुठें आहेत ?" तो म्हणाला. "गांव हें काठेवाडांत अंतर मोजण्याचें माप आहे. एक गांव म्हणजे इंग्रजी दीड मैल होतो." मग माझ्या लक्षांत संस्कृतांतला गव्युति आणि पालींतला गावुत हे शब्द आले.

ह्या वेळीं द्वारकाधीशाच्या मंदिराचें दर्शन आम्हीं दुरूनच घेतलें आणि प्रवास चालू ठेविला. आतां आमचा मोर्चा भीमकट्टा नांवाच्या गांवाकडे लागणार होता. बडोदें राज्याच्या अलग अलग बेचाळीस तुकडयांपैकीं भीमकट्टा नांवाचा एक तुकडा जामनगर आणि मोरवी या संस्थानांस लागून कच्छच्या आखाताच्या दक्षिण किनाऱ्यावर वसलेला आहे. ज्या वेळीं काठेवाडावर गायकवाड सरकारची हुकमत होती त्या वेळीं वरील दोन संस्थानांस दाबांत ठेवण्याकरितां हें ठाणें विठ्ठलराव देवाजी यांनीं सव्वाशें वर्षांपूर्वीं बडोदें राज्यांत सामील करून घेतलें. वसुलाच्या सोयीसाठीं ह्या एकाच गांवाचा पेटामहाल समजण्यांत येतो.

भीमकट्ट्यास भेट देण्याचें बरींच वर्षें मनांत घोळत असूनहि तेथें जाण्याच्या वाटेच्या बिकटपणामुळें मला दोनतीनदां बेत रहित करावा लागला; परंतु द्वारकेला मुक्काम असतां एका समव्यवसायी अधिकारी मित्राची भेट झाली. त्यांच्याशीं बोलतां बोलतां "भीमकट्ट्याला जायचं माझ्या मनांत फार आहे पण कोणाची सोबत मिळाली तर जाईन," असे उद्गार मीं काढिले.

"मी पण मनांत तेंच धारलं होतं ! आतां आपण दोघे मिळून जाऊं या," असें अधिकारी मित्र म्हणाले.

ह्या बेताप्रमाणें ते द्वारकेला आमच्या गाडींत चढले. त्याचप्रमाणें माझ्या नांवाचे आणि आडनांवाचे दुसरे एक अधिकारी अनपेक्षितपणें आम्हांस येऊन मिळाले. भीमकट्ट्याला जाण्यासाठीं ते दोन अधिकारी, मी आणि माझा मुलगा असे जामनगरास दुपारीं चार वाजतां उतरलों व बरोबरची बायकामंडळी तशीच बडोद्याकडे निघून गेली. स्टेशनवर उतरतांच एक कारकून व शिपाई पाठवून भीमकट्ट्याची मोटार आतां मिळणें शक्य आहे काय याची आम्हीं चौकशी केली. चौकशींत निष्पन्न झालें कीं, भीमकट्ट्याकडे जाणारी

मोटार दुपारी अडीच वाजतां दाणा बाजारांतून सुटते. जादा मोटार हवी असल्यास पन्नास रुपये भाडें पडेल. त्यामुळें दुसऱ्या दिवशीं अडीच वाजेपर्यंत थांबण्याचा विचार करून स्टेशनाजवळील एका धर्मशाळेंत मुक्काम ठेविला व भाड्याचे तांगे करून शहर पाहण्यास निघालों.

धर्मशाळेच्या जवळच कै. रणजितसिंह जामसाहेब यांनीं बांधविलेलें सोलॅरियम अथवा सूर्यप्रभामंदिर आहे. सूर्यकिरणांपासून उपचार घडवून माणसांचे रोग बरे करण्याकरितां रचिलेलें हें मंदिर पाहून सूर्यनारायणाचीं निरुपयोगी प्रचंड मंदिरें तिरस्करणीय वाटूं लागलीं. ज्यांत सूर्यकिरणाचा रिघाव होणें मुष्कील अशा सहस्रस्तंभी सूर्यमंदिरापेक्षां सूर्योन्मुख एकखांबी मंदिर किती तरी उपकारक आहे! हें मंदिर म्हणजे एका फिरत्या वर्तुळाकृति पोकळ लोहस्तंभावर उभारलेलें काचवेष्टित दालन आहे. लोहस्तंभांतून वर जाण्यास जिना आहे आणि दिवसभर सूर्यनारायणाच्या भ्रमणाप्रमाणें स्तंभ वीजबळानें फिरवून आंत किरण यावे अशा बेतानें काचेचें दालन झुकविलें जातें.

वरील दालनांत रोग्यांकरितां खोल्या केलेल्या आहेत. तसेंच सूर्यकिरण गाळण्याकरितां, त्यांचें तेज कमीजास्त करण्याकरितां किंवा त्यांजवर विशिष्ट संस्कार घडवून आणण्याकरितां निरनिराळ्या प्रकारचीं उपकरणें बसविलीं आहेत. गंडमाळा, काळपुळी, इसब, कोड इत्यादि चर्मरोगांवर सूर्योपासना बरीच रामबाण असावी असें मंदिरांत लाविलेल्या उपचारित रोग्यांच्या छायाचित्रांवरून दिसतें.

सूर्यप्रभामंदिर सोडून आम्ही जामसाहेबांच्या विस्तीर्ण बागेंत गेलों. बागेंत प्राणीसंग्रह आहे व त्यांत जुनागडांतल्याप्रमाणेंच सिंह पुष्कळ आहेत. सिंहीण आणि वाघ यांच्या संकरापासून निर्माण झालेला लायगर ( सिंघा ) नांवाचा प्राणी आम्हीं पाहिला. 'प्राणिसृष्टीवर अत्याचार करवून निर्माण झालेला हा पुतळा जननक्षम नाहीं' असें रखवालदारानें आम्हांस सांगितलें. ह्या प्राण्याचा रंग सिंहाच्या सारखा आणि आकार वाघाच्या सारखा होता. त्याची डरकाळी सिंहगर्जनेसारखी होती. बागेजवळ एक विस्तीर्ण तलाव आणि त्याच्या मध्यभागीं उंचवट्यावर आद्य जामसाहेबांचा सोनेरी अश्वारूढ पुतळा आहे. आम्ही गेलों त्या वेळीं पुतळा सूर्यकिरणांच्या तेजानें तळपत होता. तलावाच्या जवळच

असलेल्या कोठा आणि लखोटा नांवाच्या दोन जुन्या भव्य इमारतींच्या आंतील भाग धोक्याचा झाला असल्यानें आंत कोणास जाऊं देत नाहींत. म्हणून इमारती बाहेरूनच पाहून घेऊन आम्हीं शहरांत प्रवेश केला. वस्तीच्या मानानें शहरचा थाट अवर्णनीय वाटला. आपण एखाद्या इलाख्याच्या राजधानींतून चाललों आहों असा आम्हांस भास होत होता.

जामनगर संस्थाननें बेडी नांवाचें बंदर सजविले आहे. तें पाहण्यास जाण्यास दुसऱ्या दिवशीं सकाळीं ट्रामवेच्या टप्प्यावर जाऊन आम्हीं तीन तीन आण्यांचीं तिकिटें काढिलीं. ह्या ट्रामवेवर एकच वाहनमाळ असून तिला तीन डबे आहेत. माळ ओढण्यास तेल–यंत्राची योजना केलेली आहे. जामनगरपासून हें मुंबईच्या व्यापाऱ्यांच्या रोषास पात्र झालेले बेडीबंदर अडीच कोस अंतरावर आहे. बंदरास जातांना वाटेनें दोन मैलपर्यंत किर्रर्र झाडी असलेली सरकारी बाग लागली. आम्हांला सकाळीं अंघोळीला देखील पुरेसें पाणी मिळालें नव्हतें. परंतु या बागेंतील झाडांना मात्र उंटाचें रहाटगाडगें, दोन बैलांची मोट व तेलयंत्राची पिचकारी अशा भिन्नभिन्न प्रकारच्या साधनांनीं दोन विहिरींतून उपसलेलें मुबलक पाणी पोटभर प्यावयास मिळत होतें. हें पाहून मनुष्य जन्माला येण्याऐवजीं या बागेंतील झाड झालों असतों तर किती बरें झालें असतें, असा विचार मनास चाटून गेला.

बेडीबंदरला जाणारा रस्ता तिहेरी आहे. मध्यें डामरी सडक, एका बाजूस ट्रामवे व दुसऱ्या बाजूस रेल्वे. हें बंदर कच्छच्या आखाताच्या दक्षिण तीरावर उथळ पाण्यांत वसलेलें असल्यानें यांत मोठ्या आगबोटी येऊं शकत नाहींत, तथापि मोठीं गलबतें बोटींवरून माल आणून उतरवितात. जकातीच्या सवलतीमुळें हें बंदर कांहीं वर्षांपूर्वी (१९२८) भरभराटींत होतें; परंतु मुंबईच्या व्यापाऱ्यांनीं गिल्ला करून विरमगांवास ब्रिटिश जकातीचें नाकें उघडविल्यामुळें आतां तें साधारण मंदींतच आहे.

दुपारीं दोन वाजतां आम्हीं दाणा बाजारांत जाऊन भीमकट्ट्याकडे जाणाऱ्या खटाऱ्यांत ( काठेवाडांत मोटार बशीला खटारा म्हणतात ) जागा पटकाविल्या. माझे अधिकारी मित्र आणि मी असे दोघे 'साहेब' असल्यानें चक्रधराच्या मनांत आम्हांला पुढील बैठकी द्यावयाचें होतें; परंतु मोटारचा मुकादम म्हणूं

लागला कीं, " चक्रधराशेजारच्या बैठकीवर बसण्याचा मान माझा आहे." चक्रधरानें स्वतःची आगबोटीच्या कप्तानाशीं तुलना करून सांगितलें कीं, मानाची जागा कोणास द्यावयाची तें ठरविण्याचा हक्क आपला आहे. मुकादमानें आपल्या इंटरमीजिएटपर्यंत झालेल्या शिक्षणाचा हवाला देतांच चक्रधरानें त्यास सुशिक्षितांच्या बेकारीची झणझणीत आठवण करून देऊन स्वतःच्या करामतीवरील आणि बाहुबळावरील विश्वास प्रकट केला. तोंडांतून एकहि अपशब्द निघूं न देतां, परस्परांच्या मानांचा उल्लेख न करितां, शरीर-विज्ञानाची गूढ माहिती प्रकट न करितां परंतु उभा रस्ता दणाणून सोडीत भांडणें कशीं करावीं तें गुजराती लोक चांगलें जाणतात.

गुजराती लोकांच्या वाचेपेक्षां मराठी लोकांची वाचा अधिक अमंगळ असते. मी उत्तर हिंदुस्थानांतील एका शहरांत महिनाभर राहत होतों. ह्या शहरांतील कामकरी वर्गात मराठी लोकांचा बराच भरणा असल्यानें मातृभाषेचे चार शब्द कानीं पडावे म्हणून मुद्दाम त्यांच्या मोहल्ल्यांत फिरावयास गेलों; परंतु तेथील लोक एकमेकांस किंवा आपल्या गुरांस किंवा मुलांस संबोधतांना त्यांच्या मातृदेवतेचा अभद्र उल्लेख केल्याशिवाय एकहि वाक्य उच्चारीत नव्हते हें पाहून मला इतका वीट आला कीं, पुन्हां त्या मोहल्ल्यांत मी गेलों नाहीं.

एकदां मी पुण्याहून साताऱ्यास मोटार बशीनें चाललों होतों. बाकांच्या मध्यें तक्तपोशीवर एक ऐंशी नव्वद वर्षांचा म्हातारा निपचित पडला होता. त्याचे दोन मुलगे, दोन सुना आणि दोन लेकी त्याला वारंवार चमच्यानें मधपाणी पाजून व मात्रा चाटवून " बाबा, कांहीं तरी बोला आमच्याशीं " अशा त्याच्या विनवण्या करीत होतीं. त्यांना वाटलें म्हातारा आपल्याला कांहीं तरी चांगला आशीर्वाद देईल. एका तासाच्या प्रयत्नानंतर बाबांनीं डोळे उघडले, लेकी-सुनांकडे पाहिलें आणि एक अस्सल मराठी शिवी हासडून पुनः डोळे मिटून घेतले. बिचाऱ्या मुलीं-लेकींस चारचौघांत लाजेनें मेल्यासारखें झालें.

तथापि गुर्जरप्रांतीय लोकांची वाचा आमच्यापेक्षां बरीच शुद्ध असते. चक्रधर आणि मुकादम यांच्या ' महाभारत ' भांडणांत एकहि वावगा शब्द वापरण्यांत आला नाहीं. माझ्या अधिकारी मित्रानें मुकादमास भांडणाचें

कारण विचारलें असतां तो सांगूं लागला, " यु सी, आय ॲम दी गार्ड ऑफ धिस ट्रेन—"

या इंग्रजी वाक्याचा अर्थ चक्रधरास समजून तो गुजराथींत म्हणाला, " अरे भाईसाहेब, कुठला गार्ड आणि कुठली ट्रेन ? रेल्वेंत गार्डाची नोकरी मिळण्याचं तुला स्वप्न पडतं आहे कीं काय ? तूं आपला या आम्रण मोटार सर्व्हिसचा एक कंडक्टर आहेस. "

सरतेशेवटीं स्वतःला गार्ड समजणाऱ्या मुकादमानें हार खाल्ली आणि आम्हांस चक्रधराजवळील बैठकी मिळाल्या.

जामनगर संस्थानच्या हद्दींतून आम्हांस भीमकट्ट्याच्या शिवेपर्यंतचा ४४ मैल मार्ग आक्रमण करावयाचा होता. जामनगरपासून सहासात मैलपर्यंत डामरी सडक होती. नंतर खडीची सडक लागली; तेव्हां आम्हांस वाटलें दोन तासांच्या आंत आम्ही मुक्कामास पोहंचूं. परंतु बारा मैल झाल्यावर सडक संपून चाकोऱ्याच्या वाटेनें आमचा प्रवास सुरू झाला. कित्येक वेळीं एक चाकोरी दुसरीपेक्षां दोन विती उंचीवर असल्यामुळें क्षितिजाशीं काटकोन करून फर्लांग दोन फर्लांगपर्यंत आमचा खटारा जात असे. ओढे आणि नाले यांवर पूल नसल्यानें त्यांच्या कोरड्या पात्रांतून खटाऱ्यास पलीकडे जावें लागे; मधून मधून बाभळीचीं झाडें खटाऱ्याच्या टपावर ठेविलेल्या आमच्या सामानास प्रेमानें खाजवीत; तर कित्येकदां निंबाचीं मोठीं झाडें आपल्या फांद्यांनीं तें खालीं ढकलून देण्याचा यत्न करीत. मध्येंच चाकोरीस भेग पडली असल्यानें ती चुकविण्याकरितां चक्रधर एकदम वळण घेऊन सर्व उतारूंस एकमेकांना कडकडून भेटावयास लावी.

ह्या यमवाटेनें जात असतां मला चार वर्षांपूर्वी किर्लोस्करवाडीस आम्हीं केलेल्या प्रवासाची आठवण झाली. आम्हीं बऱ्याच लेखकांस हुरड्याची मेजवानी देण्याकरितां रा. शंकरराव किर्लोस्कर यांनीं किर्लोस्करवाडीपासून दोन कोसांवर असलेल्या दुधाळी नांवाच्या ( नांव कदाचित् चुकलें असेल पण तें येथें महत्त्वाचें नाहीं ) गांवीं मोटारींतून नेलें होतें. तेथील वाट अशीच बिकट असल्यामुळें साहित्यसेवकांचीं डोकीं एकमेकांच्यावर घांसत होतीं. साहित्य-

सेवक भीतीनें गांगरले असतां रा. किर्लोस्कर म्हणाले, " मित्रहो, भिऊं नका आणि रागावूं नका. तुमच्यामधलें संघटन अधिक वाढावें याकरितां मीं आजची योजना केली आहे. "

जामनगरापासून २० मैल गेल्यावर चाकोऱ्याची वाट देखील संपली आणि शेताच्या बांधावरून कांहीं मार्ग आक्रमण करून 'रणांत' प्रवेश केला. येथें सर्व वाळवंट होतें. आणि म्हटलें तर सगळीच वाट नाहींतर सगळें सपाट, अशी स्थिति झाली. मधून मधून आंसापर्यंत खोल वाळूंत चाक रुते व चक्रधर, 'साहेब, जरा पाय बाजूला करा,' अशी विनंति करून वेगवर्धक दांडा वर खेची. कांहीं वेळ अंगाला शहारे आल्यासारखें करून खटारा वाळूंतून बाहेर निघून चालूं लागे. चक्रधर म्हणाला, " अनेक वेळ येथें वाळवंटांत मोटारी रुतून बसतात आणि रात्र रात्र त्या उपसून काढण्याचें काम सर्व उतारूंस करावें लागतें. " वाऱ्याबरोबर वाळूचे लोट येऊन त्यांनीं सर्व उतारूंस नख-शिखान्त स्नान घातलें होतें. कांहीं वेळानें कच्छच्या आखातांतील गलबतांचीं शिडें आम्हांस दिसूं लागलीं; व आम्ही जोडिया नांवाच्या बंदरीं दाखल झालों.

जोडिया बंदर हें एक निर्जळ, धूळमय आणि गलिच्छ शहर वाटलें. वस्ती बहुतेक मुसलमान खलाशांची. गांवाभोंवतीं काळ्या दगडाचा भक्कम तट दिसला. चक्रधर, मुकादम आणि उतारू यांच्या चहापानाकरितां अर्धा तास थांबून गांवांतील कुत्रीं, गुरें आणि पोरें यांच्या गर्दीतून वाट काढीत रणांतले उरलेले दोनतीन कोस खटाऱ्यानें बाद केले. रूक्ष वाळवंटांत इतर जरी कांहीं पाहण्यासारखें नव्हतें तरी दक्षिणी माणसास अपरिचित असे पन्नास पन्नास उंटांचे तांडे आणि मोटारीपासून दोनतीन हातांवर रवंथ करीत निःशंक उभीं असलेलीं हरणें विपुल पाहावयास मिळालीं. वालुप्रदेशांत मध्येंच थोडींशीं झाडें, दहावीस घरें आणि त्यांस पाणी पुरविणारी एखादी विहीर असें एकादें खेडें मधूनमधून लागे. थोडीशी जरी झाडी असली तरी तिच्या आश्रयास बऱ्याचशा मोरलांडोरी असावयाच्याच! या प्रांतांत ससे आणि घोरपडी यांचा सुकाळ दिसला.

सूर्यास्तानंतर घटकाभरानें आम्ही भीमकट्टयास पोंचलों. गांवचीं घरें मराठी

खेडयांतल्याप्रमाणें कच्च्या विटांचीं, पडझड झालेलीं आणि दाटीनें लागलेलीं दिसत होतीं. गुजराथची संपन्नता काठेवाडच्या वांट्यास आलेली नाहीं. यामुळें व खडकाळ किंवा रेताड माळरानांच्या योगें काठेवाडांतून प्रवास करीत असतां महाराष्ट्रांत फिरत असल्यासारखें वाटतें.

दिवसभराच्या तापानें श्रांत झालेले आमचे देह रात्रीच्या वेळीं समुद्रावरून येणाऱ्या थंड वाऱ्यानें शीतल झाले आणि आम्हांस गाढ झोंपा लागल्या. काठेवाडच्या बहुतेक भागांत रात्रीचे वेळीं इतक्या जोरानें वारा वाहत असतो कीं, परमेश्वरानें आकाशांत भला मोठा पंखा लावून ठेविला आहे असा भास होतो. मात्र ह्या वाऱ्याबरोबर बारीक वाळूचे लोट उडत असतातच. उजाडल्यावर आम्ही मुक्कामाच्या जागेंतून बाहेर बघतांच हातांत भांडीं घेऊन एका रांगेनें जाणाऱ्या व दुसऱ्या रांगेनें येणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या ओळी आमच्या दृष्टीस पडल्या. गांवाजवळ उंच बंधारे घातलेला एक तलाव आहे. पावसाळ्या-अखेर त्यांतलें पाणी आटलें कीं गांवकरी त्यांत खड्डा खणतात आणि त्यांतून पाणी उपसतात. पांच-सात दिवसांत खड्ड्यांतील पाण्यांत जंतुसंग्रह उत्पन्न होतो व मग दुसरा खड्डा खणून त्यांतून पाणी काढितात. सर्व गांवकरी ह्या खड्ड्यांतल्या पाण्यावर अवलंबून असतात, गांवचे पशुपक्षी त्या पाण्यानेंच आपली तहान भागवितात आणि असल्या तुटपुंज्या आणि घाणेरडया जल-संचयाच्या आश्रयाकरितां सकाळपासून संध्याकाळपर्यंत माणसांची मुंग्यांच्या-सारखी रीघ लागलेली असते.

गांवांत पाहण्यासारखें कांहींच नसल्यानें सरकारी काम उरकून दुसऱ्या दिवशीं पहांटे बैलगाडया करून आम्हीं भीमकट्टा सोडिला. आतां रणप्रदेश संपून धूलिप्रदेश सुरू झाला होता. एका नदीच्या कांठीं वसलेल्या धूळकोट ह्या अन्वर्थक नांवाच्या तटबंदी खेडयांत न्याहारीकरितां घटकाभर थांबून सकाळीं नऊ वाजतां आम्रणरोड नांवाच्या ट्रामवे स्टेशनवर आम्ही दाखल झालों. थोडया वेळानें मोटारच्या बळावर चालणारी जोडट्रामगाडी स्टेशनांत आली. तिच्यांत बसून आम्ही मध्यान्हीच्या सुमारास मोर्वी संस्थानच्या राज-धानीस येऊन पोंचलों.

मोर्वी हें काठेवाडच्या उत्तर सरहद्दीच्या मध्यभागीं वसलेलें चांगलें संपन्न

संस्थान आहे. त्याची राजधानी लहानशी पण टुमदार आहे. मच्छु नदीच्या कांठीं नवीन बांधिलेलें भव्य आणि सुंदर देवालय मणिमंदिर फारच आकर्षक आहे. ह्या देवालयाच्या निरनिराळ्या गाभाऱ्यांत वेगळाल्या देवतांची प्रतिष्ठापना केलेली असून पुढें वर्तुलाकृति भव्य सभामंडप आहे. सभामंडपांतील खांब आणि छत यांवर दगडांत इतकें कोरीव व बारकाईचें नक्षी काम केलें आहे कीं त्याची तुलना अबु किंवा पालिताणा येथील जैन मंदिरावरील कोरीव कामाशींच होऊं शकेल. अशा प्रकारचें काम हल्लीं होत असेल अशी मला कल्पनाहि नव्हती. बडोद्याच्या नवीन बांधिलेल्या कीर्तिमंदिराच्या सभामंडपापेक्षां ह्या मानमंदिराचा सभामंडप पुष्कळ पटीनें भव्य व प्रेक्षणीय वाटला.

देवालयाभोवतालच्या कोटवजा चाळींत मोर्वी संस्थानचें सेक्रेटेरिअट आहे. माजी व्हाइसरॉय लॉर्ड विलिंग्डन यांनीं त्याचा उघडणीसमारंभ केल्यानें त्यास त्यांचें नांव देण्यांत आलें आहे.

मानमंदिरासमोर मच्छु नदीच्या आरपार एक झोकबाज पूल आहे. पुलाच्या दोन्ही टोंकांस दोन्ही बाजूंस जनावरांचे पंचरसी धातूचे समान आकारी पुतळे आहेत. सडक, रूळवाट आणि ट्रामवाट ह्या सर्वांची सोय पुलावरून केलेली आहे. हा देखावा पाहून चित्रांत पाहिलेल्या लंडनच्या पार्लमेंट गृहाजवळील तमसा नदीच्या पुलाची आठवण झाली. माझे विलायतची यात्रा करून आलेले मित्र हिंदुस्थानांतला देखावा पाहून आपल्याला ह्या वेळीं विलायतच्या अमुक अमुक स्थळाची आठवण होत आहे असें सांगून छाप मारण्याचा यत्न करितात. दुर्दैवानें मला ती यात्रा घडली नसल्यानें चित्रांत पाहिलेल्या देखाव्यांच्या आठवणीवरच भागवावें लागतें. मोर्वींत विशेष कांहीं पाहण्याचें राहिलें नसल्यानें आम्ही मोर्वी सोडून बडोद्याकडे येण्यास निघालों.

# कॉलिकात्याचा पॉरिचय : : : : ६

कलकत्त्यास यंदा ( १९२९ ) कॉंग्रेस भरलीं असल्यामुळें ह्या शहरासंबंधीं बऱ्याच वाचकांस जिज्ञासा उत्पन्न झाली असेल. मी येथील शाही दप्तरखान्यांत काम शिकण्याकरितां आठ दिवसांपूर्वी आलों आहें व एवढ्या अल्पपरिचयानें कलकत्त्याबद्दल मला काय वाटतें तें येथें थोडक्यांत नमूद करितों. ज्यांनीं तें शहर पाहिलें असेल त्यांनीं हा लेख न वाचलेलाच बरा. उगाच माझ्या चुका काढून त्यांचा वेळ खर्च होईल. इतर वाचकांस ह्या परिचयानें दुधाची तहान ताकावर भागल्यासारखें वाटलें तरी माझें काम झालें.

नागपूराहून सकाळीं मेलनें निघालों. बंगाल-नागपूर रेल्वेच्या दुसऱ्या वर्गांत उतारूंपेक्षां रेल्वेसर्व्हंटांचीच गर्दी अधिक असते. खडगपूरच्या कारखान्यांत काम करणारे अनेक भाऊ लोक आपल्या चिंग्यागंग्यांसह आणि जातें, केरसुण्या आणि पोतीं यांजसह खुशाल दुसऱ्या वर्गांत ठिय्या देत होते. साहेबी होल्डऑलला घोंगडीच्या आवरणांत काथ्याच्या दोऱ्यांनीं बांधलेल्या वळकट्यांचा विटाळ सहन करावा लागत होता. क्रोमीयमचा मुलामा दिलेलीं कुलुपें धारण करणाऱ्या चामडी पोर्टमॅंटोंना रंग गेलेल्या आणि पोचे आलेल्या लोखंडी ट्रंकांचे धक्के बसत होते. तर सुंदर लाकडी घोडयांवर विराजमान झालेले पाण्याचे खुजे लोणच्याच्या बरण्यांबरोबर सलगी करीत होते.

संध्याकाळ झाल्यावर तिकीटधारी उतारूंनीं रेल्वे-अधिकाऱ्यांशीं तक्रार केली तेव्हां बिलासपूरच्या एका अधिकाऱ्यानें भाऊ लोकांस त्यांच्या लक्ष्म्यांसह आणि परिवारांसह तिसऱ्या वर्गांत बसण्यास पाठवून दिलें. मग मात्र आम्ही तिकीटधारी उतारू स्वस्थ झोप काढूं शकलों.

मी जागा झालों तेव्हां गाडी बंगाल प्रांत आक्रमण करीत होती. क्षितिजापर्यंत हिरवीगार सपाटी पसरली होती. रस्त्याच्या दोहों बाजूंस रेल्वे बांधांच्या कडेनें सारखे पाण्याचे नाले दिसले व जागोजाग त्यांत पांढरीं तांबडीं कमळें दिसत होतीं. हे कमळवेल बंगालच्या आरोग्याचे कट्टे शत्रु आहेत असें मलेरिया-कमिटीचें म्हणणें असलें तरी प्रवाशांच्या दृष्टीस ते फार आल्हादित करतात.

कलकत्ता ३० मैलांवर राहिला तेव्हां रूपनारायण नांवाची नदी वाटेंत लागली. या नदीची रुंदी फारच थोडी पण खोली पुष्कळ असावी, असें तिच्यांतून जाणाऱ्या अगणित तराफ्यां-जहाजांवरून दिसलें. आणखी कांहीं खोल कालवे वाटेंत लागले. त्यांतहि मचवे ये-जा करीत होते. कलकत्ता स्टेशन जवळ येतांच कित्येक सहप्रवाशांनीं आपापलीं घड्याळें २४ मिनिटें पुढें सरकविलीं; कारण कलकत्त्याला पोस्ट वगैरे सरकारी कचेऱ्यांतूनसुद्धां स्टँडर्ड वेळ न वापरतां स्थानिक वेळ वापरतात. आधींच कलकत्ता अगदीं पूर्वेस, त्यांतून वेळ २४ मिनिटें पुढें, त्यामुळें येथें सकाळीं लवकर उजाडतें. या डिसेंबर महिन्यांतसुद्धां सकाळीं सहाला चक्क उजाडतें व संध्याकाळीं पांचाला दिवेलागणी होते. उन्हाळ्यांत पहांटे साडेचार वाजतां येथें उजाडतें, असें म्हणतात ( १९२९ ).

हबडा ( ज्याचा हावरा असा चुकीचा उच्चार करितात तें ) स्टेशन जवळ आलें, तरी कल्याण-मुंबई रूळरस्त्यावर जशी चव्हेरी मार्ग, प्रचंड स्टेशन, स्थानिक उतारूंची गर्दी, रेल्वेचे जगड्व्याळ कारखाने इत्यादि मोठ्या शहरांचीं चिन्हें दिसतात तशीं बिलकूल दिसलीं नाहींत. हें स्टेशन टर्मिनस पद्धतीचें बं. ना. व ई. इं. ह्या दोन रेल्वेंचें समाईक आहे. जरी त्यांत दहा ओटे आहेत तरी बोरीबंदराच्या सारखी विशाल इमारत त्याजवर नाहीं. हबडा हें स्टेशन

हुगळी नदीच्या उजव्या व कलकत्ता शहर डाव्या तीरावर आहे. दोहोंच्यामध्यें तरता पॉन्टून पूल आहे. दररोज दोन तास हा पूल स्थळचर वाहनांस बंद राहतो त्या वेळीं ह्याचा कांहीं भाग जमिनीपासून तोडण्यांत येतो व मधल्या फटींतून जलवाहनें इकडून तिकडे जातात व तिकडून इकडे येतात. ह्या वेळांत पादचारी लोकांस कलकत्ता पोर्टटस्ट्र आपल्या वाफतरीनें नदीपार फुकट नेतें.

हवडा स्टेशनवर निरनिराळया हॉटेलांचे इंग्रजी युनिफॉर्म केलेले दलाल गिऱ्हाइकांचें स्वागत करण्यास सादर असतात. आगाऊ हॉटेलवाल्यांस वर्दी दिली नाहीं तरी उतरण्याची पंचाईत पडत नाहीं. दलालांजवळ हॉटेलची दरपत्रिका असते, ती वाचून त्याजबरोबर हॉटेलांत उतरण्यास जावें. येथील दर मुंबईपेक्षां किंचित् अधिक असतात. येथें ब्राह्मणहि मांसमत्स्याहारी असल्यानें शाकाहाऱ्यांना आपलें अन्न “ स्पेशल ” करावें लागतें; पण त्याबद्दल निराळा आकार पडत नाहीं. येथील सर्व लोक आमिषभोजी असल्यानें रस्त्यांत, गटारांत, मोऱ्यांत सर्वत्र माशांचीं हाडें, अंडयांचीं टरफलें, कोंबडयांचीं पिसें दिसून येतात. त्यामुळें स्वच्छतेनें राहणाऱ्या मांसाहारी मराठ्यालाहि किळस येते.

हवड्यांतून कलकत्ता शहरांत शिरतांना प्रथम हॅरिसन रस्ता लागतो. ह्या रस्त्यावर दुतर्फा मारवाड्यांचीं दुकानें व जुन्या पद्धतीच्या इमारती दिसतात. मुंबईंतील सगळा व्यापार जसा गुजराथ्यांच्या हातीं आहे आणि दक्षिणी लोक बेकार झाले आहेत, त्याप्रमाणें कलकत्त्याचा व्यापार मारवाडी, युरोपियन व थोडे गुजराथी यांच्या हातीं आहे व स्थानिक सुशिक्षितांची बेकारी दक्षिणेंतल्यापेक्षां विकाळ आहे. हॅरिसन रस्ता पाहून शहराबद्दल अनुकूल मत होत नाहीं, परंतु चौरंगी, क्लाइव्ह रस्ता इत्यादि भाग पाहिल्यावर कलकत्त्याला ‘ प्रासादांचें नगर ’ कां म्हणतात त्याचा उलगडा होतो. या भागांतील दगडी इमारती इतक्या मजबूत आहेत कीं हे सगळे लहान किल्ले आहेत म्हटलें तरी चालेल. गव्हर्नरचा बंगला विस्तीर्ण परिसरांत या भागांत असून त्याच्या दक्षिणेस एस्प्लनेड नांवाचें अतिशय मोठें मैदान आहे. मुंबईच्या त्याच नांवाच्या मैदानाएवढीं पंधरा वीस मैदानें एकमेकांस जोडून पसरून ठेविलीं तर कल-

कत्त्याच्या एस्प्लनेडची तीं बरोबरी करतील. ह्या एस्प्लनेडमधून दीपमंडित रस्ते नेले आहेत व रात्रीं दिवे लागल्यावर ह्या रस्त्यावरून जातांना मुंबईच्या चौपाटीची आठवण होते. फरक इतकाच कीं, मुंबईस बाजूला जें विस्तृत जलपृष्ठ दृग्गोचर होतें त्याऐवजीं येथें भूपृष्ठ दृष्टीस पडतें.

मैदानाच्या दक्षिणेस व्हिक्टोरिया मेमोरियल नांवाची संगमरवरी भव्य इमारत लांबून दिसते. हिची रचना ताजमहालाच्या धर्तीवर केलेली आहे व आंग्लो-इंडियन खुषमस्कऱ्यांकडून 'विसाव्या शतकांतील ताज' असें टोपण नांव हिला मिळालें आहे. फोर्डच्या जस्ती डबड्याला 'रॉल्सरॉइस' म्हटलें तरी कोसळणार नाहीं इतकें ह्या दगडी खेळण्याला 'ताजमहाल' म्हटलें म्हणजे हंसूं कोसळतें. ह्या इमारतींत एक सुंदर व विपुल चित्रशाळा आहे. तिच्यांत अनेक महत्त्वाचीं ऐतिहासिक चित्रें आहेत. भोंवतीं बाग आहे.

गव्हर्नरचा बंगला व व्हिक्टोरिया मेमोरियल ह्यांच्या मध्यावर मैदानांत ऑक्टर लोनी स्मारकस्तंभ उभा आहे. हा कलकत्त्यांतला सगळयांत उंच मनोरा अगदीं साधा आहे. हुगळी नदींतून येणाऱ्या गलबतास अगदीं दुरून दिसणारें कलकत्ता बंदराचें भूचिन्ह हेंच आहे. कलकत्ता बंदर समुद्रापासून ४२ कोस आंत असल्यानें समुद्रांतून मात्र तें दिसत नाहीं.

व्हिक्टोरिया मेमोरियलच्या पश्चिमेस रेसकोर्स आहे. पुढें गंगेचा एक कालवा ओलांडल्यावर प्राणिसंग्रहालय (झू, चिडियाखाना) आहे. यांत जाण्यास एक आणा प्रवेश-फी द्यावी लागते. याची जागा विस्तीर्ण असल्यानें प्राण्यांस मोकळें हिंडण्यास बराच वाव आहे. गेंडा, पाणघोडा, जिराफ व रानगायांचे अनेक प्रकार हे मुंबईच्या राणीच्या बागेंत मीं न पाहिलेले प्राणी येथें पाहिले. या संग्रहालयांत पाटानें चोहोंकडे पाणी खेळविलें आहे व त्यांत जलचर पक्षी व स्थलजलचर जनावरें सोडून दिलीं आहेत. या सर्व प्राण्यांस हिंडण्याफिरण्याची बरीच मोकळीक असल्यानें त्यांच्या माहेरच्या निवासाची साधारण कल्पना प्रेक्षकांस येऊं शकते. यांतील सर्पगृहांत जिवंत साप व सुसरी पुष्कळ जातीच्या आहेत. आणखी दक्षिणेस गेल्यावर कालीघाट लागतो. यांतील कालीच्या मंदिरावरून 'कालिकाता' नांव या शहरास पडलें असावें

असा संशोधकांचा तर्क आहे. कालिमंदीर फारसें प्रेक्षणीय नाहीं व त्यापुढें होणारी बकऱ्यां-रेडयांची कत्तल पाहून हें पवित्र स्थान कीं कत्तलखाना, असा अचंबा करीत किळसलेला प्रवासी खिन्नपणें परत फिरतो. मिस मेयोनें या कत्तलखान्याच्या वर्णनानें आपल्या ' मदर इंडिया ' ग्रंथाचा आरंभ केला आहे.

कलकत्त्याच्या उत्तरेस तीन साडेतीन कोसांवर श्रीरामकृष्ण-विवेकानंद यांच्या जोडीनें प्रसिद्धीस आणिलेलें दक्षिणेश्वराचें मंदिर आहे. हें पाहण्यास सहप्रवासी रा. आठल्ये यांजसह मी मोटारबसनें निघालों. कलकत्त्यापासून आलम्‌बझारपर्यंत मोटारबसनें गेलों. वाटेनें दुतर्फा सारखी अडीच कोस दाट वस्ती आणि पलीकडे अत्यंत गर्द अशा आंब्यानारळींच्या बागांतून रस्ता गेलेला आहे. ह्या सगळया विस्तारावर विजेचा पुरवठा केलेला दिसला. दक्षिणेश्वरचें भव्य पण साधें मंदिर हुगळीच्या अगदीं कांठावर आहे. नदीच्या पाव कोस रुंदीच्या पात्राच्या दोन्ही अंगांस नजर पोंचेपर्यंत बागा आणि बंगले यांच्या ओळी लागलेल्या दिसतात. ह्या बंगल्यांच्या आघाड्या सडकेवर व पिछाड्या नदी किनाऱ्यावर आहेत. पिछाडयांस बहुधा लहान घाट किंवा होडी लावण्यासाठीं छोटे दादर आहेत. पुष्कळ बंगलेवाल्यांच्या नौका पायांशीं बांधून ठेविलेल्या दिसत होत्या. दक्षिणेश्वर हें नदीच्या डाव्या तीरीं व बालि नांवाची वस्ती उजव्या तीरीं आहे. ह्या ठिकाणीं मोठा लोखंडी पूल बांधण्याचें काम चालू आहे ( १९३९ ).

दक्षिणेश्वराहून होडीनें नदी ओलांडून आम्ही बेलूर मठाकडे गेलों. रामकृष्णमिशनचा ह्रा मठ आधुनिक व्यवस्थित पद्धतीनें चालला आहे. रामकृष्ण परमहंस व विवेकानंदस्वामी इत्यादिकांच्या सुंदर संगमरवरी मूर्ति लहानलहान मंदिरांतून स्थापिल्या आहेत. विद्युद्दीपांच्या चकचकाटांत लोखंडी खाटांवर मृगाजिनें टाकून बसलेले इंग्रजींत धडाधड भाषण करणारे ते तुळतुळीत संन्यासी पाहून मला फार कौतुक वाटलें. बेलूरहून आलम्‌बझारकडे परत न येतां मोटारबसनें आम्ही हबडयास व तेथून दुसऱ्या बसनें कलकत्त्यास परत आलों.

कलकत्त्याचे शेंकडा नव्वद टॅक्सी व बसचालक शीख आहेत. ट्रामच्या रस्त्यांवरून वाटेल त्या मालकांस बसा चालविण्याची तेथें हरकत नसल्यानें

बसांचा फार सुळसुळाट झाला आहे. ट्रामनेंच कां प्रवास करावा याचीं कारणें ट्राम कंपनीस जाहिराती काढून त्यांत द्यावीं लागलीं आहेत! एक बस झंडा-सिंगाची तर दुसरी हरनामसिंगाची अशा वेगळाल्या मालकांच्या बसा रस्त्यावरून जात येत असतात. येथील ट्रामगाडयांच्या पुढील डब्यास पहिली श्रेणी व दुसऱ्यास दुसरी श्रेणी म्हणतात. पहिल्या श्रेणीचें किमान् भाडें दीड आणा व दुसरीचें सव्वा आणा आहे. ट्रामगाड्यांचे ठराविक टप्पे नसून त्या उतारूंच्या सोयीप्रमाणें थांबतात. तसेंच तिकिटांचे दरहि अंतराप्रमाणें कमजास्त असतात. ट्रामसंयोग किंवा टप्पे यांच्या संख्या किंवा नांवें कोठेंहि निर्दिष्ट केलीं नसल्यानें सुशिक्षित अनोळख्यांची देखील इष्टस्थळ न कळल्यानें त्रेधा उडते. इष्टस्थळ बरेंच पुढें किंवा मागें राहून बराचसा रस्ता पायीं चालून जाण्याची पाळी मजवर अनेकदां आली.

येथें मुंबईतल्यासारख्या व्हिक्टोरिया फार थोडया आहेत. पडदापद्धतीच्या फैलावामुळें बग्या भरपूर आहेत. रिक्शा सुमारें दोन हजार आहेत; तथापि रिक्शांतून जाणें म्हणजे मनुष्यत्वाचा उपमर्द करणें आहे अशी जाणीव सुशिक्षितांच्या मनांत येऊं लागलेली दिसली.

उत्तरेकडील माणिकताला नांवाच्या वस्तींत श्रीशीतलनाथजीचें जैन देऊळ आहे. यास सामान्यपणें पारसनाथ मंदिर या नांवानें ओळखतात. पांढऱ्या दगडाचें हें चिमुकलें मंदिर भोंवतालच्या बगीच्यांतील जागोजाग उभ्या केलेल्या पुतळ्यांच्या आणि भिंतीवर, जमिनीवर व कळसावर चिकटविलेल्या रंगीबेरंगी कांचखंडांच्या योगें फारच शोभायमान दिसतें. त्यांतल्यात्यांत जेव्हां चंद्र किंवा सूर्यकिरण या काचखंडांवरून परावर्तन पावतात तेव्हां होणारा चकचकाट फारच प्रेक्षणीय असतो.

*   *   *

मी उतरलों होतों त्या पथिकाश्रमाच्या मॅनेजरनीं एखादें बंगाली नाटक पाहून जाण्याचा आग्रह केला. मराठींत नाटकें चांगलीं होतात असें त्यानें वाचलें होतें, त्याचा उल्लेख करून तो म्हणाला, "सर, एखादें बंगाली नाटक पहा आणि बंगाली रंगभूमि श्रेष्ठ कीं मराठी श्रेष्ठ त्याचा विचार करा."

त्याच्याच उपदेशाप्रमाणें पथेर शेषे ( उच्चार पॉथेर षे खे = पथाच्या शेवटीं ) नांवाचें अभिजात नाटक पाहण्यास मी एकटाच गेलों. पथिकाश्रमांतील इतर महाराष्ट्रीय बंधूंनीं तो रविवारची संध्याकाळ नाटकगृहांत फुकट न घालविण्याचें ठरविलें होतें. पथिकाश्रमांतून नाटकगृहाकडे जातांना वाटेंत एका लहान क्रीडांगणांत अमुक अमुक घोष, बंगाली रंगभूमीचा जनक, याचा समान आकाराचा संगमरवरी पुतळा बसविलेला पाहून मराठी रंगभूमीचे जनक आणि नट यांचा समाजांत कोणता दर्जा आहे असा प्रश्न मीं मनास केला. त्याचें उत्तर मिळण्यापूर्वीच मनमोहन थिएटरांत प्राप्त झालो व चार रुपयांचें तिकीट काढलें. जाहीर केलेल्या वेळेपेक्षां येथें खेळ फार उशीरा सुरू करितात असें पथिकाश्रमांत कळलें असल्यानें मीं आपल्याकडून अर्धा तास उशीरा नाटकाला गेलों; पण तेथें कशालाच कांहीं ठिकाण नव्हता. रंगभूमीसमोर एक पियानो, एक तबलाजोडी आणि सहा फिडलें ठेविलीं होतीं. ५–३० वाजतां या सगळ्या वाद्यांचा जलसा चालू झाला व दहा मिनिटांनीं जलसा बंद होऊन नाटक सुरू झालें. प्रारंभी एक तास, दहा मिनिटें इतका उशीर झाला तरी प्रेक्षकांची कुरकूर अनुभवास आली नाहीं. नाटक सामाजिक होतें.

प्रथम दोन म्हातारे रंगभूमीवर दिसले. एक म्हाताऱ्याचें काम करण्यांत पटाईत असणारा मॉडर्न रिव्ह्यूंत गाजलेला दानी बाबू ( बंगाली लिहिणें वाबू, उच्चार बॉबो ) हा गुडगुडी ओढीत खुर्चीवर बसला होता आणि दुसरा त्याचा कारकून ब्राह्मण होता.

दानीबाबूच्या मुलानें कांहीं तरी अपराध केला होता. आणि मुलाची तरफदारी ब्राह्मण करीत होता. मधूनमधून दोघेजण बेश म्हणत होते. बेश म्हणजे ठीक हा कोंकणी शब्द देश, वऱ्हाड, गोंडवण इत्यादि प्रांतांत गुप्त राहून बंगालमध्यें कसा प्रकट झाला कोण जाणें! तसेंच ‘ होय ’ याला ‘ अच्छा ’ म्हणत होते; तेव्हां मला वि. सी. गुर्जरांच्या गोष्टींत ‘ अच्छा ’ पुष्कळदां कां येतो, तें समजलें! मग दानीबाबूचा व्याही येतो, त्याला दानीबाबू कायसें सांगतो, व ‘ आमी तुमार पाया पड़ूं ’ असें कायसें म्हणून त्याच्या पायां पडतो. व्याही कपाळावर हात मारून रडतो आणि जातो. इतक्यांत नाटकाचा कलिपुरुष व त्याची विधवा आई तेथें येऊन दानीबाबूस कांहीं

सांगतात. पडदा पडतो. पुनः कांहीं वेळ जलसा चालून बंद होतो व पडदा उघडतो. थोड्या वेळानें नायकनायिका येतात. नायिका ही स्त्रीच होती, म्हणजे नायिकेचें काम करणारें मनुष्य स्त्री होतें व वयानें वीस वर्षांचें असावें. नायक नायिकेला बुरखा काढण्यास सांगतो, ती काढीत नाहीं. दोघांत बऱ्याच प्रेमचेष्टा होतात तोंच नाटकाचा दुर्जन येतो. त्याच्या मागोमाग म्हातारा कारकून येतो. म्हाताऱ्यावर नायकाची फार प्रीति दिसली. म्हाताऱ्यानें त्यांस सांगितलें, 'तुला बापाने घरांतून काढून लाविलें आहे.' नायक यावर खूप आवेशयुक्त भाषण करतो व त्याचा शागीर्द म्हातारा गोविंद त्यास पोटाशीं धरून गोंजारतो. म्हातारा कारकून शोक करीत परत जातो. दुर्जन आनंदानें पण बाह्यात्कारीं रडत परत जातो. शेवटीं नायक, नायिका व गोविंद घरांतून बाहेर पडतात.

पडदा......

जलसा......

पांच मिनिटें मोजून काढिलीं. कंटाळलों.

एक खूप लठ्ठ बाबू डुलतडुलत आपल्या नंबरची खुर्ची शोधण्यास आला. तो ज्या ज्या रांगेंत जाई तेथील लोकांची पाय उचलून त्यास वाट करून देतांना मोठी धांदल उडे. हा ज्याच्या शेजारीं बसेल त्याची चांगलीच कंबक्ती आहे असा विचार मनांत येऊन मला हंसूं येत होतें.

दहा मिनिटें झालीं.

तो लडदू—

पडदा उघडला. बंगाली खेड्यांतील रस्त्याचा एक सुरेख देखावा रंगभूमी-वर रचला होता. दोन बाजूंस झोपड्या दाखविल्या होत्या. नायिका डोक्यावर घट्ट पदर बांधून बसली होती; नायक फाटके कपडे घालून जवळच उभा होता. देखावा फारच हृदयद्रावक होता; कारण सर्व नाटकगृहांत शांतता पसरली होती आणि कित्येक बाबूंच्या उपनेत्रांच्या कांचांवर पाण्याचे थेंब दिसत होते. कांहीं सुस्कारेहि कानीं पडत होते. नायिका आकाशाकडे पाहत आपल्या

कपाळाला हात लावी व खूप लांब भाषणें करी. मधूनमधून आपल्या पुढ्यांत ठेवलेल्या जुन्या चिरगुटांच्या गाठोड्याकडे बोट दाखवी. मला वाटलें, हीं चिरगुटें बोहऱ्याला देऊन भांडीं घेण्याचा तिचा विचार असावा; पण त्यांजवर कांहीं मिळत नसल्यानें ती दैवाला दोष लावीत असावी! पण तसें नव्हतें. त्या चिरगुटांत तिचें मूल होतें असें मीं समजावयास पाहिजे होतें! नायक व नायिका यांचें मूल भुकेनें व्याकूळ झालें होतें.

हें दृश्य पाहण्यांत मी गर्क झालों असतां, माझ्या डोळ्यांपुढून ढग पलीकडे जावा तसा अंधार येऊन गेला. माझे पाय खुर्चीवरून लोंबत होते. दळाखालीं चिरडल्यासारखे ते दाबले गेले आणि लगेच एक दीर्घ उसासा कानीं पडून मी आपल्या खुर्चीत जोरानें कोंबलों गेलों. तो लठ्ठ बाबू माझ्या शेजारीं येऊन बसला होता! आधींच करुणरसप्रधान असणारा प्रवेश या बाबूच्या सान्निध्यानें अधिक करुण झाला! सुदैवानें माझ्या ओळखीचीं माणसें थिएटरांत नव्हतीं, नाहीं तर उपरोधिक टाळ्यांचा मजवर खूप वर्षाव झाला असता.

काय लिहीत होतों मी? तो नायक मुलास दूध आणण्याकरितां पडद्यांत जातो. नायिका थोडेंसें स्वगत भाषण करिते. मग नोकर गोविंद काठी टेकीत टेकीत येतो. त्याच्या हातापायांना व डोक्याला जखम झालेली असते. मुलाची स्थिति पाहून तोहि कसाबसा दूध आणावयास जातो.

रक्तबंबाळ झालेला नायक रक्तानें भरलेला द्रोण घेऊन येतो, व द्रोणांतील पदार्थ मुलास दे, असें नायिकेस सांगतो. ती द्रोण घेऊन त्यांत काय आहे तें पहाते व "रॉक्त! रॉक्त!" असें ओरडत हातांतील द्रोण पाडून टाकते. नायक चिरगुटांच्या गाठोड्यास स्पर्श करून मूल मेलें, असें ओरडतो. नायिका ओरडते.

तोंच गोविंद एका खापरींत दूध घेऊन, "शिशिमॉणी! दूध! शिशिमॉणी! चिन्ता नको (?) दूध!" असें आनंदानें म्हणत प्रवेश करतो. नायक त्याच्या हातांतील खापरी घेऊन "की? दूध?" असें ओरडत वेडेविद्रे डोळे व हिस्टे-रिकल चाळे करीत त्या खापरीकडे पाहत राहतो.

"लाइट! लाइट!" प्रेक्षक ओरडतात. लाल हिरव्या रंगाचे केंद्रीभूत

किरण वेड लागलेल्या नायकाच्या तोंडावर पाडण्यांत येतात. त्यांच्यायोगें त्यास अधिकच माज चढतो. नायिका त्याच्याकडे पाहून किंकाळी फोडून बेशुद्ध पडते. नायकास टाळ्या पडतात. त्यांनीं उत्तेजन मिळून तो—

दूध !

दूध ! !

दूध ! ! !

असें वाढत्या आवाजांत ओरडतो. खापरी टाकून देऊन अंगांत आल्यासारखें ओरडतो व शेवटीं दमून जाऊन धरणीवर आंग टाकून देतो. गोविंद तसेंच करतो. करुणरसाचा कळस होतो. पडदा खालीं.

वन्-टू-थ्री ! फिडलवाल्यांचा नाईक ऑर्डर देतो. जलसा सुरू होतो.

या करुणरसाच्या अतिरेकानें आणि शेजारील खुर्चीवरच्या लठ्ठंभारती बाबूच्या रेटारेटीनें मी इतका मेटाकुटीस आलों कीं, नाटकाच्या अवशिष्ट भागावर पाणी सोडून हॉटेलांत परत आलों. एकंदरीनें पाहतां संगीत खेरीज करून इतर बाबतींत वंग रंगभूमि (उच्चार: बॉङ्ग रॉङ्गभूमि) आपल्या महाराष्ट्रीय भगिनींपेक्षां मागासलेली नाहीं असें दिसलें. गुजराथी व उर्दू नाटकांशीं तुलना न करितां बंगाली नाटकें मराठी नाटकांशींच तुलण्याजोगीं असावीं असा माझा ग्रह झाला. मात्र बायकांच्या पुरुषांच्या अभिनयांतहि मूर्च्छा व मेंदूची दुबळाई दाखविण्यांत येत होती. भावनाप्रधानता हा बंगाली गुण (?) त्यांच्या नाटकांत ठळकपणें दिसला; भावनाविवशता हा पौरुषास उत्तेजक धर्म नाहीं हें सांगावयास नकोच.

हबड्याच्या दक्षिणेस नदीकांठीं चित्रकार्डप्रसिद्ध वनस्पतिसंग्रह आहे तो पाहण्यासाठीं मी एक दिवस गेलों होतों. हायकोर्टाच्या प्रचंड इमारतीशेजारीं हुगळी नदीच्या कांठीं चांदपाल घाट नांवाचा धक्का आहे. तेथें वाफहोडींत बसून बोटॅनिकल गार्डन्स घाटाशीं उतरलों. ही अति विस्तृत बाग नदीच्या किनाऱ्या किनाऱ्यानें आहे. निरनिराळ्या झाडांच्या लांबच लांब राया मोठ्या कौशल्यानें रचिलेल्या आहेत. ह्या बागेच्या एका कोंपऱ्यांत असलेल्या प्रचंड

वटवृक्षाचीं छायाचित्रें पाहिलेलीं असल्यानें त्या वृक्षाचा शोध करीत पाय दुखेपर्यंत फिरलों, तरी त्या वृक्षाचा शोध लागेना. एका ठिकाणीं लहानलहान वडाच्या झाडांचा वर्तुळाकार वृंद दृष्टीस पडला आणि मोठ्या झाडाच्या शोधार्थ निरनिराळ्या वाटांनीं हिंडून मार्गदर्शक पाट्या पाहून त्यांच्या अनुरोधानें परत त्याच ठिकाणीं येऊं लागलों. माझे निरर्थक हेलपाटे पाहून एका मायाळू गृहस्थानें म्हटलें, "सद्गृहस्था, काय शोधीत हिंडत आहेस तूं येथें?" मी म्हणालों, "साहेब, तुमचा तो प्रचंड वटवृक्ष कुठें दडून बसला आहे तें पाहतों." तेव्हां त्यानें सांगितलें, "तो प्रचंड वटवृक्ष आतां कालाच्या उदरांत दडून बसला आहे. हीं त्याचीं लहानलहान बालकें मात्र जिवंत आहेत. ही ह्या वटवृंदाच्या मध्यभागीं कोरी जागा दिसत आहे ना? तिच्यांत त्या प्रचंड वटवृक्षाचा बुंधा होता. भोंवतालचीं पारंब्यांपासून उपजलेलीं झाडें पहा परस्परांशीं निगडित झालेलीं आहेत तीं."

सर्व शाखांना टेके दिलेले व पारंब्यांस पाणी व माती देऊन मुद्दाम जोपासलेलें दिसत असल्यानें बरीच निराशा झाली.

एवढा मोठा बाग परंतु त्यांत फिरावयास एकहि स्त्री आलेली दिसली नाहीं. हा बाग आमच्या पुण्यामुंबईस असता तर बायकांच्या गर्दींतून वाट काढतां काढतां माझ्या नाकीं नव आले असते. पडदापद्धतीवर प्रवचन करण्याचा माझा उद्देश नसल्यानें एवढेंच लिहून ठेवतों कीं, या पद्धतीनें बंगाल प्रांत जगांतल्या निम्म्या सौंदर्याला, निम्म्या काव्याला आणि निम्म्या आनंदाला मुकला आहे. कांहीं ब्राह्मो स्त्रिया व नाटकांतील स्त्रिया यांच्या पोशाकावरून दिसून आलें कीं, बंगाली स्त्रियांची लुगडें नेसण्याची तऱ्हा मराठी विकच्छ तऱ्हेसारखी आहे. डाव्या खांद्यावरून व डोकीवरून त्या पदर घेतात. घरीं त्या चोळ्या वगैरे कांहीं घालीत नाहींत. मात्र पडदा न पाळणाऱ्या स्त्रिया पोलकीं घालतात.

बंगाली पुरुषांचा वेश सर्वांनीं पाहिलाच आहे. बंगाल्यांत शेंकडा पंचावन मुसलमान व पंचेचाळीस हिंदू असतात असें वाचण्यांत आल्यानें तिकडे सर्वत्र तुमान व तुर्की टोपीवाले मियाभाई पुष्कळ दिसतील असें मला वाटत होतें.

ज्या ऑफिसांत मी काम शिकण्यास गेलों होतों त्याचे व्यवस्थापक श्रीयुत जितेंद्रबाबू यांस मीं विचारिलें, "बाबू, येथें नोकऱ्यांत मुसलमानांचा विशेष भरणा असतो असें मीं ऐकलें होतें आणि येथें तर सगळे हिंदूच दिसत आहेत!" बाबू म्हणाले, "अहो, ह्या समोर बसलेल्या नोकरांत पाऊणपट नोकर मुसलमान आहेत; ते सगळे बंगालीच बोलतात अन् हिंदूंसारखाच पोशाख करितात. समोरचा बाबू शशिमोहन आहे कीं, सैयद अहमद आहे किंवा अरविंद सेन आहे कीं, अबदुल खान आहे हें तुमच्या सहज लक्षांत येणार नाहीं." असें असल्यानें आपण अर्धयावनी प्रांतांत असल्यासारखें तेथें वाटत नाहीं.

बंगाली लिपी नागरीपेक्षां बरीच वेगळी असल्यानें बंगाली भाषा शिकणें कंटाळवाणें जातें. बंगाली लोकांनीं देवनागरीचा स्वीकार केल्यास राष्ट्रैक्यास फार मदत होईल. परंतु वैशिष्ट्याभिमानी वंगजनता तसें करण्यास तयार होणार नाहीं म्हणून एक लहानसा सुलभ बाँगला शिक्षक येथें बसवून ठेवीत आहें:—

**लिपीः**—वर रेघ देऊन खालीं चकल्या कडबोळीं काढावीं.

**उच्चारः**—तोंड गोल करून बोबडें बोलावें. अचा उच्चार ऑ होतो. हॉल, बॉल, बॉम्ब हे शब्द बंगाली हल, बल, बम्ब असे लिहिले जातात. उलट हल (नांगर), बळ आणि बम्ब यांचे उच्चार हॉल, बॉल आणि बॉम्ब असे होतात.

न–ण, ब–व, य–ज, श–ष–स, ह्या अक्षरसमूहांचे उच्चार सारखे होतात.

**शब्दकोशः**—

| | |
|---|---|
| की | = म्हणजे काय ? |
| चाय | = चहा किंवा पाहिजे. |
| चाय चाय | = चहा पाहिजे. |
| ना | = नाहीं. |
| चाय ना | = नको. |
| र | = चा-ची-चें (देशेर, बाबूर इ.) |
| जल | = जॉल = पाणी. |

अच्छा = होय.
आछे = आहे ( मराठी आ + छे ).
बेष = बेश.
जॉल खॉबर = फराळ.
खॉबार जॉल = पिण्याचें पाणी.
आमी = मी ( आम्ही नाहीं ).
तुमी = तूं ( तुम्ही नाहीं ).

वरील माफक ज्ञान खिशांत टाकून बंगाल्यांत बीन अडचणीनें वाटेल तितका प्रवास करावा. शब्दकोष अपुरा पडल्यास हिंदी अगर इंग्रजी भाषेचा उपयोग करावा म्हणजे झालें.

१९२१ च्या खानेसुमारीप्रमाणें कलकत्ता शहरची उपनगरांसह वस्ती ११,३२,२४६ व मुंबईची उपनगरांशिवाय ११,७५,११४ होती. अर्थात् मुंबईपेक्षां कलकत्ता लहान आहे आणि उगाच त्याला साम्राज्यांतील दुसरें नगर म्हणतात !

*[ या लेखाचा परिशिष्ट पुस्तकाचे शेवटीं ' **रिक्षा** ' या गोष्टींत वाचावा. ]

## महाराष्ट्राच्या छपरावर : : : : ७

साल्हेरचा किल्ला हें श्री. गायकवाड सरकारचें एकच ठाणें महाराष्ट्रांत आहे. तपासणीच्या कामाकरितां साल्हेरला जाण्याचा बेत पुष्कळ वेळां मीं केला होता; पण कोणत्या ना कोणत्या अडचणीनें तेथें पोंचण्याचा योग आला नाहीं. १९३९ मध्यें आमचा मुक्काम सोनगडास झाला. तेव्हां मात्र बरोबर असलेल्या माझ्या मुलानें हट्ट धरून मला साल्हेरचा दौरा काढणें भाग पाडिलें. त्यांतून त्याला नवीनच छायाचित्र यंत्र घेऊन दिलें असल्यानें जंगलांतले देखावे घेण्यास तो फारच उत्सुक झाला होता.

सोनगडपासून अग्नेय दिशेस तीस कोसांवर साल्हेर आहे. सोनगडच्या दाक्षिण टोंकावरून साल्हेरचें उत्तुंग शिखर हवा स्वच्छ असल्यास साध्या डोळ्यांनीं दिसतें. सोनगडाहून साल्हेरला जाणारी बैलगाडीची वाट तीस कोसांची आहे; पण ती सोयीची नसल्यानें लांबच्या वाटेनें जाण्याचें आम्हीं ठरविलें.

वैशाख मासांतील एके दिवशीं आमचे वृद्ध शिरस्तेदार रा. गवारीकर, तरुण कारकून रा. खरे, तीन शिपाई आणि बारा वर्षांचा मुलगा अशा परिवारासह आगगाडीनें सोनगड सोडून एक तासानें दुपारीं बाराच्या सुमारास चिंचपाडा स्टेशनवर येऊन पोंचलों. खानदेशांतला उन्हाळा तो! अडीच तास

त्या स्टेशनवर भर उन्हांत घालवायचें दिव्य आम्हीं पार पाडलें. आमची गाडी पोंचण्याच्या अगोदरपासूनच स्टेशनच्या अंगणांत आम्हांला घाटांत घेऊन जाणारी मोटार बस येऊन उभी राहिली होती. दुपारीं तीन वाजतां आमच्या बशीनें चिंचपाडा सोडिला आणि तासाभरानें कोंडाईबारी नांवाचा चढ चढून सह्याद्रीच्या उत्तरेकडील ओळींत प्रवेश केला. कोंडाईबारीचें नांव गुजराथचें प्रवेशद्वार ह्या नात्यानें जुन्या कागदपत्रांत मीं वारंवार वाचलें होतें. पण आतां ती निबिड झाडीनें झांकलेली उंच टेकड्यांमधली सुंदर वाट प्रत्यक्ष पाहून मला फार आनंद झाला. ह्या ऋतूंत गुजराथेंतील बहुतेक नद्या आणि सगळे ओढे पार आटून गेले होते. तलावांच्या जागीं कोरडे खळगे दिसत होते, पण कोंडाईबारींतून घाट चढून उंच भागांत आल्यावर तेथील प्रत्येक ओढा पाण्यानें खळखळ वाहत असलेला दिसला.

संध्याकाळीं पांच वाजतां आम्ही साकरी येथें येऊन पोंचलों. ह्या ठिकाणीं मोटार चार तास थांबणार असें ऐकल्यानें आम्हीं एक खाणावळ शोधून काढिली आणि तींत जेवणेंखाणें करून घेतलीं. रात्रीं नवाला आमच्या मोटारनें साकरी सोडिली आणि एक तासानें पिंपळनेरला येऊन थडकलों. रात्र घालवायची कोठें ह्या विवंचनेंत आम्ही पडलों. तेव्हां चालकानें डाक बंगल्यांत उतरण्याचा सल्ला आम्हांस दिला. आम्हीं त्याला आम्हांला तेथें सोडून दे असें सांगितलें. त्यानें अंधारांत एका काम्पाउन्डांत आम्हांला उतरवून हाच डाक बंगला अशी माहिती दिली. आम्हीं सामानसुमान काढून घेऊन मोटारवाल्यास रजा दिली. "पगी! पगी!" अशा आमच्या शिपायांनीं हाका मारिल्या; पण डाक बंगल्याच्या रखवालदाराचा मुळींच पत्ता नव्हता. बंगल्याचीं दारें सताड उघडीं होतीं; परंतु त्यांत दिवा नव्हता. आम्हीं आमच्या सामानांतले कंदील काढिले आणि त्यांच्या उजेडांत बंगल्याचा एक भाग गुंतवून टाकिला. बंगल्यांत पाण्याचा थेंब नव्हता व आजूबाजूस चिटपाखरूंहि नसल्यानें चौकशी तरी कोणाजवळ करायची? शेवटीं जवळ असलेलें लोटाभर पाणी आपसांत वांटून घेऊन पथाऱ्या टाकून निजून गेलों. साकरीस पोटपूजा झालेलीच होती. डफ तुणतुण्याचा आवाज अंतरावरून ऐकूं येत होता. त्याच्या नादांत मला गुंगी लागली; पण तो आवाज थांबतांच जाग आली. आणखी

पांचदहा मिनिटांनीं रखवालदाराची स्वारी तेथें प्राप्त झाली आणि आम्हांला, "अगोदर एंगेज केल्याशिवाय येथें कसे उतरलां ?" अशी दमदाटी देण्यास तिनें प्रारंभ केला.

"उद्यां सकाळीं तुझे पैसे देऊन टाकूं आणि जागा खाली करूं. आतां आमची झोपमोड करूं नको," अशी आम्ही ताकीद दिली तेव्हां तो जवळच पडवींत निजला. सकाळीं उठल्यांनंतर भोंवतालचा देखावा पाहून आम्हांला फार आल्हाद झाला. बंगल्याभोंवतीं मोठालीं झाडें असून त्यांत फळभारानें डवरलेल्या आम्रवृक्षांचा भरणा विशेष होता. मोर आणि वानरें कैऱ्यांवर यथेच्छ ताव मारीत होतीं. आम्ही निजलों होतों तेथपासून केवळ शंभर हात अंतरावर बांधून काढलेलें स्वच्छ वाहत्या पाण्याचें रामकुंड आम्हांस आतां दिसलें. किती तरी लोक एवढ्या सकाळीं तेथें येऊन कुंडाचें पाणी भरभरून नेत होते; पण थोड्याच तासांपूर्वी काळोखांत तें आम्हांला न दिसल्यानें तहान मारून आम्ही झोपीं गेलों होतों. अज्ञानाला अंधःकाराची उपमा किती समर्पक आहे त्याचा प्रत्यय आम्हांला तेव्हां आला. आम्हीं रामकुंडाच्या पाण्यानें प्रातर्विधि उरकले. जवळच एका डोंगरास दोन शृंगें दिसत होतीं. त्यांवर जैनांचीं देवळें आहेत असें एका स्थानिक गृहस्थानें सांगितलें.

सकाळीं नऊ वाजतां आम्हांला पिंपळनेराहून पुढील मुक्कामास नेण्याकरितां आमचा यांत्रिक खटारा बंगल्याच्या आवारांत येऊन थडकला. आम्ही आपल्या आठ तासांच्या मुक्कामाचे आठ आणे रखवालदाराला देऊं लागलों; पण त्यानें काँग्रेस सरकारचें सुधारलेलें दरपत्रक आम्हांस दाखविलें. त्यांत दैनिक आकार आठ आण्यांबद्दल दोन रुपये चढवून दिला होता. नाहीं पाणी, नाहींत भांडीं, नाहींत गाद्या आणि दर मात्र दोन रुपये! पण आतां काय उपयोग ? चढलेले पैसे देऊन टाकणें भाग होतें.

पिंपळनेराहून चार कोस गेल्यावर आणखी एक घाट आम्ही चढलों. त्याचें नांव शेजबारी. बारी हा शब्द गुजराथी आणि खानदेशी खिडकी या अर्थी वापरतात. शेजबारींत खानदेशची हद्द संपून नाशिक जिल्ह्याच्या बागलाण विभागास प्रारंभ झाला. पिंपळनेराहून सात कोसांवर ताहराबाद हें गांव लागलें. प्रसिद्ध कवि महिपतीबोवा यांचें ताहराबाद हें नव्हे. मोटार सडकेनें

सटाण्यास जाणार होती, त्यामुळें आमचा मार्ग आतां वेगळा पडणार असल्यानें आम्ही मोटारींतून उतरलों. मुल्हेरच्या देशमुखांचे कारभारी रा. शुक्ल यांनीं एक टांगा आमच्यासाठीं पाठविला होता. शिवाय एक भाड्याची बैलगाडी ताबडतोब मिळाली. इकडील बैल चालणारे नसून दौडणारे आहेत. घोड्यांच्या गतीपेक्षां त्यांची गति जराशीच कमी वाटते. ह्या दोन वाहनांत आम्ही सर्व विराजमान झालों आणि साडेतीन कोसांवरील एका उंच डोंगराच्या पायथ्याशीं असलेल्या मुल्हेर गांवीं सकाळीं अकरा वाजतां जाऊन पोहोंचलों. मुल्हेरीस देशमुखांच्या वाड्यांत आम्ही उतरलों. वाड्याची मालक मंडळी जरी तेथें नव्हती तरी त्यांचे कारभारी रा. शुक्ल यांनीं आमचा आदर सत्कार केला. काल रात्रीं पिण्यास पाणी देखील मिळालें नव्हतें. निर्जळा उपवास घडला होता त्याचा वचपा आज पुरणपोळीची मेजवानी झोडून काढून टाकला. दुपारीं यजमानांचा निरोप घेऊन आम्ही पुढें निघालों. मुल्हेरचा अजस्र डोंगर हळूंहळूं क्षितिजांत लय पावूं लागला आणि सालोटा व साल्हेरचे डोंगर क्षितिजांतून आमच्या दृष्टिपथांत येऊं लागले. मुसलमानी अमदानींत गुजराथ व बागलाण यांस जोडणारा रस्ता साल्हेर आणि मुल्हेर ह्या दोन डोंगरांच्या मधून जात असे. रस्त्यावर काबू राखण्याकरितां ह्या दोन्ही डोंगरांवर किल्ले बांधण्यांत आले आणि शत्रुसैन्यास रस्त्याचा उपयोग होऊं नये अशी तजवीज करण्यांत आली. वाडें-घोडें, खांदेरी-उंदेरी या जोडनांवांप्रमाणेंच साल्हेर-मुल्हेर हें जोडनांव प्रचारांत आलें.

वाटेनें एक लहानसा पांच पुडांचा डोंगर आणि त्याच्या जवळच एक लहान टेंकडी दिसूं लागली. मीं गाडीवाल्यास त्या डोंगराचें नांव विचारिलें. गाडीवाला म्हणाला, “ हे पांच पांडव आहेत. ” मी त्याला म्हणालों, “ पांच पांडवांचीं नांवं तुला माहित आहेत काय ? ”

त्यानें खानदेशी भाषेंत उत्तर दिलें, “ मने सगळीं नांवां माहीत नाहींत ! पण ह्यो मोटो भिवा छे. त्यांना पलीकडे धरमा छे. ”

मी बाकीच्या पांडवांचीं नांवें अर्जुना, नकुळ्या आणि सहदेवा अशीं त्याला सांगितलीं आणि त्याला विचारिलें, “ ही लहान टेकडी भिवाच्या समोर दिसत आहे तिचं नांव काय ? ”

मला वाटलें तो तिला धुर्पती म्हणेल; पण त्याची कल्पनाशक्ति अधिक उज्ज्वल होती. तो म्हणाला, " तो भिवाना तमाकु ठेववाना बटवा छे। "

वाटेनें भिल्ल लोकांच्या स्मारक शिळा सारख्या लागत होत्या. मृत माणसांच्या स्मरणार्थ ह्या शिळा उभ्या करण्याची रीत गुजराथ आणि लगतच्या प्रदेशांत बरीच प्रचलित आहे. त्यांवर चंद्र, सूर्य, घोडेस्वार वगैरे आकृति घडविलेल्या दिसतात. माझ्या मुलानें एका शिळेचें छायाचित्र घेतलें. त्या शिळेवर मनुष्य आणि वाघ यांची झटापट कोरली आहे. ज्या ब्राह्मण गृहस्थाच्या स्मरणार्थ ती घडविली गेली तो गृहस्थ घोड्यावर बसून जात असतां एका वाघानें त्यास पाहिलें. अशा वेळीं जनावरास वाघाच्या तोंडीं देऊन आपण सटकावें हा धूर्तपणाचा मार्ग मानवी नीतिशास्त्रांत सांगितला आहे; परंतु ह्या गृहस्थानें आपल्यासकट घोड्याचा बचाव करण्याचा यत्न केला. वाघानें त्याला पकडलें व लोक धांवून येण्याच्या आंत तो वाघाच्या भक्ष्यस्थानीं पडला. वाघानें मारलेल्या माणसाच्या शिळेवर वाघाची, तसेंच साप डसून मेलेल्या माणसाच्या शिळेवर सापाची आकृति काढण्याची वहिवाट आहे असें तेथील लोकांनीं सांगितलें. त्या शिळांस गुजराथींत पाळिया आणि मराठींत वीर म्हणतात. लढाईंत मेलेल्या वीरांच्या पाळियांवर घोड्याचें चित्र असतें. ह्या भागांत नवीन वीर दगडाचे करण्याऐवजीं लाकडाचे सुबक व कोरीव करण्याची प्रवृत्ति वाढत असलेली दिसली.

साल्हेरच्या पायथ्याशीं इंग्रजी हद्द संपून गायकवाडी सुरू होते. वाघांबा नांवाच्या खेड्यापासून चढ सुरू होतो. बैलगाडी किंवा मोटारनें वरपर्यंत येण्यास चांगली वाट आहे. दोन कोस चढण चढल्यावर आम्ही रात्रीं एक वाजतां समुद्रसपाटीपासून ३१०० फुटांवर असलेल्या साल्हेर गांवीं पोंचलों. आदल्या रात्रीं आम्हांला तहान दाबून टाकावी लागली होती. नंतर दुपारीं पुरणपोळीची मेजवानी झोडली आणि आतां पुन्हां चांगलाच उपास घडला. ह्या अनिश्चितपणांतच प्रवासाची मौज आहे. साल्हेरला पोंचल्यावर तेथील इनमीन साडेतीन अधिकारी झोंपेंतून उठले आणि त्यांनीं आम्हांस निजण्याची व्यवस्था करून दिली. गांव अगदीं लहान म्हणजे अवघ्या सहाशें लोकवस्तीचें असल्यानें तेथें अशा अपरात्रीं दूधबीध मिळणें कठिण होतें असें आम्हांस कळलेंच

दुसऱ्या दिवशीं सकाळीं साल्हेरचें दर्शन झालें. डोंगरावर झाडी बरीच कमी दिसली. पाणी विहिरीचें पण आतां उन्हाळयांत त्याचा पुरवठा बेताचाच होता. हल्लीं ( १९३९ ) एक कृत्रिम तलाव खोदण्याचें सरकारकडून चालू आहे. तें यशस्वी झाल्यास पाणी-पुरवठा सुधारून साल्हेर हें महाबळेश्वरासारखें हवा खाण्याचें ठिकाण होईल. येथील झाडी वाढविण्याचा प्रयत्न जंगल खात्याकडून चालू आहे. देवदार, पींच आणि निलगिरी ( युकॅलिप्टस् ) ह्या थंड हवेंतील झाडांनीं येथें चांगलींच मुळें धरलेलीं दिसलीं.

सरकारी काम पुरें झाल्यावर आम्हीं गडावर जाण्याचा बेत केला. साल्हेर पेठ्याचे महालकरी, तेथील तलाठी आणि शाळेचे शिक्षक ह्यांनींहि आमच्याबरोबर वरतीं जाण्याचें ठरविलें. सकाळीं लवकर निघून वर भोजन करावयाचें आणि दुपारीं उन्हाच्या वेळीं खालीं यावयाचें असा कार्यक्रम योजिला. वरच सांजावल्यास जनावरांची भीति असते. ठरल्याप्रमाणें आम्हीं सकाळीं सहा वाजतां गड चढण्यास प्रारंभ केला. शंभर फूट चढल्यावर साल्हेरवाडीची जागा लागली. आतां ह्या जागेंत जुन्या घरांच्या आणि झोपडयांच्या खुणा उरल्या आहेत. पाण्याच्या अभावामुळें ह्या भागांतील वस्ती हल्लींच्या जागेंत उतरली. आमच्याबरोबर महालचा पट्टेवाला महादु आला होता. तो मराठी शुद्ध बोलतो आणि मराठ्यासारखे कपडे करतो; पण तो जातीनें भिल्ल आहे हें तीन दिवस आम्हांला कळलें नाहीं !

ह्या जागेंत दाट झाडी आणि करवंदीच्या जाळ्या पुष्कळच आहेत. करवंदीच्या जाळ्या वाघोबांचें आवडतें निवासस्थान असतें. ह्या जुन्या गांवठाणापासून वर जाण्यास ओबडधोबड पायऱ्या सुरू होतात. अनुपयोगानें पायऱ्यांची स्थिति इतकी खराब झाली आहे कीं, पुष्कळदां हात टेकीत चढावें लागत होतें. आमचे वृद्ध शिरस्तेदार तर शंभर पायऱ्या चढल्यावर जोरानें धापा टाकीत निपचित पडले. वारा घालून त्यांस नीट केलें आणि त्यांस परत जाण्याचा आम्ही आग्रह करूं लागलों. परंतु त्यांनीं वर येण्याचा उत्साह धरिला आणि पुनः ते थकल्यासारखे दिसले नाहींत. आपला थकवा कबूल करण्याचें मनोधैर्य वृद्ध माणसास क्वचितच असतें. पुष्कळ उंच चढल्यानंतर दोन दरवाजे लागले. दरवाजांजवळील भिंतीवर गणपति आणि मारुती यांच्या

मूर्तींचे कोनाडे आहेत. मुसलमानांच्या ताब्यांतल्या गडांवरहि ह्या देवता वास्तव्य करीत असलेल्या दिसतात.

३६४ वेडयावांकडया पायऱ्या चढून आल्यावर दरवाजांच्या पलीकडील सपाट जमिनीवर चालणें सुखावह वाटलें. ह्या सपाट जमिनीला कमरवाडी तबक असें म्हणतात. ह्या तबकावर एक टाकी, एक विहीर आणि चार बुरूज आहेत. त्यांपैकीं एकावर महालक्ष्मी नांवाची तोफ आहे. तबक संपल्यावर २१६ नवीन बांधलेल्या पण फार उभ्या पायऱ्या लागतात. आम्ही वर चढतांना अतिशय घामाघूम होऊन गेलों होतों; पण आमच्या जेवणासाठीं शिधासामग्री व सरपण घेऊन येणारे भिल्ल आमच्यानंतर दीड तासानें निघालेले होते, त्यांनीं आम्हांला गांठलें व भराभर वानरांसारख्या उडया मारीत ते हंसत खेळत वरती निघून गेले. ह्या पायऱ्यांची वाट एकंदर पांच दरवाजांतून निघून गेलेली आहे. पायऱ्या इतक्या अवघड आहेत कीं, गुरें किंवा घोडीं वरती जाणें अशक्य आहे. पायऱ्या संपल्यावर आवंडा दरवाजा आणि तबक नांवाची सपाट जागा लागते. ह्या जागेंत अनेक लहान टाकीं असून गंगातलाव नांवाचा सुंदर बांधून काढलेला तलाव आहे. त्याच्या चारी बाजू दगडांनीं बांधल्या आहेत. मध्यें पोहणारांच्या सोयीचे दगडी आधारस्तंभ आहेत आणि भोंवतालीं कांहीं देवळें आहेत. बारा वर्षांनीं एकदां या तलावाला भेटण्यास भागीरथी येते व त्या वेळीं तेथें मोठी यात्रा भरते. गंगातलावाच्या उत्तरेस सभामंडपाचा अवशेष, एक यज्ञस्तंभ व एक यज्ञकुंड आहे. ह्या कुंडाची लांबी, रुंदी आणि खोली सशास्त्र असल्यानें तें यज्ञ करणाऱ्या शास्त्री-पंडितांत प्रमाणभूत मानलें जातें. तलावाच्या कांठीं दोन अगदीं नवीन देवळें दिसलीं; एक शंकराचें आणि दुसरें जमदग्नीच्या कोपास बळी पडलेली परशुरामाची आई रेणुका हिचें.

गुडघाभर खोल पाणी असलेल्या गंगासागरांत स्नान उरकून आम्हीं तेथून पन्नास पायऱ्या उंच असलेल्या ठाणेदाराच्या हवेलींत प्रवेश केला. ही हवेली म्हणजे एका कोरीव लेण्यांतच दगडी भिंती घालून आणि दारें बसवून केलेली योजना आहे. लेण्याचे तीन भाग आहेत. एकांत स्वयंपाकाची जागा, मधल्यांत श्रीमंत गायकवाड सरकारची गादी आणि तिसऱ्यांत बसण्या-

उठण्याची कचेरी आहे. श्रीमंतांच्या गादीसमोर आम्हीं विश्रांति घेतली आणि कांहीं वेळानें भिल्लांनीं आणिलेल्या शिधासामग्रीच्या पाकसिद्धीचा समाचार घेतला. हिरव्या पानांच्या पत्रावळीवर गुजराती पद्धतीची खिचडी, तिच्यावर पानाच्या चमच्यानें वाढलेलें भरपूर तूप आणि मोठ्या थोरल्या द्रोणांत केलेलें जवळपासच्या कैऱ्यांचें पन्हें, इतक्याच जिनसा जेवणांत होत्या. परंतु वस्तीपासून दूर आणि उंच असलेल्या ह्या रम्य स्थळीं ह्या खिचडीची गोडी पंचपक्वान्नांच्या मेजवानीला लाजविणारी होती. साल्हेरचे तलाठी आम्हांला "हें जंगलमें मंगल आहे, साहेब, गोड मानून घ्या." असें वारंवार सांगत होते. (त्या काळीं जंगलमें मंगल नांवाचा बोलपट बराच गाजला होता). मी उत्तर देत होतों, "अहो दादा, मानून घ्यायचा प्रश्न नाहीं. खरोखरच आजची मेजवानी अपूर्व आहे."

गादीच्या ठाण्याच्या वर सुमारें दोनशें फुटांची टेकडी आहे. वाट बिकट आहे. ती चढून गेल्यावर गडाच्या उच्चतम टोंकावर परशुरामाचें लहानसें देऊळ लागलें. या ठिकाणची समुद्रसपाटीपासून उंची ५,२६३ फूट आहे. मुंबई इलाखा, मोगलाई आणि वऱ्हाड मध्यप्रांत ह्या भागांत कळसूबाई हें सर्वांत उंच शिखर आहे आणि साल्हेरचा क्रमांक दुसरा लागतो. येथून पश्चिमेला नजर टाकल्यास सप्तशृंगी व इतर शिखरें आणि चणकापूर तलावाच्या भिंती स्पष्ट दृग्गोचर होतात.

खालीं अगदीं खोल पाहिल्यावर डांग प्रदेशांतील जंगलें आणि त्यांतून वाहणाऱ्या पूर्णा व अंबिका नद्यांचीं लांबच लांब पात्रें दिसत होतीं. दिवस उन्हाळ्याचे असल्यानें वनश्रीचें वैभव डोळ्यांपुढें न येतां उंची, खोली आणि विस्तार यांचें ऐश्वर्य अनुभवास येत होतें.

परशुरामाच्या देवळाच्या उत्तरेस शंभर हात अंतरावर कड्याच्या माथ्यावर मनुष्याच्या पावलाच्या चौपट आकाराचीं दोन पावलें खोदलेलीं आहेत. बाण मारतांना मनुष्य ज्या पवित्र्यांत पावलें ठेवील त्यांतच बीनचूकपणें पावलांची योजना केली आहे. ह्या ठिकाणीं उभा राहून जमदग्निपुत्रानें बाण मारून समुद्र हटविला. परशुरामानें समुद्र हटविला ही कथा तर जगन्मान्यच आहे.

पण तो साल्हेरच्या शिखरावरून मारला कीं नाहीं अशी शंका कोणाला येत असल्यास त्यानें ह्या कड्यावरून पश्चिमेकडे बघावें. सुमारें तीन कोस अंतरावर एका डोंगराच्या तटाला आरपार भोंक पडलेलें स्पष्ट दिसेल. परशुरामाच्या बाणानें हें भोंक पडलें अशी लोकसमजूत आहे. साल्हेरपासून समुद्र सुमारें पंचवीस कोस आहे. परशुरामाचीं पावलें आणि समोरच्या तटांतील भोंक यांस काल्पनिक रेषेनें जोडल्यास आणि ती रेषा पश्चिमेकडे वाढविल्यास समुद्राच्या किनाऱ्यास नेमकी भिडेल असा अंदाज करतां येतो. दंतकथा खरी असो कीं खोटी असो, पण ती रचणारांच्या कल्पनाशक्तीची प्रशंसा केल्यावांचून राहवत नाहीं. येथील पावलांचा पवित्रा, समोरच्या नैसर्गिक तटांतील आरपार छिद्र व पंचवीस कोसांवरील समुद्र यांचें भव्य 'सेटिंग' त्या अवतारी पुरुषाच्या उदात्त कथेला अनुरूप असेंच आहे.

परशुरामाचीं अशींच आणखी कित्येक स्थानें उंच पर्वतावर आहेत. चिपळूणचा परशुराम मीं प्रत्यक्ष पाहिला होता; पण भर वस्तींतल्या त्या कोंदट देवळानें माझ्या अंतःकरणांत भक्ति उत्पन्न केली नाहीं. शिवाय तें देऊळ अगदीं जातिनिष्ठ वाटलें. फक्त ब्राह्मण लोकांतच त्याचा महिमा आहे असा माझा ग्रह झाला—कदाचित् तो चुकीचाहि असेल; पण साल्हेरच्या परशुरामास ब्राह्मणांप्रमाणेंच भिल्ल, कोळी, कुंकणे वगैरे तिरंदाज लोक भजतात.

ह्या उंच टेकडीवरून खालीं उतरून आम्हीं गायकवाडी गादीच्या पूर्वेस असलेल्या सुरती पोळ दरवाजाकडे मोर्चा फिरविला. एका बाजूला उंच कडा आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी अशा अरुंद पायवाटेनें जातांना उजव्या हातास एकंदर सोळा कोरीव लेणीं लागलीं. कांहींत पाण्याचीं टाकीं आहेत व कांहींत धान्याचीं कोठारें होतीं. दोन लेण्यांत बंदुकीची दारू होती, असें अजूनहि त्यांत येणाऱ्या गंधकाच्या उग्र दर्पावरून अनुमान करतां येतें. ह्या गुहांत गुजराथचा शेवटचा हिंदु राजा करण वाघेला हा दडून राहिला होता असें म्हणतात. ह्या सर्व लेण्यांतून खडकांत हिरव्यागार रंगाच्या पाषाणरेषा आहेत. यांचा औद्योगिकदृष्ट्या कितपत उपयोग होईल तें सरकारनें तपास करण्याजोगें आहे. अशाच पाषाणरेषा अजिंठ्याच्या डोंगरांत दिसतात.

लेण्याच्या पलीकडे सुरती पोळ दरवाजा सुरत शहराकडे तोंड करून उभा आहे. तेथूनहि खालीं जाण्यास वाट आहे.

गडावर गुरें मुळींच दिसलीं नाहींत नि मागें सांगितल्याप्रमाणें वर येण्याचा मार्ग इतका उभा, घसरडा व अरुंद आहे कीं, माणसालासुद्धां कठीण वाटतो. मग गुरें कशीं वर येणार? पण पूर्वी परशुरामास गाई किंवा बैल अर्पण करण्याची वेडी चाल होती. लहान वासरांसच पाठुंगळीं मारून नवस करणारे गडावर नेऊन सोडीत. तीं वासरें मोठीं झाल्यावर त्यांची प्रजा आणि नवीन आणून सोडलेलीं वासरें असा स्वतंत्र गोलोक वर निर्माण झाला होता. त्यांत खोंड असायचेच नि त्यांच्यांत टकरा व्हायच्याच. अशा टकरा होऊन पांच पांचशें फूट उंचीच्या कडयांवरून कित्येक जनावरें खालीं पडून त्यांचा चक्काचूर होत असे. तसेंच उन्हाळ्यांत माथ्यावरील गवत सुकून गेल्यावर त्यांची उपासमार होत असे. आतां मात्र वासरें वाहण्याची चाल सरकारनें बंद केलेली आहे.

गडावरून खालीं येतांना भोंवतालच्या गिरिदुर्गांचें निरीक्षण करून मी भिल्ल वाटाड्याकडून जिज्ञासा तृप्त करून घेत होतों. भोंवतालच्या डोंगरांतून वस्तीपासून दूर अशा शांत ठिकाणीं मोठाल्या नैसर्गिक आणि कृत्रिम गुहा आहेत. ज्या वेळीं भिल्ल लोकांत महामारी, देवी यांसारखे रोग किंवा दुष्काळ उद्‌भवतो तेव्हां आसपासचे सर्व भिल्ल धान्य, तेल, कोंबडीं वगैरे खाद्यपदार्थ आणि दारू घेऊन डोंगरावर जातात. खाद्यें, वाद्यें आणि मद्यें डोंगरावर गुहेच्यापासून लांब अंतरावर ठेवितात व शुचिर्भूत होऊन गुहेंत जाऊन गुहा कानाकोपऱ्यांसह स्वच्छ झाडून तींत एक दिवा लावितात. बराच वेळ सर्वजण तेथें कांहीं न बोलतां एकत्र बसून राहतात व मग अशा उपासनेनंतर आपले जिन्नस ठेविले असतील तेथें येऊन खाणें, पिणें आणि गाणें-नाचणें यांत वेळ घालवितात. खाद्यें, वाद्यें आणि मद्यें यांचा विटाळ गुहेला होऊं देत नाहींत. ह्या गिरिपूजनाला ते 'डोंगऱ्या देवा' असें म्हणतात. "कांईबी संकट आवलं कीं आम्ही डोंगऱ्या देवा करायचे," असें आमच्या वाटाड्यानें सांगितलें.

तलाठी म्हणाले, " ह्या चालीचा उगम कसा झाला असेल असं तुम्हांला वाटतं, साहेब ? "

" आपला तर बोवा कांहीं तर्क चालत नाहीं. तुम्हीच सांगा तुम्हांला काय वाटतं तें ! "

" मला वाटतं, पूर्वी ह्या गुहांतून भिल्लांच्या टोळ्यांच्या सभा भरून आज कुणाला लुटायचं याचा ते विचार करीत असतील. त्यांचे खजिनेहि या गुहांत दडवून ठेवलेले असतील. आतां ' काप गेले नि भोकं राहिलीं ' या न्यायानं सभा गेल्या, लूट नाहींशी झाली, खजिने गेले, पण गुहा झाडून दिवाबत्ती करून एकत्र जमण करणं तेवढं उरलं आहे. "

तलाठीदादांची ही उपपत्ति मला सयुक्तिक वाटली. भिल्लांच्या उपासनेची पद्धतसुद्धां निर्गुणाचें ध्यान करणारांच्या उपासनेसारखीच भासली. खरोखर हा डोंगऱ्या देवा सुधारलेल्या समाजानें देखील अनुकरण करण्याजोगा आहे.

ठरल्याप्रमाणें सूर्यास्ताच्या आंत आम्ही साल्हेरवाडीला परत आलों. आणखी एक दिवस राहून आम्ही माघारे फिरलों. परत निघतांना महादू भिल्लाला मीं विचारलें, " तू येतोस कां रे आमच्याबरोबर बडोद्याला ? "

महादू हांसला, पण कांहीं बोलला नाहीं. महालकरी म्हणाले, " या भिल्ल लोकांना शहर काय पण कसब्याचं गांव देखील मानवत नाहीं. एकाद वेळीं हे बाजार करायला एकाद्या गांवीं गेले तरी रात्रीं गांवांत मुक्काम करायचे नाहींत. रात्रीं जंगलांत परत यायचेच. ह्या महादूचा बाप तुकाराम यानं युवराज प्रतापसिंहांना खांद्यावर घेऊन गडावर नेलं होतं. युवराज परत निघाले बडोद्याला जायला तेव्हां त्यांनीं तुकारामाला बरोबर न्यायचं ठरवलं. तुकाराम मनांतून नव्हताच कबूल बरोबर जायला, पण युवराजांना नाहीं कसं म्हणायचं ! स्वारीबरोबर तो निघाला तेव्हां हा महादू छोटा सहा वर्षांचा होता. त्यानं अन् त्याच्या आईनं इतका आकांत सुरू केला कीं, युवराजांनीं तुकारामाला बरोबर न्यायचा बेत रहित केला. "

परत येतांना आम्हीं मुल्हेरीस उद्धवस्वामींचें सुंदर समाधिमंदीर पाहिलें. साधारणपणें मुसलमानी बादशाही थडग्याच्या भोंवतीं जशी संगमरवरी जाळी

असते तशी स्वामीच्या समाधीभोंवतीं दिसली. ह्या मंदिराइतकीं थाटबाज मंदिरें महाराष्ट्रांत थोडींच सांपडतील. संगमरवराचा मुबलक उपयोग मंदिराच्या रचनेंत झाला आहे. सभोंवतीं फार मोठ्या पडशाळा आहेत, व स्वच्छ पाण्याची मोठी विहीर आवारांत आहे. ह्या उद्धवांची माहिती ज्ञानकोशांत खालीलप्रमाणें मिळतेः—

"सत्कथासार हा एक ग्रंथ प्रसिद्ध आहे त्यावरून याची व याचे गुरु काशीराज यांची जी माहिती मिळते ती अशीः—लक्ष्मणपत्नी भागीरथी व पुत्र शिवबा ( उद्धव ) हे रामानुजसंप्रदायी श्रीकृष्ण-उपासक मुल्हेर ( नाशिक ) येथें होते. काल सुमारें १५०० ते १६००."

# दक्षिण दर्शन : : : : ८

( १ )

इंडियन हिस्टॉरिकल रेकॉर्ड कमिशन नांवाची छोटेखानी साम्राज्याश्रित परिषद हिंदुस्थानांत वेगवेगळाल्या ठिकाणीं दरवर्षी भरते. बडोदें सरकारचा प्रतिनिधि या नात्यानें मी त्या परिषदेस जात असतों. १९४२ ची परिषद ढाका येथें भरणार होती. कलकत्त्याच्या पलीकडे अद्याप मी गेलों नसल्यानें हें दूरचें ठिकाण पाहावयास मिळण्याच्या आशेनें मी जिभल्या चाटीत होतों; पूर्वी एकदां ढाक्याला भरूं घातलेली बैठक हिंदु-मुसलमानांच्या तंट्या-मुळें रहित केली होती, व आतां निपोनी विमानांच्या माऱ्याच्या टापूंत हें शहर येण्याचा संभव असल्यानें परिषदेच्या चिटणिसांनीं ढाक्याची योजना रद्द केली. मला फारच निराशा वाटली.

थोड्याच दिवसांनीं परिषदेचा तळ त्रावणकोर संस्थानची राजधानी त्रिवेंद्रम् येथें हालविल्याचें लिहून येतांच माझी निराशा.दूर झाली. हातांतला सँदेश हिसकावून घेऊन इडली-डोसा हातावर ठेविल्यासारखें मला वाटलें. म्हैसूरच्या दक्षिणेस अद्याप मी गेलों नसल्यानें हा बदल मला निराशाजनक वाटला नाहीं. त्रिवेंद्रम् हें बडोद्यापासून ७६० कोसांवर आहे, व इतका लांबचा रूळ-वाटेचा प्रवास अद्याप करायला मिळाला नसल्यानें ही संधि मला बहुमोल वाटली.

दक्षिण हिंदुस्थानच्या प्रवासाचीं वर्णनें अनेक लोकांनीं लिहिलीं आहेत; परंतु त्यांनीं न लिहिलेल्या अशा गोष्टी पुष्कळ शिल्लक आहेत. त्या आणि माझे वैयक्तिक अनुभव सांगण्याचें मीं योजिलें आहे.

या परिषदेला जोडून भरणाऱ्या ऐतिहासिक कागदपत्रांच्या प्रदर्शनांत ठेवण्यास मीं कांहीं वस्तू नेण्याची मंजुरी मिळविली आणि त्यांची काळजी घेण्यास माझे मदतनीस रा. केळकर नांवाच्या तरुण गृहस्थांस बरोबर घेतलें. बडोद्यापासून मुंबईपर्यंतचा प्रवास म्हणजे आंगणापासून ओसरीपर्यंत जाण्यासारखेंच वाटतें. आमच्या खऱ्या प्रवासाला मुंबईपासून प्रारंभ झाला.

सकाळीं मुंबईस पोंचतांच दुपारीं निघणाऱ्या मद्रास एक्सप्रेसमध्यें जागा राखून ठेवण्यास बोरीबंदरवर आम्ही गेलों. जागा राखण्याच्या कचेरींत युरोपियन आणि युरोपियन पद्धतीचा पोषाख केलेल्या साहेब लोकांची ही गर्दी झाली होती. परंतु जागा राखणारे अधिकारी माझ्यासारखेच तात्या असल्यानें मातृभाषेच्या द्वारा माझी दाद फार लवकर लागून जागा चटकन् मिळाली. उलट इंग्रजींत टुरटुर करणारांना दुपारच्या गाडीचा कार्यक्रम बदलून रात्रीच्या मेलनें निघण्याची पाळी आली. माझ्या लहानपणीं रेल्वे अधिकाऱ्यांवर छाप पाडण्यासाठीं इंग्रजींत बोलावें लागे असें मला पक्के आठवतें. आतां त्याच्या उलट कोठल्याहि प्रांतीं रेल्वे अधिकाऱ्यांशीं मराठी, हिंदी किंवा गुजराथी बोलल्यानें काम लवकर आणि ममत्वानें उरकतें असा मला अनुभव येऊं लागला आहे. रेल्वे खात्याचें हिंदीकरण म्हणतात तें हेंच! आग्राफोर्ट स्टेशनवर मी बडोद्याचें तिकीट मागतांना तिकीट मास्तर गुजराथी असावे या शंकेनें तिकिटाची मागणी गुजराथींत केली. तिकीट देतांना मास्तर शुद्ध मराठींत मला म्हणाले, "बारा आणे सुटे आपल्याजवळ आहेत काय?"

मद्रास एक्सप्रेसमध्यें माझ्या खणांत दोन ख्रिस्ती सहप्रवासी मिळाले होते. एक रा. बेली नांवाचे उतारवयाचे मंगलोरी लष्करी सेवानिवृत्त डॉक्टर आणि दुसरे रा. मॅकनिकल नांवाचे चाळिशीच्या आंतले मध्यप्रांतस्थ तारखात्याचे अधिकारी होते. रा. बेली ह्यांनीं खाकी युनिफॉर्म चढवून त्यावर इंद्रधनुष्याच्या रंगाची पट्टी छातीवर लटकावून दिली होती. आमच्या खणांत घुसूं पाहणाऱ्या टॉम्यांना त्या पट्टीच्या जोरावर ते चांगलेच गुरकावीत असत. आमच्या आग-

गाडीस पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे एकंदर आठ डबे असून ते सर्व ताम्रमुख लष्करी अधिकाऱ्यांनीं गच्च भरले होते. आमच्यासारखे बिनलष्करी लोक फारच थोडे होते. आमच्या खणांतील शिल्लक असलेल्या एका जागेवर टॉम्यांचा फार डोळा होता. पण रा. बेलींनीं कोणाचीहि डाळ शिजूं दिली नाहीं. हे गृहस्थ गप्पा मारण्यांत फार पटाईत आणि अक्षरशः त्रिखंड हिंडलेले होते. ते सांगूं लागले, "आम्हीं सुंदर बनांत मुक्काम ठेविला होता. तेथें नदींत असंख्य मगरी आहेत. एकदां मी नदींतून नावेनें दुसरीकडे जात होतों. एका मगरीनं शेपटीच्या तडाक्यानं आमची नांव उलथवली. गृहस्थांनो! मग मी कसा सुटलों असं तुम्हांला वाटतं?

रा. मॅकनिकॉल म्हणाले, "मला तर कल्पना करतां येत नाहीं!"

"मला वाटतं तुम्हांला एकाद्या मगरीनं मटकावून टाकलं असलं पाहिजे," मीं तर्क केला.

"गृहस्थांनो, मगरी नदीच्या पात्रांत इतक्या दाटीनं उभ्या होत्या कीं, आम्हीं त्यांच्या पाठीवरून चालत तीरावर जाऊन पोहोंचलों. तिथें इतक्या असंख्य मगरी आहेत कीं, परदेशांतून चामडयाचे कारखानदार शेंकडों मगरी मारून त्यांचं चामडं क्रॉकोडाइल लेदर बॅग्ज करण्याकरितां विलायतेला घेऊन जातात."

रा. बेली असे अनेक देशांच्या प्रवासाच्या गप्पांत रंगून जात होते. "आम्हीं एकदां इराणच्या प्रखर उन्हांत वाळवंटांतून प्रवास करीत होतों. एका स्टेशनावर आम्हीं उतरलों. गाडी निघून गेली. स्टेशनमास्तरच्या बिऱ्हाडांत गोषा. शेवटीं तारायंत्राच्या खांबाच्या सावलींत आम्ही उभे राहून सबंध दिवस कसा कंठला त्याची कल्पना तुम्हांला यायची नाहीं." अशा प्रकारें रा. बेली यांच्या गप्पा ऐकतां ऐकतां संध्याकाळ झाली. तेव्हां त्यांनीं मजजवळच्या फिरकीच्या तांब्याची स्तुति करीत खिशांतून रमची चपटी बाटली काढिली आणि तींत माझ्या तांब्यांतलें पाणी मिसळून तिचे घोट घेण्यास प्रारंभ केला. पुनः त्यांचें तोंड चालू झालें. "तुम्हांला बिना जंक्शनचा जमनालाल माहीत आहे का? त्या बेट्याचा जांवई लग्नांत रुसला आणखी 'तीन

हजारांची मोटार मिळाल्याशिवाय घोड्यावर चढणार नाहीं, ' असा हट्ट धरून बसला. भिकारडा ! डी. टी. एम्. पॅटरसन लग्नाला आला होता, त्यानं तें ऐकलं तेव्हां तो म्हणाला, ' जमनालाल, असल्या भिकाऱ्याला मुलगी देण्यापेक्षां मलाच कां नाहीं देऊन टाकीत ? मी घोड्यावरच काय पण गाढवावर बसून देखील तुझ्या घरीं यायला तयार आहें. ' " तेव्हां आम्ही सगळे हसूं लागलों, पण जमनालाल हा विनोद मुळींच समजला नाहीं. त्यानं शाकाहारी माणसासारखं आंबट तोंड केलं."

" आमच्या हिंदुसमाजाच्या दृष्टीनं ही थट्टा फारच अमंगळ आहे म्हणून जमनालालनं आंबट तोंड केलं असलं पाहिजे " असें मीं रा. बेलीस समजाविलें.

दौंडच्या स्टेशनावर एका काळ्या वर्णाच्या पाद्र्यानें जागेची याचना करतांच आम्हीं रिकामी असलेली चवथी जागा त्याला दिली, न जाणों एखादा टॉमी ती पटकावून रात्रभर ढोशीत आणि ओकत पडावयाचा ! कुर्डुवाडी येण्याच्या आंत आम्हांला झोपा लागल्या आणि पुन्हां जागे झालों तेव्हां गाडी निजाम राज्यांतून मार्ग क्रमीत होती. गुंटकळ हें मद्रास इलाख्यांतील पहिलें मोठें स्टेशन आहे. तेथें रा. बेलींनीं आमचा निरोप घेतला.

मद्रास इलाख्यांतील तैलंगण प्रांतांतला भूप्रदेश वेगळ्या पकारचा दिसत होता. जमीन मराठी प्रांतांतल्या सारखीच खडकाळ पण कोसाकोसावर पाणी वाहत असलेली नदी किंवा कालवा ओलांडून गाडी जात होती. केळीं, संत्रीं, मोसंबीं आणि विड्याचीं पानें यांचे मळे एकामागून एक लागत होते. एका टेकडीवरील गुत्तीचा किल्ला, वर जाण्याच्या नागमोडी वाटेसह, जवळजवळ सगळा डब्यांतून दिसत होता. मुरारराव घोरपडे त्याच्यावर किल्लेदार होता असें कोठें तरी वाचलें होतें. कड्डाप्पा स्टेशन लागलें तेव्हां बडोद्यास आमच्या दारावरून ' कड्डाप्पा पान, बे आनाने सो ' असें ओरडत जाणाऱ्या पानवाल्याची आठवण झाली. सगळा फलाटा पानांच्या करंड्यांनीं झांकला गेला होता त्या स्टेशनचा. पाहूं या तरी कड्डाप्प्याचा विडा ! असें वाटून तेथें एक पैशाचा विडा मीं विकत घेतला. त्यांत आठ पानें होतीं !

दुपारीं एका स्टेशनावर भाताचे पुडे विकावयास आले. कागदाच्या पाकिटांत केळीच्या पानांचे पुडे ठेविलेले होते आणि त्यांत दोन प्रकारचा भात कालवून ठेविलेला होता. एक सांबारभात आणि दुसरा दहीभात. इंग्रजींत त्या पाकिटांवर सांबारभाथ आणि कर्डभाथ अशीं गांवें लिहिलेलीं होतीं. भाताबरोबर लोणचें ! मिरचीहि होती. तीन आण्यांचीं दोन पाकिटें घेऊन मीं दुपारचें जेवण केलें. चिवडा, भजीं, पुऱ्या असले वेडेवांकडे जिन्नस घेऊन पोट बिघडविण्यापेक्षां हे भातमूचे पुडे फार छान. आपल्याकडे त्यांचा प्रवेश झाला पाहिजे युद्धोत्तरकाळांत तरी.

भात हा शब्द दक्षिणेंत भाथ असा लिहितात, तसेंच पंजाबकडील लोक महाप्राणयुक्त व्यंजनाचा उच्चार महाप्राणविरहित करीत असल्यानें कधीं कधीं घोटाळा उत्पन्न होतो. एका स्नानगृहावर बाथरूम अशी इंग्रजी पाटी होती. एक पंजाबी आणि दुसरा मद्रासी असे दोन अर्धशिक्षित शिपाई बाजूनें चालले असतां पाटीकडे पाहून मद्राशानें विचारिलें, " ये क्या है ? बी ये टी हेच आर्र डबलो येम ! "

पंजाबी म्हणाला, " यह बातरूम है. बातचित करनेकी जगा है. "

मद्रासी म्हणाला, " नही स्वामी, ये भाथ रूम है. भाथ पकानेकी जगा है. "

संध्याकाळीं साडेसात वाजतां आम्ही मद्रास सेंट्रल स्टेशनवर पोहोंचलों. हें स्टेशन बोरीबंदरप्रमाणें मार्गान्त ( टर्मिनस् ) पद्धतीचें पण बरेंच लहान आहे. त्याला फक्त चारच फलाटे आहेत. मद्रास शहर शत्रूचे माऱ्यांतलें असल्यानें तेथें जबरदस्त दिवेबंदी होती. स्टेशनवर देखील अतिशय अंधार आणि बॉम्बविरोधी भिंताडें यांतून चांचपडत वाट काढीत बाहेर यावें लागलें. तिसऱ्या वर्गांत बसलेले रा. केळकर मधून मधून माझा समाचार घेत होतेच. ते आतां पुनः मला येऊन मिळाले.

मद्रास इतकें मोठें शहर असून तेथील वाहनें आपल्या इकडच्या तालुक्याच्या गांवांत देखील न शोभण्यासारखीं आहेत. घोड्याचे लोखंडी धावांचे झटके पुण्याच्या बैल-छकड्यांसारखे दिसतात. दुसरें वाहन म्हणजे रिक्षा–

सायकल-रिक्षा नव्हे तर माणसानें ओढीत नेण्याची गाडी. रिक्षेंत एकच माणूस बसावयाचा कायदा मद्रासला आहे. ट्रामवे कंपनीच्या विनंतीवरून हा कायदा केला असें म्हणतात.

आम्ही दोघे दोन रिक्षांतून एगमोर ट्रॅम तबेल्याजवळील महाराष्ट्र-भुवनांत जाण्यास निघालों. भुवन हें सेंट्रलपासून पाऊण कोस अंतरावर आहे. आम्ही भुवनांत पोंचतांच तिसऱ्या रिक्षेंत आमची विसरून राहिलेली ट्रंक घेऊन एक रिक्षावाला प्राप्त झाला. ही ट्रंक सरकारी सामानाची असल्यानें गहाळ झाली असती तर आमच्यावर चांगलीच आपत्ति ओढवली असती. ह्या तिसऱ्या रिक्षावाल्यानें ती वेळेवर आणली नसती तर सबंध रात्र आम्हांला धांवाधांवींत काढावी लागली असती.

मद्रासच्या महाराष्ट्र-भुवनाची इमारत महाराष्ट्रीयांच्या वसतिगृहांत कलकत्त्याच्या खालोखाल येईल. ही जागा विस्तीर्ण आवारांत स्वच्छ आणि ऐसपैस रीतीनें वसलेली आहे. तिला माडी नाहीं परंतु एक मोठें दालन, सात-आठ खोल्या आणि एक पडळ इतका तिचा विस्तार आहे. आम्हीं अगोदर कळविलें असल्यानें आमच्याकरितां एक खोली राखून ठेवलेली होती. वसतिगृहांत त्या वेळीं मुक्काम करणारे सगळे मराठी लोक लष्करीखात्यांत नोकर होते. युद्धपरिस्थितीमुळें प्रवासी किंवा यात्रेकरू मुळींच नव्हते. भुवनाचे पगारी व्यवस्थापक रा. गद्रे नांवाचे गृहस्थ तेथें सहकुटुंब पडळींत राहतात. स्नान-भोजनादिकांची व्यवस्था ते उत्तम प्रकारें करतात. राहण्याजेवण्याचे आकार मुंबईच्या सरदारगृहाइतके पडतात. रा. गद्रे यांनीं आम्हांला पुढील प्रवासाचीं तिकिटें काढून देऊन जागा राखण्याचें देखील काम केलें. ही उत्कृष्ट सोय मद्रासेंत असल्यानें तें शहर परकें आहे असें कोणाला वाटावयास नको.

मद्रासला प्रेक्षणीय स्थळें फार नाहींत. हिंदुस्थानांत अद्वितीय असें जलजसंग्रहालय तेथें होतें, पण विमानी हल्ल्याच्या भयानें तें नुकतेंच काढून टाकण्यांत आल्याचें कळून निराशा वाटली. दुसरीं दोनच ठिकाणें तेथें पाहण्यासारखीं वाटलीं. एक तेथील विस्तृत समुद्रकांठ व दुसरें अडयार. ह्यांपैकीं पहिल्या स्थळाला स्थानिक लोक 'बीच' म्हणतात. वेळेच्या अभावास्तव समुद्र-

कांठ मीं कल्पनेनेंच पाहिला व तो वास्तविक स्थळापेक्षां अधिक रमणीय असला पाहिजे अशी माझी खात्री आहे. अड्यारचा ऐकून परिचय लहानपणीं मला झाला होता. "अड्यार फोडया, काय काय फोडघा, तुमच्या बैलानं आमचं शेत खाल्लं," अशा प्रकारचा खेळ घरांतील मुली खेळत असत, असें आठवतें. अड्यार येथें जाण्याला ट्राम, बस, आणि रिक्षा या तिन्ही वाहनांचा उपयोग करावा लागतो. मद्रासला मुंबईच्या अगोदरपासून विजेच्या ट्रामगाड्या सुरू झाल्या असल्या तरी त्या मुंबईच्या गाड्यांपेक्षां अगदींच दरिद्री वाटतात. दुमजली गाड्या मुळींच नाहींत. गाड्यांची रुंदी लहान असल्यानें त्यांतील बाकें आडवीं नसून रुळांशीं समांतर असतात. ट्रामचे कंडक्टर बहुधा तरणेबांड मॅट्रिक आणि ड्रायव्हर बिन शिकलेले वाटतात. ड्रायव्हरांच्यापैकीं बऱ्याच जणांचे बुचडे टोपीखालीं लोंबत असतात. तर कंडक्टर क्रॉप राखलेले असतात. दोघांचेही पाय अनवाणी असतात. मीं एका ड्रायव्हरला विचारिलें, "मिस्टर, कंपनी नो गिव्ह यू बूटस्?" ड्रायव्हर हंसून म्हणाला, "कंपनी गिव्ह युनिफॉर्म बट नो गिव्ह बूटस्."

गाडी चालू करण्याच्या सूचना कंडक्टर ओरडून देतो. ओरडण्याचे शब्द वेगवेगळे आहेत. कोणी 'राइट' म्हणतो, कोणी 'कॅरी ऑन' म्हणतो. कोणी 'लेट गो' म्हणतो, तर एखादा 'बकअप' अशी सुद्धां सूचना देतो. माउंटरोडवरून आम्ही मैलापुरास गेलों. मैलापुरांत साधारणपणें उच्चवर्णीय हिंदूंनीं घरें आहेत. मैलापुराहून अड्यारपर्यंतचा मार्ग रिक्षांनीं आक्रमावा लागतो. मार्गावर पुष्कळ बागा, खाड्यांचे पूल व बंगले आहेत. त्यांची शोभा पाहत आम्ही अड्यारला पोंचलों.

अड्यार हें थिऑसॉफिकल सोसायटीचें मुख्य स्थान आहे. ब्लॅव्हॅटस्की बाईला ज्या वटवृक्षाखालीं साक्षात्कार झाला तो या बागेंत आहे. या वृक्षाच्या मोठ्या आकाराची कीर्ति मी फार दिवसांपासून ऐकत होतों; दुर्दैवानें ज्या ज्या वृक्षांच्या मोठेपणाची बडेजाव मीं ऐकिली होती ते ते प्रत्यक्ष पाहतांच प्रत्येक वेळीं निराशाच पदरीं पडली. कलकत्त्याच्या बोटॅनिकल बागेंतील वड, भडोचचा कबीरवड, आणि बुद्धगयेचा बोधीवृक्ष हीं झाडें आमच्या शनिवारच्या मारुतीजवळच्या वटाहून मोठीं वाटलीं नाहींत. प्रयागच्या अक्षयवटाच्या दर्श-

नानें तर आमची कंबरच खचली. 'प्रयागला झाड अन् त्याचीं मुळें काशीपर्यंत पोंचलीं आहेत' असें आम्ही ऐकत होतों. आणि प्रत्यक्ष पाहिलें तों पांचसहा मण वजनाचा वठून गेलेला ओंडका मात्र दृष्टीस पडला.

श्रद्धावंत लोकांच्या दिव्य दृष्टीला मात्र तो वृक्ष मोठा दिसत असेल यांत शंका नाहीं. अडयारचें उद्यान विस्तीर्ण आहे व त्यांत जागोजाग बंगले आहेत. एक सर्व धर्मांचें प्रार्थनामंदिरहि आहे. पण युद्धकार्यार्थ त्यांतील सभामंडपांत वाळूचीं पोतीं भरून ठेविलेलीं दिसलीं. या मंदिराच्या भिंतींवर वेगळाल्या धर्मांच्या संस्थापकांचीं चित्रें आणि वचनें चितारलेलीं आहेत. अडयार हें अश्रद्ध अंतःकरणानें पाहण्याचें स्थळ नव्हे, इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे.

दुसऱ्या दिवशीं नाताळ असल्यामुळें ट्रामवेनें सहा आणे दराचीं 'हवें तितकें फिरा' तिकिटें काढिलीं होतीं. आम्हीं तसलीं तिकिटें घेऊन सर्व शहर-भर मनमुराद फिरलों. मद्रास शहरचा विस्तार मुंबईच्या विस्तारापेक्षां अधिक आहे. मात्र त्यांची उंची मुंबईच्या निम्मी देखील नाहीं. तीन मजल्यांपेक्षां जास्त मजल्यांची इमारत तेथें क्वचितच दिसली. रिक्षावाले, हमाल, बारीक-सारीक फेरीवाले या सर्वांस मोडकेंतोडकें इंग्रजी येत असल्यानें भाषेची अड-चण तेथें भासत नाहीं. हिंदी देखील लोकांस थोडेंबहुत समजतें. मेवामिठाई औषधाला देखील मिळत नाहीं. हलवायाचें दुकान आमच्या मुळींच नजरेस पडलें नाहीं. चिवडा देखील दुर्मिळच. मोठा मेवा म्हणजे भुईमुगाच्या भाज-लेल्या शेंगा आणि केळीं.

हिंदुस्थानांत मुंबईखेरीज मद्रास या एकाच ठिकाणीं विजेची रूळ गाडी चालू आहे. ही साउथ इंडियन (उच्चार सौथिनंडियन्) रेल्वेच्या मीटर रुंदीच्या रस्त्यावर एकवीस मैल वाटेवर आहे. हिच्या गाडया रुंदीनें आणि लांबीनें कमी वाटतात. तीनतीन डबे असलेली गाडी, पांच–सात मिनिटांच्या फरकानें मद्रास बीच स्टेशनवरून सुटत.

तारीख २५ डिसेंबरच्या सायंकाळीं एगमोर स्टेशनवरून सुरू होणाऱ्या त्रिवेंद्रम् एक्सप्रेसनें त्रिवेंद्रम्‌ला जाण्यास निघालों. माझ्या खगांत प्रो. दतो

वामन पोतदार यांच्याकरितां एक जागा राखून ठेविलेली असल्यानें त्यांच्या सहवासाच्या आशेनें मला फार आनंद झाला. आणखी एक सहप्रवासी, रा. रा. सुब्रह्मण्य अय्यर आणि चौथे दिल्लीचे गंगादास नांवाचे नोकरीच्या पेशानें त्रिवेंद्रमलाच जाणारे गृहस्थ होते. असे चौघेजण रात्रभर आम्ही एका खणांत होतों. रा. अय्यर हे कंत्राटदार असूनहि "सर, तुम्ही परिषदेंत निबंध वाचणार आहां काय ?" अशा तऱ्हेचे बौद्धिक प्रश्न विचारीत होते. सकाळीं मधुरा ( हिला चुकीनें मराठी लोक मदुरा म्हणतात. ) स्टेशनवर गाडी पोंचतांच आम्हांला रात्रभर मिळालेल्या भरपूर जागेचें सौख्य संपुष्टांत आलें. कमिशनला जाण्याकरितां अगोदर निघालेले पण मधुरा पाहण्यास प्रवासभंग केलेले अनेक प्रतिनिधी डब्यांत घुसले आणि आमच्या दोन बाकांच्या खणांत बारा माणसें दडपलीं गेलीं.

सकाळची वेळ असल्यानें दत्तोपंतांनीं व मीं देशी पद्धतीची छोटी हजेरी घेतली. इडलीची एकेक मूद, एकेक डोसा आणि झारीभर कॉफी असें साहित्य एका तबकांत आलें. दोन लहान वाट्यांत एक द्रव पदार्थ होता. दत्तोपंतांचें म्हणणें तें तूप आहे आणि माझें म्हणणें तें तेल आहे असें होतें. तेल असो की तूप असो, तें इडलीवर ओतून घेऊन धुपाटणीं परत तबकांत ठेविलीं. प्रत्येकीं साडेचार आणे दरांत ही छोटा हजेरी आम्हांला किफायतशीर वाटली.

छोटा हजेरी ह्यांतील "छोटा" हें लिंगविपर्यासाचें उदाहरण दत्तोपंतांस मी दाखविलें. "छोटी" असें ह्या विशेषणाचें रूप पाहिजे होतें. दत्तोपंत म्हणाले, "हें रेल्वे हिंदी आहे. जसं रेल्वेचं वेगळं इंग्लिश असतं तसं तिचं वेगळं हिंदीहि असतं."

मलाहि एका प्रसंगाची आठवण झाली. बडनेरच्या स्टेशनवर मी गाडीची वाट पाहत असतां एक आंग्लो-हिंदी तिकीट कलेक्टर ओरडला, "बाजू हटो, गाडी आता है."

मी त्याला त्याची चूक दाखवीत म्हणालों, "मिस्टर, यू मस्ट से गाडी आती है."

तो गृहस्थ सव्वा शेर होता. आपली चूक सावरीत त्यानें सांगितलें, " वेल् जेंटलमन्, इट्स ए मेल ट्रेन ! "

मेल ( एम् ए आय एल् आणि एम् ए एल ई ) शब्दावरील त्याची कोटि मला फार आवडली.

डब्यांत चढलेल्या मंडळींत कमिशनचे पंजाबचे हिंदु असलेले प्रतिनिधि आपल्या आंग्ल पत्नीसह आणि एम्. ए. च्या परीक्षेस बसलेल्या आर्यांग्ल मुलीसह आले होते. ह्यांना आपण लाला म्हणूं या. केवळ विशिष्ट पदाधिष्ठित असल्यानें ह्या परिषदेला जाण्याचा मोका मिळालेले दिल्लीवाले जमनादास आणि कलकत्त्याचे गंगादास असे दोन औत्तरात्य होते. हैद्राबादचे एक नवाबजादे ' पहिल्या वर्गांत जागा नसल्यामुळेंच आपण दुसऱ्या वर्गावर आपल्या बैठकीचा अनुग्रह करीत आहों ' असें वारंवार आम्हांला बजावीत ट्रंकेवर विराजमान झाले होते. एवढ्या जाडजूड मंडळींत एक मल्याळी विद्यार्थी हळूच शिरून एक जागा पटकावून बसला होता. मथुरेच्या स्टेशनवर मी ताजें दैनिक विकत घेतलें ( हा माझ्या आयुष्यांतला दैनिक विकत घेण्याचा एकच प्रसंग घडला. बाकी मी शेजारच्या उतारूकडून दैनिकें मागून घेऊन वाचीत असतों.) व त्यांत फ्रेंच सेनापति डार्लां याच्या वधाची बातमी वाचली. ही खुसखुशीत बातमी मीं गंगादासना उत्सुकतेनें सांगितली.

गंगादासनीं निर्विकार चेहऱ्यानें मला विचारिलें, " हू वॉझ डार्लां ? "

ऐतिहासिक परिषदेला जाणाऱ्या ह्या विद्वानाचें अगाध ज्ञान पाहून मी सर्द झालों. जमनादास कांहीं कमी विद्वान् नव्हते. अरविंद घोष ह्यांच्याविषयीं गप्पा निघाल्या असतां सुब्रह्मण्य ऐयर यांनीं पुढील आख्यायिका सांगितली, " घोष बाबूंना एकदांच सभेंत बोलण्याचा प्रसंग आला होता-लोकांनीं त्यांना बोलायचा आग्रह केला तेव्हां ते उठून म्हणाले, सभ्य गृहस्थहो, माझें सामर्थ्य जिभेंत नसून लेखणींत आहे. "

लालाजींच्या आंग्लपत्नीसमोर आपलें पांडित्य दर्शविण्याची ही संधि उत्तम आहे असें वाटून जमनादासनीं त्यांस अरविंद बाबूंच्या ह्या गहन भाषणाचा अर्थ समजावून सांगितला. "मॅडम ! याचा अर्थ असा कीं, मला चांगलें

बोलतां येत नाहीं पण चांगलं लिहितां येतं." सर्व जग आपल्यासारखेंच मंदबुद्धि आहे असें त्यांना वाटत असावें.

गाडी चालू असतांना लालाजींच्या कन्येनें नाताळचा मोठा थोरला केक पेटींतून काढिला; परंतु त्यांच्या सामानांत सुरी सांपडेना. मजजवळ सुरी होती. तिचा उपयोग त्यांस करूं दिला तर केकच्या एखाद्या तुकड्यावर हक्क सांगतां येईल, अशा लालचीनें मी माझ्या पेटींतून सुरी काढूं लागलों, तोंच विजेच्या पंख्याचा फटकारा माझ्या डोक्याला लागला. दत्तोपंत म्हणाले, "रेल्वे मिटरगेज आणि जोशीबुवा पडले ब्रॉडगेज त्यामुळें हा अपघात झाला." मागें एकदां दत्तोपंतांवर गोष्ट लिहून त्यांची कुरापत मीं काढिली होती तिचें प्रायश्चित्त त्यांनीं मला स्त्रीमिश्रित समाजांत दिलें.

या बाजूला संत्रीं-मुसंबीं रगड मिळत होतीं. पंचवीस संत्रीं भरलेली बुड्डी टोपली एक रुपयाला रा. ऐयर यांनीं घेतली. मल्याळी विद्यार्थ्यानेंहि तशीच एक टोपली घेतली. दोघांच्या टोपल्या बाकाखालीं शेजारीं शेजारीं ठेविल्या गेल्या. रा. ऐयर ह्यांना औदार्याचा ऊत आला होता. विद्यार्थ्याच्या टोपलीला स्वतःची टोपली समजून तिच्यांतलीं संत्रीं ते सर्वांना आग्रह करकरून वांटीत होते आणि विद्यार्थी बिचारा हताश होऊन आपल्या नष्ट होणारा जिनगीकडे पाहत राहिला होता. इतके परप्रांतस्थ जाडजूड विद्वान् आणि त्यांत दोन गौरकाय महिला असा सुसंस्कृत समाज भोंवतालीं असल्यानें ऐयरांशीं भांडण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं. इतकेंच नव्हे, तर ऐयरांच्या लक्षांत आपली चूक आल्यावर तिची भरपाईहि त्यानें त्यांस करूं दिली नाहीं.

दुपारच्या वेळीं मलई नांवाचा घाट सुरू झाला. अय्यर ह्यांनीं त्याचें नांव 'ईस्टर्न घाट' असें सांगितलें. सह्याद्रि पर्वताप्रमाणेंच हा मलई अथवा मलय पर्वत समुद्राच्या किनाऱ्यापासून वीस कोस अंतरावर दक्षिणोत्तर पसरला आहे. ह्या घाटांत चारच छोटे बोगदे लागले. आमच्या बोरघाटापेक्षां किंवा तिनई घाटापेक्षां हा भव्यतेंत उणा पण सौंदर्यांत वरचढ आहे. खळखळ वाहणाऱ्या पाण्याचे प्रवाह डिसेंबर महिन्यांतहि येथें अगणित होते. बोरघाटांतील वृक्ष-हीन खडकाऐवजीं येथील भूमिभाग केळीं, बांबू, नारळ व पोफळी यांच्या

बागांनीं बहरून गेलेला दिसला. जवळच्या कित्येक उंच डोंगरांकडे बोट दाखवून रा. अय्यर सांगत, "ह्या पहा कार्डामम् हिल्स्. ह्यांच्यावर वेलदोडयाच्या बागा आहेत." तिकडे पाहावें तर दुसरीकडे बोट करून ते म्हणत, "ही पाहा चुर्नाकुलम इस्टेट. हिच्यांत कॉफी अन् चहा भरपूर होतो." अशा प्रकारें घाटाची शोभा पाहत असतां घाट संपला आणि थोडक्याच अंतरावर क्वायलान हें मोठें स्टेशन लागलें. क्वायलानपासून त्रिवेंद्रमूपर्यंतचें वीस कोस अंतर आगगाडी, मोटार किंवा आगबोट ह्या तिन्ही साधनांनीं तोडतां येतें.

आतां अगदीं नवीन प्रांतांत आणि घरापासून दूर आल्यासारखें वाटूं लागलें. आम्हांला समजणाऱ्या एकाहि देशी भाषेचें ज्ञान ह्या प्रांतांत लोकांना नव्हतें. इंग्रजी मात्र बऱ्याच जणांना येत होतें आणि मनांतील भाव समजावून देण्यापुरतें तें होतें. एका मनुष्यानें मला प्रश्न केला, "हाऊ मेनी टाइम्स ?" ह्याचा अर्थ मला समजला नाहीं, तेव्हां माझ्या इंग्रजी ज्ञानाची कींव करीत त्यानें माझ्या घडयाळाकडे बोट केलें. तेव्हां मला अर्थ समजला व मीं उत्तर दिलें, "फोर अँड हाफ". पोशाख अगदीं वेगळ्या प्रकारचा, बायकांचा पोशाख म्हणजे कंबरेभोवतीं गुंडाळलेली पांढरी चादर, खांद्यावर पदर नाहीं आणि पोट झांकण्याकरितां घेतलेलें एक पांढरें फडकें. पुरुषांच्या कंबरेभोंवतीं तशीच कच्छहीन चादर आणि अंगांत सदरे किंवा उघडीं अंगें. सर्वजण अनवाणी. कासोट्याचें वस्त्र नेसलेलें माणूस हजारांत एकसुद्धां दिसत नव्हतें. पुरुषांच्या डोक्यास टोपी, फेटा, वगैरे कोणतेंच शिरोभूषण दिसलें नाहीं. रंगीत वस्त्र अपवादच होतें. सर्वांचे पोशाख पांढरे सफेत. हिंदु, ख्रिस्ती आणि मुसलमान ह्या तिन्ही धर्मांचे अनुयायी त्रावणकोरांत असूनहि त्या सर्वांच्या पोशाखांत आणि भाषेंत एकरंगीपणा व एकरूपता आहे.

ह्याच्या उलट आमच्या महाराष्ट्रांत किती विविध प्रकारचे पोशाख असतात तें पाहण्याजोगें आहे. शिरोभूषण घातलें तर घातलें, नाहींतर नाहीं; शिरोभूषणें सतरा प्रकारचीं—कोणी उजव्या बाजूस निऱ्या खोवून धोतरें नेसतात तर कोणी डाव्या बाजूस; कोणी लहेंगे पेहेरतात, तर साठ-साठ वर्षांचे हिरवे म्हातारे अर्धी मांडी उघडी टाकणाऱ्या चड्ड्या लटकावून देतात! पायांतील पादत्राणें अशींच विविध प्रकारचीं आहेत. पोशाखावरून जात किंवा देश

ओळखतां येणें तर दुरापास्तच झालें आहे. राष्ट्रीय असा कोणताहि पोशाख नाहीं आणि त्यामुळें स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या दोघांच्याहि पोशाखांत पूर्ण बेबंदशाही माजलेली महाराष्ट्र आणि गुजराथ ह्या भागांत दिसते. बंगाल आणि मलबार ह्या दोन प्रांतांत मात्र पोशाखांत साधेपणा आणि राष्ट्रीयत्व यांचा पगडा स्पष्टपणें दिसून येतो.

भूप्रदेशहि अगदींच भिन्न स्वरूपाचा दिसूं लागला. एकमेकींना लागून असणाऱ्या केळी, नारळी आणि पोफळींच्या बागा, त्यांत विलसणाऱ्या माडाच्या झावळ्यांच्या झोपडया, थोडथोडया अंतरावर रूळवाटेखालून वाहणारे जलप्रवाह, त्यांवर तरंगणाऱ्या लहानमोठ्या होडया आणि क्षितिजाजवळील हिरवळीनें झाकलेले डोंगर असें सृष्टिवैभव-गोमांतकांत मधूनमधून एखाद्याच स्थानांत पाहावयास मिळतें, परंतु वीसवीस कोसपर्यंत एकसारखें अखंड सृष्टिवैभव आमच्याकडे दिसणें अशक्यच आहे. एखादी मोठी खाडी दिसली कीं, रा. ऐय्यर तिच्याकडे बोट दाखवून आम्हांला बॅकवॉटर असें सांगत असत.

हीं बॅकवॉटरें म्हणजे हिंदुस्थानांत इतर कोठें दिसून न येणारे सृष्टिनिर्मित आणि मनुष्ययोजित दळणवळणाचे स्वस्त आणि सोयींचे मार्ग आहेत. समुद्रकिनाऱ्याशीं समान्तर असणाऱ्या खाडया, कालव्यांनीं आणि तलावांनीं एकमेकींशीं जोडून कोचीपासून (कोचीन हा उच्चार पंजिम्, बर्सान्, कॉमोरिन्, इत्यादि उच्चारांप्रमाणें इंग्रजी स्पेलिंगमुळें अंगवळणीं पडलेला आणि चुकीचा आहे.) त्रिवेंद्रम्पर्यंत पाऊणशें कोस अंतराचा हा मार्ग आपल्या जुन्या स्थापत्यशास्त्रास निःसंशय भूषणावह आहे.

त्रावणकोर आणि बाकीचा मलबार यांत प्रचलित असणाऱ्या मातृसत्ताक पद्धतीची माहिती ह्या प्रवासांत रा. अय्यर ह्यांनीं आम्हांला दिली. ही माहिती सर्वसाधारण वाचकवर्गाच्या परिचयाची असल्यामुळें तिच्या वर्णनानें जागा अडवीत नाहीं. परंतु ह्या पद्धतींत थोडीशी सुधारणा होऊन मुलाला देखील त्याच्या बहिणींच्या इतकाच संपत्तीचा वांटा मिळूं लागला आहे अशी नवीन माहिती त्यांनीं आम्हांला दिली. उलट आमच्याकडे भावाप्रमाणेंच बहिणीला वारसा मिळावा, असें बिल कायदेमंडळापुढें

मांडण्यांत आलें आहे. ब्राह्मणजातींत मातृसत्ताक पद्धत चालत नाहीं, असेंहि त्यांनीं सांगितलें.

इकडे वस्ती इतकी दाट आहे कीं, मोकळी किंवा पडीक जमीन मुळींच दिसत नव्हती. मोकळ्या जागेवर गुडघाभर उंचीचीं रोपें लावलेली दिसत. टॅपिओका ( तवकीर ) असें त्यांचें नांव ऐय्यरनीं सांगितलें. ह्या टॅपिओकाचे कंद गोराडूसारखे दिसतात आणि ते शिजवून खाण्याचा बराच प्रघात तिकडे आहे असें समजलें. आमची आगगाडी मधूनमधून एखाद्या ट्रामसारखी घरांच्या दुतर्फा ओळींतून किंवा बाजारपेठेंतून जात होती. स्टेशनवर गाडी थांबतांच भिकाऱ्यांचा तांडाच्यातांडा येऊन उतारूंजवळ याचना करीत होता. इतक्या सुपीक प्रदेशांत भिकारी इतके विपुल कसे असा प्रश्न सारखा माझ्या मनांत येत होता.

संध्याकाळीं साडेसात वाजतां आम्ही त्रिवेंद्रम् सेंट्रल स्टेशनवर पोंचलों. हें ह्या रूळ-रस्त्याचें दक्षिण टोंक आहे. कमिशनच्या व्यवस्थापक मंडळानें आमचें स्वागत करून आमच्या उताऱ्याकडे आम्हांस रवाना केलें. सामिष भोजन करणाऱ्या लोकांची सोय मॅस्कॉट हॉटेलमध्य आणि निरामिषांची सोय पद्मविलास अतिथिगृहांत योजिलेली होती. प्रो. पोतदार, रा. केळकर आणि मी निरामिष भोजी असल्यानें इतर कित्येक प्रतिनिधींबरोबर पद्मविलासमध्यें उतरलों. सर टी. माधवराव हे त्रावणकोरचे दिवाण असतां त्यांच्याकरितां ह्या वाडा बांधवला होता. वाडा जुन्या पद्धतीचा पण फार सोईस्कर आहे. पद्मनाथस्वामीचें मंदिर येथून जवळ असल्यानें ह्याला पद्मविलास हें नांव देण्यांत आलें आहे.

रेकॉर्ड कमिशन, सायन्स कॉंग्रेस, ओरिएन्टल कॉन्फरन्स इत्यादि अखिल-भारतीय स्वरूपाच्या परिषदांच्या प्रतिनिधींचे गट त्यांच्या त्यांच्या अभ्यासाच्या विषयानुसार न पाडतां सामिष किंवा निरामिष आहाराप्रमाणें किंवा देशी-विदेशी विहाराप्रमाणें पाडण्याची चालत आलेली प्रथा आक्षेपार्ह आहे. ह्या पद्धतीमुळें सर्वसाधारण जनतेचा असा ग्रह होतो कीं, ह्या बैठकी कामाकरितां नसून खाण्यापिण्याकरितां सुरू केलेल्या आहेत. सामिष आणि निरा-

मिष ह्यांच्या पंगती वेगळ्या ठेविल्या तरी हरकत नाहीं, पण त्यांचें राहणें वेगळाल्या गोटांत कशाला पाहिजे? आधींच सहस्रावधि भेद असलेल्या समाजांत हा एक नवीन भेद पाडण्याचें कारण मला समजत नाहीं.

पोंचल्याच्या दुसऱ्या दिवशीं पहांटे मला दत्तोपंत हांक मारून जागे करीत होते. डोळे उघडून पाहतों तों दत्तोपंतांची स्वारी स्नान करून आडवें गंध लावून खांद्यावर शालजोडी टाकून उभी असलेली दिसली. 'इतकी घाई काय आहे?' असें विचारल्यावर ते म्हणाले, "सकाळीं नऊ वाजतां इथले महाराज पद्मनाभस्वामींच्या दर्शनास येतात त्या वेळचा देखावा फार चांगला असतो· तो पाहायला तुम्हांला यायचं नाहीं का?"

अन्नमलाई विद्यापीठाचे इतिहासाध्यापक रावबहादुर श्रीनिवासाचारी हेहि दत्तोपंतांच्या बरोबर देवाच्या दर्शनास निघाले होते. इतक्या उशिरां उठून प्रातःकर्म उरकून स्नान करून योग्य वेळीं देवळांत उपस्थित राहणें मला अशक्य आहे अशी खात्री पटल्यामुळें त्यांनीं, "मग आम्ही तुम्हांला सोडून जातों. तुम्ही उद्यां दर्शन घ्या," असें म्हटलें आणि ती इतिहासाचार्यांची जोडी कंबरेस धोतरें, खांद्यावर शालजोडया, डोक्यास कांहीं नाही आणि अनवाणी अशा थाटानें राजाचें आणि देवाचें असें द्विविध दर्शन करण्यास एका नोकराबरोबर निघाली.

रा. व्यंकटाचारी नांवाचे एक प्रतिनिधि, केळकर आणि मी अशा तिघांनीं घाईघाईनें स्नानें उरकलीं आणि धोंतरें परिधान करून अंगावर पंचे घेऊन साधल्यास राजदर्शन आणि न साधल्यास देवदर्शन करण्याच्या हेतूनें एक वाटाडया बरोबर घेऊन पद्मविलास सोडिला. तेथून दोन हांकांच्या अंतरावर असलेल्या प्राकार-परिवेष्टित मंदिराचें भव्य गोपुर पाहून मी स्तिमित होऊन गेलों. त्याहूनहि अधिक मोठीं गोपुरें ह्यानंतर माझ्या पाहण्यांत यावयाचीं होतीं, पण हें मीं प्रथम पाहिलेलें गोपुर होय. दरवाज्यांतून आंत शिरतांच तेथील परिचारकांनीं आम्हांस अंगावरील पंचे कंबरेभोंवतीं गुंडाळण्याची सूचना केली. कंबरेच्यावर कोणतेंहि वस्त्र पुरुषाच्या अंगावर असतां कामा नये, असा त्रावणकोरी देवस्थानांचा कायदा आहे. पंचवीस वर्षांपूर्वी स्त्रियांना देखील हा दंडक लागू होता असें म्हणतात।

वस्त्रत्यागाचा हा नियम शीख लोकांच्या मंदिरप्रवेशाच्या नियमाच्या अगदीं उलट आहे. शिखांच्या देवळांत शिरतांना पुरुषांच्या डोक्यास शिरोभूषण आणि स्त्रियांच्या डोक्यास पदर अवश्य लागतो. आमच्या महाराष्ट्रांतल्या देवळांना मात्र नियमबियम कांहीं माहीत नाहींत.

हिंदु मंदिराच्या आकाराविषयीं आणि वैभवाविषयीं माझा आतांपर्यंतचा झालेला वाईट ग्रह ह्या मंदिराच्या भव्य आवारांत शिरल्याबरोबर बदलून टाकावा लागला. आवारांत एक हजार माणसें सोयीनें बसतील अशी मोठी पडशाळा आहे. तिच्यांत लहानमोठ्या वयाचे पांचसातशें ब्राह्मण स्त्रीपुरुष कशाची तरी मार्गप्रतीक्षा करीत पाटांवर बसून राहिले होते. पडशाळेच्या छपरावर हजारों कावळे तसेच वाट पाहत आपापसांत भांडून वेळ घालवीत होते. वाटाड्यानें सांगितलें महाराजांचें देवदर्शन झाल्यावर ह्या सगळ्या ब्राह्मणांना शिधा मिळणार आहे. त्यांतलेच चार दाणे ते कावळ्यांना फेंकतात. एकंदरीनें महाराजांचें देवदर्शन अद्याप व्हावयाचें आहे असें कळून आम्हांला बरें वाटलें. पडशाळेंतून चालत जाऊन तिच्या बाहेर प्रशस्त अंगणांतील एका मोठ्या पारावर आम्ही जाऊन बसलों. शेजारींच तासभर वाट पाहून कंटाळ-लेले दोघे इतिहासाचार्य बसून राहिले होते. बिचाऱ्यांची घाई फुकट गेली! महाराज जुन्या स्टँडर्ड वेळेप्रमाणें नऊ वाजतां येत असत; पण बदललेल्या वेळानें ते दहा वाजतां येऊं लागले, हा शोध त्यांना आतां लागला.

आमच्या डोळ्यांसमोरचा देखावा एखाद्या पौराणिक चित्रपटाच्या सजा-वटीसारखा अपूर्व आणि आश्चर्यजनक दिसत होता. खांद्यावर तलवार, डोकीस गांठी मारलेल्या लांब शेंड्या, कंबरेभोंवतां गुंडाळलेलें पांढरें स्वच्छ चिकच्छ धोतर आणि धोतरावरून बांधलेलें खुणेचें पिवळें फडकें अशा वेषांत पोलिस शिपाई खडा पहारा करीत होते. त्यांचा जुना वेष आणि आधुनिक कवायती पद्धतीचें अबाउट टर्न पाहून गम्मत वाटत होती. दोन दोन पुरुष उंचीच्या पितळी दीपमाळा, खांद्याएवढ्या उंच चांदीच्या समया, चांदीचे लांबण दिवे वगैरे मंदिरवैभव पाहून आम्ही महाराष्ट्राचे कंगाल सर्द होऊन गेलों. सव्वा दहा वाजतां शंखनाद ( अलंकारिक नव्हे खरोखरीचा ) होऊन महाराजांची स्वारी प्राप्त झाल्याची घोषणा झाली. सात-आठ ब्राह्मण पुढें, त्यांच्यानंतर

एक शस्त्रधारी ए. डी. सी., नंतर राजगुरु दिवाकरस्वामी, त्यांच्यामागून कंबरेभोंवतालच्या चादरीशिवाय अंगावर सूतहि नसलेले महाराज आणि मागून दहावीस बाजारबुणगे असा घोळका मंदिराच्या गाभाऱ्याकडे गेला. आमच्या-सारख्या शेंपन्नास दर्शनेच्छूंना महाराजांनीं दोन हात जोडून नमस्कार केला आणि ते गाभाऱ्यांत शिरले.

महाराजांचें देवदर्शन झाल्यावर ते परत गेले. आम्ही राजदर्शन उरकून देव-दर्शनाकरितां सभामंडपांत शिरलों. मूळचा देव गाभाऱ्यांत पार्श्वभूमीवर अंधा-रांत पहुडलेला असून त्याच्यापुढें नवीन देवदेवतांची गर्दी झालेली आहे. पद्म-नाभाचें संपूर्ण दर्शन एकदम घडत नाहीं. तीन निरनिराळ्या खिडक्यांतून तें पृथक् पृथक् घडतें. पहिल्या खिडकींतून पद्मनाभाचें (विष्णूचें) डोकें आणि वर शेषाचीं असंख्य डोकीं; मधल्या खिडकींतून विष्णूच्या नाभींतून उगवलेलें पद्म आणि त्यावर विराजलेल्या ब्रह्मदेवाचीं चार डोकीं; आणि शेवटल्या खिडकींतून श्रीच्या चरणांचें अंधुक दर्शन होतें. देवळांत विद्युत्प्रकाशाचा विटाळ होऊं देत नाहींत आणि तें एका परीनें बरेंच आहे. विद्युत्प्रकाशांत मूर्तीचें स्पष्ट दर्शन झाल्यास त्याजवरील श्रद्धा डळमळीत होण्याचा फार संभव आहे. झांकली मूठ सव्वा लाखाची !

ऐतिहासिक वस्तूंच्या प्रदर्शनांत आमच्या वस्तू मांडण्याकरितां दुपारीं आम्ही त्रावणकोर युनिव्हर्सिटी हॉलमध्यें गेलों. आम्हीं नेलेल्या वस्तू मित्रोदय नांवाच्या मराठी वर्तमानपत्रांतील सन १८६३ मधील कांहीं कर्तनें होतीं. त्यांत त्रावणकोर संस्थानच्या राज्यकारभारावर आलेले स्तुतिपर लेख अर्थात् त्रावणकोरास भरणाऱ्या प्रदर्शनांत शोभण्यासारखेच होते. आम्ही वस्तू मांडीत असतां, "दिवाणसाहेब आले" अशी सूचना आम्हांला मिळाली. त्रावण-कोरचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांचीं छायाचित्रें पाहिलीं होतीं त्यावरूनच त्यांना मी ओळखूं शकलों, इतक्या साध्या पोषाखांत ते होते. अंगांत सदरा, दक्षिणी ब्राह्मण नेसतात त्या पद्धतीचें धोतर, वहाणा आणि गळ्याभोंवतीं लपेटलेलें उपरणें अशा पोषाखांत जरी ते आलेले असले तरी पाणीदार विशाल डोळे, मोठें नाक आणि भव्य कपाळ हीं त्यांच्या उच्चपदाची साक्ष देत होतीं. त्यांच्याबरोबर युनिव्हर्सिटीचे व्हाइस-चॅन्सेलर चंद्रशेखर हेहि

अगदीं साध्या मलबारी पोशाखांत आले होते. प्रदर्शनीय वस्तू पाहत ते आमच्या कपाटाशीं आले. मी त्यांना इतर वस्तू दाखवून मित्रोदयांतील लेखाचा मतलब इंग्रजींत सांगूं लागलों. तेव्हां त्यांनीं तें मजजवळून मागून घेतलें आणि आपल्याला मराठी येतें असें सांगून त्यांतील एक लेख त्यांनीं मोठ्यानें वाचून दाखविला. राजकीय मतें कांहीं असोत पण हा पुरुष कर्तृत्व-शाली आहे अशी मात्र आमची खात्री झाली.

ह्या प्रदर्शनांतील बराच मोठा भाग साहजिकपणें मलबारी वस्तुसंग्रहानें व्यापला होता. ताडपत्रें आणि भूर्जपत्रें यांचें वैपुल्य हें मलबारी लेखसंग्रहाचें वैशिष्ट्य. कांहीं कालापूर्वी दस्तऐवज करण्याकरितां सरकारी शिक्क्याचीं ताड-पत्रें मिळत असत. कागदांपेक्षां ताडपत्र टिकाऊपणांत सरस, परंतु लिहिण्यास अवघड असतें. हल्लींची ( १९४३ ) कागदाची टंचाई अधिक वाढली तर लेखनकलेंत ताडपत्रांचा उपयोग पुनः सुरू होईल असें वाटतें. तिकडील तहनामे, करार, साहित्यप्रबंध इत्यादि जुनीं लिखाणें पत्ररूपानें अक्षरशः आहेत.

तिसऱ्या दिवशीं सकाळीं शहरांतील चित्रालय आणि रंगविलास राज-वाड्यांतील चित्रें पाहिलीं. रंगविलासांत देव-देवता, राक्षस, वानर इत्या-दिकांचे लांकडी रंगीत समान आकाराचे शें-दोनशें पुतळे एका दालनांत ठेविलेले दिसले. ह्या पुतळ्यांचा उपयोग दशावतारी नाटकाच्या वेळीं करण्यांत येतो असें समजलें.

दुपारीं परिषदेच्या अधिवेशनास प्रारंभ झाला. महाराजांनीं उद्घाटनाचें भाषण केलें, व त्यावरून त्यांच्या वक्तृत्वासंबंधीं अनुकूल मत झालें. परिषद पूर्णपणें यशस्वी झाली असा मामुली शेरा देण्यास हरकत नाहीं. सायंकाळीं राजवाड्यांत एक उपवन-संमेलन झालें, व त्यांत त्रिवेंद्रमच्या राजकीय ( म्हणजे पोलिटिकल नव्हे सरकारी ) नृत्यशाळेचा मुख्य अध्यापक जगप्रसिद्ध नर्तक गोपीनाथ याची कला आम्हांला पाहावयास मिळाली. भस्मासुर-मोहिनी व इतर दोन नाटकें करून दाखविल्यावर गोपीनाथनें मयूरनृत्य करून दाखविलें. मोर पावसाळ्यांत नाचतात म्हणून वाद्ययंत्रानें मल्हार रागांत वादन चालू

केलें आणि पडदा उघडला. गोपीनाथ मोराप्रमाणें सजून ओणवा होऊन डोळे मिचकावीत आणि मानेला हिसके देत सावकाश पावलें टाकीत पुढें सरकणें, पुनः कांहीं पावलें मागें जाणें, डोळे मिटून पापण्यांचें पांढरें कातडें ओढून घेणें इत्यादि मयूरलीला तो मोरापेक्षांहि अधिक वास्तवपूर्ण करून दाखवीत होता. खऱ्या मोराला देखील मयूरनृत्य इतकें चांगलें करतां येणार नाहीं. आरंभींचे पवित्रे पूर्ण झाल्यावर कंबरेवर योजिलेला पिसारा त्यानें उभारला. नृत्याची शेवटली रंगत फारच नैपुण्यानें पार पाडिली. पडदा पडला आणि हें नाटक खलास झालें. मयूरनृत्य मात्र आम्हीं लवकर विसरणें शक्य नाहीं.

ह्या संमेलनाच्या वेळीं आम्हांला महाराणी सेतु-पार्वतीबाई यांच्या दर्शनाचा लाभ झाला. ह्यांचाहि पोशाख मलबारी पद्धतीचा व पांढरा शुभ्र होता. गळ्याखालचा भाग चोळीनें आणि पोटापासून पायांपर्यंतचा भाग भोवतालीं गुंडाळलेल्या जरीकांठी पातळानें झांकलेला होता. अंगावर पदर नव्हता. कपाळास कुंकूं होतें, पण एकहि अलंकार अंगावर नव्हता. प्रतिनिधींच्या घोळक्यांत उभ्या राहून ह्या भारतीय चित्रकलेवर बोलत होत्या. हिंदुस्थानांत तयार झालेल्या रंगांनीं चित्रें रंगविण्याचे आपण कोणकोणते प्रयत्न केले आणि त्यांत आपल्याला कसकसें यशापयश येत गेलें याचें वर्णन त्या सफाईदार उच्चारांनीं आणि शुद्ध भाषेनें इंग्रजींत करीत होत्या. राज्यकर्त्या महाराजांच्या त्या मातुश्री आहेत. महाराज अद्याप ( १९४३ ) अविवाहित आहेत, पण त्यांची भावी पत्नी जेव्हां गृहप्रवेश करील तेव्हां देखील तिला राज्ञीपद मिळणार नाहीं. महाराणी सेतु-पार्वतीबाई ह्यांच्यानंतर तें पद त्यांच्या मुलीला म्हणजे महाराजांच्या बहिणीला मिळेल आणि तिचा मुलगा गादीचा वारस होईल.

महाराजांच्या दैनिक देवदर्शनासंबंधीं थोडी माहिती सांगण्याचें राहिलें. मार्तंडवर्मा नांवाच्या राजानें आपलें राज्य पद्मनाभस्वामीला अर्पण केलें आणि आपण पद्मनाभदास अशी पदवी धारण करून तो देवाच्या वतीनें राज्यकारभार चालवूं लागला. आज मितीस त्याच्या वंशजांनीं ती कुलप्रवेणी कायम चालविली असून तेहि आपल्याला पद्मनाभदास म्हणवितात. दररोज सकाळीं महाराज पुढील एक दिवसपर्यंत राज्य करण्याची परवानगी शेषशायी पद्मनाभा-

करून मागून घेतात. जर ते त्रिवेंद्रम्च्या बाहेर गेले किंवा आजारीबिजारी असले तर अर्थात् दर्शनास येऊं शकत नाहींत आणि दंडादाखल देवस्वम् ( भंडाऱ्या )मध्यें सहा आणे पाठवितात. नेपाळचे राजे अशाच प्रकारें पशुपति महादेवाच्या नांवानें राज्य करितात; इतकेंच नव्हे, तर राज्य देवाचें आणि राजे हे त्याचे वहिवाटदार अशी भावना सर्व हिंदु राज्यांत आढळून येते. हिंदुस्थानच्या उत्तरेचें आधिपत्य पशुपति महादेवाचें तर दक्षिण टोंकावरील त्रावणकोरचें शेषशायी विष्णूकडे आहे.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशीं बैठकीनंतर त्रावणकोर युनिव्हर्सिटीनें बागेंतला उपाहार दिला. उपाहारोत्तर कर्नाटक संगीताचा जलसा ठरविला होता. गाणाराचें नांव आतां आठवत नाहीं. त्या तीस-बत्तीस वर्षांच्या तरुणाला मद्रास विद्यापीठानें ‘ डॉक्टर ऑफ म्युझिक ’ ही पदवी नुकतीच बहाल केली होती. हे हिंदुस्थानांतले पहिले आणि एकटेच डॉक्टर ऑफ म्युझिक असावेत असा माझा निराधार तर्क आहे. गवईबुवांना दोनच वाद्यांची साथ होती. एक मृदंगम् आणि दुसरें व्हायोलिनम्. व्हायोलिनवाला लांब शेंडीवाला, काळाभोर, सहा फूट उंचीचा आणि त्याच प्रमाणांत जाडजूड असून तें चिमुकलें व्हायोलिन त्याच्या प्रचंड देहावर एखाद्या खुळखुळ्यासारखें क्षुद्र भासत होतें. वाद्यावरील त्याचें प्रभुत्व अवर्णनीय भासलें. गवयाची प्रत्येक तान, त्याचा प्रत्येक नखरा, त्याची प्रत्येक मेंड, प्रत्येक खटका व दुसऱ्या ज्या काय भानगडी असतील त्यांचा हुबेहुब प्रतिध्वनि तो व्हायोलिनच्या तारांतून काढीत होता. गवयाचें कौशल्य अधिक कीं व्हायोलिनवाल्याचें, ह्याचा निर्णय करणें अशक्य होतें. डॉक्टर ऑफ म्युझिकचे तंबोराधारी विद्यार्थी सूर धरीत त्यांच्यामागें बसले होते. कर्नाटकी संगीत हें रेडियोच्या योगें महाराष्ट्राच्या आतां पुनः चांगलेंच परिचयाचें झालें आहे. संवयीनें हें संगीतहि आपल्याला आवडूं लागेल अशी मला खात्री आहे. विशेषतः टेलिव्हिजन सुरू झाल्यावर कर्नाटकी संगीताच्या बैठकी आपल्याला फारच पसंत पडूं लागतील. कर्नाटकी संगीत आणि हिंदुस्थानी संगीत यांतील मुख्य फरक असा आहे कीं, कर्नाटकी गवई मृदंगाच्या तालावर आपल्या मांड्या जोराजोरानें थापटीत असतात, तर हिंदुस्थानी गवई अतिशय गुंतागुंत झालेल्या दोऱ्याचें काल्पनिक भेंडोळें एक-

सारखें सोडवीत किंवा गुंडाळीत असतात. हिंदुस्थानी संगीताचे श्रोते लय आली कीं 'हो' ओरडत असतात तर कर्नाटकी श्रोते एकसारखें तालाबरोबर आपापल्या मांड्या थोपटीत असतात.

बैठकीच्या प्रारंभीं सर रामस्वामी यांनीं सांगितलें, "त्रावणकोरचे महाराज (त्यांचें नांव मी विसरलों) शंभर वर्षांपूर्वी होऊन गेले. त्यांना गायन, चित्रकला व इतर कलांचा फार शोक होता. त्यांनीं स्वतः तामीळ आणि मल्याळी भाषांतच नव्हे तर हिंदी, कानडी आणि मराठींत देखील पदें केलीं आहेत. आजच्या बैठकींतील सर्व पदें त्यांचींच होतील." आम्हांला तामीळ, मल्याळी आणि कानडी भाषांतले कांहींच समजलें नाहीं, पण एक हिंदी आणि एक मराठी अशीं दोन पदें मात्र समजलीं. गवईबुवांनीं "कोठें खेळती वनमाळी" अशा प्रारंभाचें मराठी पद आळवतांच सर्व महाराष्ट्रीय प्रतिनिधींनीं टाळ्या वाजवून त्यांचें अभिनंदन केलें.

गायनाची बैठक संपल्यावर आम्ही गवईबुवांचें अभिनंदन करण्याकरितां त्यांच्यासमोर उभे राहिलों. गवईबुवांनीं मला विचारिलें, "तुम्हांला हिंदुस्थानी संगीत अधिक आवडतं कीं कर्नाटकी ?"

मीं उत्तर दिलें, "आतांपर्यंत कर्नाटकी संगीताच्या बैठकीला मी हजर राहिलों नव्हतों. ह्या माझ्या पहिल्याच बैठकीनंतर मला कर्नाटकी संगीतच जास्त पसंत पडलं आहे."

गवईबुवांचा चेहरा प्रफुल्लित झाला. त्यांनीं विचारिलें, "कां बरं ?"

"कार्यक्रमांत एकंदर दहा पदं लिहिलेलीं आहेत. ही हिंदुस्थानी गायनाची बैठक असती तर निदान पांच तास तरी ती संपायला लागले असते. पण तुम्हीं पांच पांच मिनिटांत एकेक पद आटोपून एक तासांत जलसा पूर्ण केला म्हणून मी कर्नाटकी संगीतच जास्त पसंत करतों."

माझें उत्तर ऐकून डॉक्टर ऑफ म्युझिक रागावलेले दिसले; ते कांहीं बोलले नाहींत. परंतु व्हायोलिन वाजविणाऱ्या गृहस्थांनीं मला प्रश्न केला, "आमच्या गायनांतला कोणता विशेष तुम्हांला जास्त आवडला ?"

मीं उत्तर केलें, "पद म्हणतां म्हणतां मध्येंच लयीपाशीं येऊन गाणारा गातांना थांबतो—"

"यस् यस्, गो ऑन," मला उत्तेजन देत डॉक्टर ऑफ म्युझिक म्हणाले.

"मृदंग वाजविणारा आपली थाप थांबवून चापट उगारून स्तब्ध राहतो, व्हायोलिन वाजविणारा धनुकली तारांपासून अंतरावर धरून गवयानें पुनः गाण्याला प्रारंभ करण्याची वाट पाहतो—" मी भीत भीत बोललों.

साभिमान स्मित करीत व्हायोलिन-वादक म्हणाले, "सांगा सांगा, भिऊं नका."

"सगळे श्रोते पुढल्या अपेक्षेनं आ वासून स्तब्ध राहिलेले असतां, आणखी व्हायोलिनच्या तारेवर माशी बसल्याचा आवाज स्पष्ट ऐकूं येईल इतकी शांतता सभागृहांत नांदत असते, तो क्षण कर्नाटकी संगीताच्या श्रेष्ठतेचा उच्च बिंदु होय असं मी समजतों." मी म्हणालों.

माझ्या बोलण्यानें गवईबुवा आणि व्हायोलिन-वादक संतापून गेले. मीहि तेथें अधिक थांबण्यांत मजा नाहीं असें जाणून तेथून पाय काढिला.

परिषदेच्या तिसऱ्या दिवशीं प्रतिनिधींच्याकरितां कन्याकुमारीची फेरी योजण्यांत आली होती. कन्याकुमारीला जाणारानें विजार, बूट न घालतां धोतर नेसून आणि देशी पायतणें घालून यावें अशी सूचना परिषदेच्या चालकांनीं दिली. माझें जानवें तुटल्यामुळें संध्याकाळीं एका दुकानांत जानवें विकत घेण्यास मी गेलों. ती वेळ संध्याकाळची होती. दुकानदार म्हणाला, "आम्ही ब्रह्मसूत्र ह्या वेळीं विकीत नाहीं. उद्यां सकाळीं स्नान करून या आणि गायत्रीमंत्रम् म्हणून दाखवा म्हणजे आम्ही तें तुम्हांला विकत देऊं." दुसऱ्या दिवशीं ह्या अटी पाळून जानवें विकत घेतलें.

सकाळच्या प्रहरीं सर्व प्रतिनिधी दोन मोटारबशांतून हिंदुस्थानांतील सर्वांत जास्त लांबीच्या काँक्रीट रस्त्यानें त्रिवेंद्रम्हून दक्षिणाभिमुख निघाले. हा सव्वीस कोस लांबीचा काँक्रीट रस्ता हिंदुस्थानांत पहिल्या नंबरचा आहे असें म्हणतात ( १९४३ ). त्याचा उत्तरेकडील वीस कोसांचा भाग दाट वस्तींतून

गेला आहे. एखादें खेडें, त्यांतील बाजार, मग पुनः तुरळक घरें आणि सुपारी-नारळीच्या बागा लागाव्या; एखादी नदी ओलांडली कीं, पुन्हां दुसरें खेडें सुरू व्हावयाचें. बागांतून नारळसुपारीशिवाय काजू, फणस आणि आंबा हीं मोठीं झाडें असून जमिनीवर तवकिराचीं गुडघ्याएवढीं झाडें सर्वत्र दिसत होतीं. माणसांनीं गजबजलेल्या ह्या भूमिभागांत गुरें आणि कुत्रीं फारच थोडीं दिसत होतीं. ( त्रावणकोर संस्थानचें क्षेत्रफळ अवघें १७५० चौरस कोस असून त्याची लोकसंख्या साठ लक्ष आहे. बडोदें संस्थानचे हेच आंकडे अनुक्रमें दोन हजार आणि अठ्ठावीस लक्ष असे आहेत. बडोदें संस्थान हें दाट लोकसंख्येचें क्षेत्र समजलें जातें. )

इकडे गुरें फारशीं दिसत नाहींत, असें विधान मीं केल्यावर मोटारीस मैलभर जाऊं देऊन दत्तोपंत म्हणाले, "अहो, तुम्ही म्हणालांत ना कीं, इकडे गुरं फारशीं दिसत नाहींत म्हणून ? ही पहा गाय !" मीं उत्तर दिलें, "माझ्या विधानाचं खंडन करायला तुम्हांला एक मैल अंतर तोडावं लागलं तेव्हां कुठें एक गाय दिसली !"

इतक्या दाट मनुष्यवस्तींत गुरांना खायला कसें मिळणार ? ज्या ठिकाणीं माणसांचीच उपासमार तेथें कुत्र्यांचा काय पाड लागणार ? एक बोटभर देखील नापीक जमीन ह्या प्रदेशांत नसूनहि लोकवस्ती प्रमाणाबाहेर वाढल्यानें सामान्य जनतेंतील दारिद्र्य सीमेला पोंचलें आहे असें जागोजाग भेटणाऱ्या भिकाऱ्यांच्या थव्यांवरून दिसून येत होतें. सामान्य जनसमूहाची सुस्थिति खडकाळ मुंबई प्रांतांत जितकी आहे तितकी हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि प्रांतांत दिसणार नाहीं असें माझें मत प्रत्यक्ष अनुभवानें बनलेलें आहे. आंबे, काजू, वेलदोडे, कॉफी, रबर इत्यादि धनोत्पादक पिकांनीं मूठभर मळेवाल्यांची चंगळ होते, पण मजुरांची दैन्यावस्था दूर करण्यास बाजरी, जोंधळा, तांदूळ इत्यादि धान्येंच जमिनींत पिकलीं पाहिजेत. त्रावणकोर, गोमांतक आणि काश्मीर हे जरी मुशाफरांना स्वर्गतुल्य वाटत असले तरी तेथील कायमच्या रहिवाशांना तसे वाटत नाहींत. किंबहुना ह्या तिन्ही प्रदेशांतील जनतेवर दारिद्र्याचा पगडा भोंवतालच्या दृश्यहीन प्रदेशापेक्षां अधिक पडलेला दिसतो.

त्रिवेंद्रम्‌पासून तीन कोस गेल्यावर आम्ही एका देवळापाशीं थांबलों.

देवळाच्या आवारांत एक फणसाचें झाड असून त्याला मोठी थोरली ढोली आहे. त्रावणकोर राज्याचा संस्थापक मार्तण्डवर्मा ह्याच्या मागें शत्रू लागले असतां तो ह्या ढोलींत लपून बसला होता, म्हणून फणसाच्या ह्या झाडास फणसाई अशा अर्थाचें नांव कृतज्ञतापूर्वक देण्यांत आलें आहे. ह्या विजयी वृक्षमातेला वंदन करून आम्ही आणखी दोनतीन कोस अंतरावरील त्रावण-कोरची जुनी राजधानी पद्मनाभपुरम् येथें पोचलों. ह्या ठिकाणीं ब्रह्मी पद्धती-वर लांकडांचा पुष्कळ उपयोग करून बांधलेला जुना राजवाडा आहे. वाड्यांतच कचेऱ्या आणि न्यायालय यांचा समावेश झालेला असल्यानें तो इतका विस्तीर्ण आहे कीं, वाटाड्याशिवाय त्यांतून बिनचूक माघारी येणें कठिण आहे. वाड्याजवळच काळ्या संगमरवराचा छोटा पण बारीक नक्षीकाम असलेला कल्याणमंडप आहे. दक्षिण हिंदुस्थानांत विवाहाला कल्याण म्हणतात, जसें लक्ष्मीनारायण-कल्याण नाटक. आपण महाराष्ट्रांत राहणारे लोक दगडाला दगड म्हणणारे, विवाहाला कल्याण कसचे म्हणणार ?

ह्या अस्ताव्यस्त राजवाड्याचें निरीक्षण करून आम्ही मार्गस्थ झालों. वाटेंत एका ठिकाणीं दोन पैशांला एक ह्या दरानें आम्हीं शहाळीं विकत घेतलीं. मुंबईस एका शहाळ्याला हल्लीं ( १९४३ ) अडीच-तीन आणे पडतात. त्रिवेंद्रमहून वीस कोस अंतरावर नागरकोईल नांवाचें शहर लागलें. नागर हें नाग शब्दाचें सन्मानार्थक अनेकवचन आहे; जसें—अय्या–अय्यर, मुदली–मुदलियार इत्यादि. कोईल म्हणजे देऊळ. नागोबाचें देऊळ असा ह्या नांवाचा अर्थ झाला. येथून तिनेवेल्लीपर्यंत मोटार-सडक आहे. नागरकोईलपासून भूप्रदेशाचें रमणीयत्व कमी होत जातें. झाडांऐवजीं आतां तांदुळाचीं शेतें दिसूं लागलीं. वृक्षहीन खडक पुष्कळ दिसूं लागले आणि मनुष्यवस्तीची दाटी कमी होऊं लागली. एकंदरीनें आपण कोंकणांतून जात आहों असा भास उत्पन्न होऊं लागला. सहा कोस गेल्यावर कन्याकुमारीची वस्ती लागली. आम्ही प्रथम मंदिराजवळ जाऊन उतरलों. मंदिराभोंवतीं असलेल्या व चांगल्या डागडुजींत ठेविलेल्या उंच कोटानें पूर्वीच्या काळीं चोरलुटारूंपासून कन्या-कुमारीचें रक्षण केलें असेल; पण आतां तो समुद्रावरून घोंघावणाऱ्या तुफानी वाऱ्यापासून आणि खाऱ्या हवेपासून मंदिराचा बचाव करीत आहे. प्रथम

आम्हीं स्नानाकरितां मुद्दाम बांधिलेल्या कुंडांत स्नान केलें. हीं कुंडें इतर तीर्थांतील कुंडांप्रमाणें सांचलेल्या घाणेरड्या पाण्यानें भरलेलीं नसून त्यांत समुद्राच्या लाटेचें पाणी खेळतें ठेविलें आहे. त्यामुळें तीं अर्वाचीन बाथप्रमाणें स्वच्छ वाटतात. कुंडाच्या दक्षिणेस एक लहानसा बेटवजा खडक आहे. त्यावर स्वामी विवेकानंद तपश्चर्या करीत होते, म्हणून त्याला विवेकानंदांचा खडक असें नांव पडलें आहे. विवेकानंदांच्या रामकृष्ण मिशनची शाखा कन्याकुमारीस राजाश्रयाखालीं शुद्धीकरणाचें कार्य नेटानें करीत आहे. शुद्धि चळवळीस उघडपणें आश्रय देणाऱ्या त्रावणकोर संस्थानचें अभिनंदन करणें अवश्य आहे.

स्नानोत्तर आम्ही मंदिरांत दर्शनास गेलों. दक्षिण हिंदुस्थानच्या मानानें हें मंदिर भव्यतेंत उणें वाटलें; पण त्याचा परिसर मात्र बराच मोठा आहे. देवीच्या दर्शनाला जाण्याची वाट दिव्याच्या उजेडाशिवाय सांपडत नाहीं. विजेच्या दिवट्यांचा अपवित्र प्रकाश दक्षिणेंतील सर्व मंदिरांत निषिद्ध मानिला आहे. अर्थात् पुजाऱ्यांनीं दाखविलेल्या तुपाच्या दिव्याच्या मंदप्रकाशांतच वाट काढीत मूर्तीजवळ जातां आलें. कुमारीची मूर्ति षोडश-वर्षीय उपवर कन्येप्रमाणें यौवनसंपन्न आणि सौंदर्ययुक्त दिसते. मूर्तीची सजावट काळजीपूर्वक करण्यांत येते. ही उपवर कन्या हिंदुस्थानच्या रक्षणाकरितां स्वार्थत्याग करून दक्षिण टोंकास उभी राहिलेली आहे. भौगोलिक दृष्ट्या भारत-मातेच्या पादांगुष्ठावर ह्या सुंदर त्यागमूर्तीची स्थापना करणाऱ्या मनुष्याच्या प्रतिभेचें कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं. राष्ट्राच्या चिरकालीन तारुण्याचा आणि आत्मत्यागाचा हा संकेत तीर्थयात्रेस जाणाऱ्या बहुसंख्य अज्ञ यात्रेकरूंना आणि पोटभरू पुजाऱ्यांना माहीत नसल्यानें यात्रांची विटंबना झाली आहे. प्रयागक्षेत्रावरील त्रिवेणीसंगमाच्या दर्शनानें प्राचीन आर्य संस्कृतीच्या इतिहासाचें स्मरण न करितां यात्रेकरू भलत्याच विचारांनीं यात्रा फुकट घालवितो. भाविक असला तर तेथल्या भाकडकथांना भुलून तो पंड्यांच्या भक्ष्यस्थानीं सांपडतो आणि चिकित्सक असला तर पंड्यांना आणि भोळ्या यात्रेकरूंना शिव्या देत यात्रांचा फोलपणा सिद्ध करीत बसतो; परंतु सर्व यात्रांच्या ठिकाणचे संकेत, त्यांचें सांस्कृतिक महत्त्व आणि तेथील खरा इतिहास यांचा

विचार केल्यास तीर्थयात्राप्रबंधांत कांहीं तरी सूत्रबद्ध योजना आहे असें विचारी यात्रेकरूच्या ध्यानांत येईल. मात्र पंडये, बडवे किंवा गाइड यांच्या आहारीं गेलें न पाहिजे.

ज्या मूर्तीचें दर्शन भाविक अंतःकरणाप्रमाणेंच चिकित्सक मनासहि चटका लावितें अशा मूर्तीत कुमारीची गणना होईल. कुमारीचें दर्शन घेऊन श्रद्धायुक्त अंतःकरणानें आम्ही सरकारी डाकबंगल्यांत भोजनाकरितां गेलों. वाटेंत समुद्रांतील चिजा विकणाऱ्या मुलांमुलींच्या घोळक्यांतून मार्ग काढावा लागला. दोन प्रकारची बारीक वाळू पैशाला टोपलीभर ( दोन ओंजळी ) ह्या दरानें मिळत होती. एक प्रकारची वाळू पांढरी शुभ्र आणि तांदुळाच्या आकाराची असल्यानें तांदुळांत मिसळल्यास डोळ्यांनीं ओळखतां येणार नाहीं इतकी बेमालूम होती. हिला तीं मुलें राइस म्हणत होतीं. ( राइस हा शब्द अरीसु ह्या दाक्षिणात्य शब्दाचा अपभ्रंश आहे. ) दुसरी तांबडी लाल वाळू अळीवाच्या दाण्यासारखी पण चकचकीत दिसत होती. हिला तीं मुलें कुमारीचें कुंकू म्हणत होतीं. शंखांच्या माळा, कवड्या, मोठ्या शिंपा इत्यादि जिन्नस कचऱ्याच्या मोलानें तीं मुलें विकत होतीं. समुद्रांतील एका सजीव वनस्पतीच्या अंगाभोंवतीचे कांटे पैशाला चाळीसप्रमाणें मिळत होते. ह्या कांट्यांचा उपयोग स्लेटपाट्यांच्या पेन्सिलीप्रमाणें करितां येतो. मंदिरांत नित्य खंडीभर भाताचा महानैवेद्य आणि बाहेर दिवसभर उन्हातान्हांत मेहनत करून गोळा केलेल्या वस्तू दोनचार पैशांना विकून कशीबशी गुजराण करणारीं हीं कंगाल मुलें पाहून विषाद वाटल्याशिवाय राहत नाहीं.

डाकबंगला पुळणीच्या जवळ असून त्याच्या आवारांत प्रेक्षणिक दृष्ट्या महत्त्वाच्या बिंदूंवर बाकें मांडिलीं आहेत. बाकावर बसून नजर फेंकणारास बंगालचा उपसागर, हिंदी महासागर आणि पश्चिम समुद्र या तिहींचें एक समयीं दर्शन घडतें. सूर्योदय आणि सूर्यास्त दोन्ही समुद्रांत होत आहेत असा देखावा हिंदुस्थानांत फक्त ह्याच ठिकाणीं पाहावयास मिळतो. मातृभूमीच्या ह्या अंगुष्ठास प्रणाम करण्याची संधि मिळालेली पाहून आम्हां सर्वांना अतिशय आनंद वाटला.

मध्याह्नानंतर एक तासानें आम्ही परत फिरलों. सुमारें दहा कोस आल्या-

वर शुचींद्र देवाच्या दाराशीं आमच्या मोटारी थडकल्या. मंदिराच्या दाराशीं दोन प्रचंड रथ उभे होते. दोन्ही रथांचा आकार सारखाच होता. प्रत्येक रथास सात हात व्यासाचीं म्हणजे दोन पुरुष उंचीचीं चार चार चाकें होतीं. शेजारीं उभ्या असणाऱ्या तीन मजली इमारतीच्याइतकी त्या रथाची उंची होती. रथ ओढण्यास गलबतावर उपयोजण्यांत येणाऱ्या दोरांसारखे जाड दोर गुंडाळ्या करून ठेविलेले होते. हें रथ वर्षातून एकदांच ओढण्यांत येतात व ते ओढण्यास गांवांतील बहुतेक सर्व सशक्त पुरुष मंडळींची जरूर पडते.

मंदिराचा दरवाजा पुण्याच्या शनवारवाड्याच्या दरवाजाएवढा भव्य आणि तितकाच मजबूत दिसला. दरवाज्यांतून आंत शिरतांच देवड्यांवर देवस्वम् ऑफिस लागलें. देवळाचे एम्. ए. झालेले व्यवस्थापक तेथें भेटले. मधुरेच्या देवळाचे व्यवस्थापक एम्. ए., पी. एच्डी., बार-ॲट-लॉ आहेत हें आधीच माहीत असल्यानें ह्या व्यवस्थापकांच्या एम्. ए. पणाचें आम्हांला फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. देवड्या ओलांडून आणखी एका दरवाज्यांतून देवळाच्या प्रांगणांत शिरतांच त्याची भव्यता आणि कलापूर्णता पाहून आम्ही चकित होऊन गेलो. दरवाज्यावरील उंच गोपुर आधुनिक टॉवरास लाजविणारें आहे. सभामंडप विस्तीर्ण असून त्याच्याभोंवतीं अनेक देवतांचीं उपमंदिरें आहेत. मुख्य देव शुचींद्र वामकुक्षी करीत असल्यानें आम्ही अगोदर इतर देव पाहूं लागलों. धर्म, भीम आणि अर्जुन ह्या तिघांच्या सुंदर मूर्ति तेथें दिसल्या. मनुष्याच्या चौपट आकाराची एकेक मूर्ति असून ती अंग-उपांगांनीं परिपूर्ण आणि आविर्भावयुक्त दिसत होती. आठ हात उंचीचा उभा बलभीम जर सजीव झाला तर आपल्या गदेनें आमचा क्षणांत समाचार घेईल अशी भीति वाटल्यावांचून राहिली नाही. इतर मूर्ति अशाच सुंदर आहेत. ज्या राजानें त्रावणकोर संस्थानांत मातृसत्ताक पद्धति सुरू केली, त्याचा पुतळा पाहून वुइमेन्स कॉन्फरन्सनें ह्या राजाची प्रतिमा आपल्या कामकाजावर चिन्ह म्हणून वापरावी, असें माझ्या मनांत आलें.

ह्या मंदिरांत एक चमत्कारिक वाद्य पाहावयास मिळालें. ह्या राजाच्या पुतळ्याजवळ चार दगडी खांब आहेत. प्रत्येक खांब बारीक बारीक एकतीस

कोरीव पाषाणदंडांचा समूह आहे. ह्या प्रत्येक पाषाणदंडावर लांकडी हातोडा आपटून वेगळाला सूर काढितां येतो. प्रत्येक स्तंभांतून अशा तऱ्हेनें तिन्ही सप्तकांतील तीव्र आणि कोमल सूर काढितां येतात. पुन्हां असा चमत्कार आहे कीं, एका खांबाचा आवाज सतारीच्या सारखा, दुसऱ्याचा सारंगी-सारखा, तिसऱ्याचा वीणेच्यासारखा आणि चौथ्याचा तंबोऱ्याच्यासारखा निघतो. असले पाषाणतरंग मधुरेच्या देवळांत देखील असून त्यांतील संगीताचा कार्यक्रम त्रिचनापल्ली रेडियोंतून ऑक्टोबर १९४२ मध्यें ऐकविण्यांत आला होता. प्राचीन भारतीय संगीत आणि स्थापत्य कलांचा मिलाफ ह्या स्तंभांत उच्च कोटीला पोंचलेला आढळतो.

मंदिरांतील देवाची निजून उठण्याची वेळ अद्याप झाली नसल्यानें व 'प्रत्यक्ष महाराजांकरितां देखील देवाची झोंपमोड आम्ही करूं शकत नाहीं' असें देवस्वम् अधिकाऱ्यांनीं निक्षून सांगितल्यानें आम्हीं बंद असलेल्या दारालाच नमस्कार करून मंदिर सोडिलें. हा शुचींद्र म्हणजे शंकराचा अवतार आणि कन्याकुमारीचा नियोजित वर आहे. हीं वधूवरें अवध्या वीस कोसांच्या अंतरावर उभीं राहून शेकडों वर्षांपासून मुहूर्ताची वाट पाहत आहेत.

बंडासुर दैत्यानें मला अमक्यापासून मृत्यु येऊं नये, तमक्यापासून येऊं नये असा वर शंकरापासून मिळविला. दैत्यांच्या वहिवाटीप्रमाणें तो मानवांच्या प्रदेशांत धुमाकूळ माजवूं लागला. त्यानें मागितलेल्या वरांत आपल्याला कुमारीकडून मृत्यु न येवो असा वर समाविष्ट झाला नव्हता; कारण कुमारी-कडून आपल्याला मरण येईल असें भय त्याच्या मनाला शिवलें नाहीं. त्या राक्षसाचा वध करण्याकरितां गौरीनें उपवर कुमारीचें रूप धारण केलें आणि आपलें अवतारकृत्य पूर्ण केलें. शंकरानें तिच्याकरितां शुचींद्र ह्या नांवानें तरुण पुरुषाचा अवतार धारण केला आणि तो लग्नाला येण्यास निघाला. कोणत्या कारणानें कोणास ठाऊक, ठरलेल्या मुहूर्तावर तो भरतखंडाच्या दक्षिण टोंकास पोंचला नाहीं. लग्नाला उभ्या राहिलेल्या कुमारीनें अक्षता आणि कुंकूं रागानें समुद्रांत उधळून दिलीं. आणि ती पुढील मुहूर्ताची वाट पाहत जागच्या जागीं उभी आहे. इकडे शुचींद्र वीस कोस अंतरावर मुहूर्ताचीच वाट पाहत उभा आहे. ज्या वेळीं दक्षिणसागर आपली मर्यादा ओलांडून भरतभूमीवर

आक्रमण करील त्या वेळीं तो मुहूर्त साधणार आहे. अर्थात् ह्या दैवी जोड-प्याच्या विवाह जितका लांबणीवर पडेल तितका भारतवासीयांच्या दृष्टीनें इष्टच आहे. मघाशीं सांगितलेली दोन प्रकारची वाळू हीच कुमारीचें कुंकू आणि तिच्या अक्षता यांचें रूपान्तर होय.

ह्या नवरदेवाचा निरोप घेऊन आम्ही त्रिवेंद्रम्‌ला परत आलों. त्रिवेंद्रमास हस्तिदंती जिनसांचे पुष्कळ कारखाने आहेत, म्हणून आम्ही कांहीं तरी खरेदी करण्यास बाजारांत गेलों. हस्तिदंती जिनसांच्या किंमती इकडच्यापेक्षा तिकडे अधिकच वाटल्या. त्याचप्रमाणें मधुरेचीं लुगडीं पुण्याच्या बाजारांतल्यापेक्षां मधुरेजवळच्या त्रिवेंद्रमास जास्त महाग वाटलीं. कदाचित् कायमच्या रहिवाशांस ह्या वस्तू कमी भावानें मिळत असतील, पण प्रवासी लोकांस लुबाडण्याची वृत्ति चोहोंकडे दिसून येते.

परिषदेच्या चालकांनीं सूप वाजविल्यामुळें प्रतिनिधी परत जाण्यास निघाले: मधुरा आणि रामेश्वर यांची यात्रा करून परत जाण्याचा माझा विचार रा. व्यंकटाचारी यांनीं, "एकट्यानें तीर्थयात्रा करण्याचा तुम्हांला अधिकार नाहीं, पुन्हां केव्हां तरी सहकुटुंब येऊन मधुरा रामेश्वरम् करा," असें बजावून खोडून काढिला. प्रो. श्री. ना. बनहट्टी ह्यांनीं कोची मार्गानें परत जाण्याची योजना आंखली होती व त्यांचा अनुयायी होण्याचें मीं ठरविलें. प्रो. बनहट्टी, रा. केळकर व मी अशा तिघांनीं सकाळीं आठ वाजतां मोटार मार्गानें त्रिवेंद्रम् सोडून क्वायलानकडे कूच केलें. येतांना हा भाग आम्हीं आगगाडीनें आक्रमिला होता तरी त्यांत नावीन्य वाटत होतें. क्वायलानपासून आलेप्पीपर्यंत जलमार्गानें प्रवास करण्याचा आमचा विचार होता; परंतु बोट सुटण्याला चारपांच तास अवकाश असल्यानें तो भाग मोटारीनेंच तोडण्याचें आम्हीं ठरविलें.

क्वायलानला आमच्या उसळत्या रक्ताच्या केळकरांनीं एक पराक्रम केला: आम्ही बंदरापासून मोटारतळापर्यंत रिक्शांतून सामान नेलें. मोटारवर सामान चढवावयाचें, असा ठराव आम्हीं करपल्लवी भाषेनें रिक्शावाल्याशीं केला होता. रिक्शा मोटारजवळ येतांच मोटार हमाल टपावर सामान चढवून हमालीचे

चार आण्याचे पैसे मागूं लागले. हा पैसे उकळण्याचा मार्ग पसंत न पडल्यानें ते देण्याचें केळकरांनीं नाकारिलें व हमाल सामान वरून खालीं फेंकून देऊं लागले. हमालांची बहुसंख्या आणि आमचें परप्रांतांतील अस्तित्व ध्यानांत न घेतां केळकरांनीं हमालास गुद्दा लगावला. एकमेकांची भाषा न समजल्यानें विचारविनिमयाचा एकच मार्ग आम्हांला खुला होता. पोलिस आला, पण त्यालाहि आम्हांला समजणारी कोणतीहि भाषा येत नव्हती. फक्त चार बोटेंच दाखवून 'फोर आनाज' अशी आमची समजूत तो घालीत होता. आमच्याभोंवतीं खूप गर्दी जमली आणि शौर्यापेक्षां शहाणपण श्रेष्ठ ह्या म्हणीची आठवण करून हमालास चार आणे आणि केळकरांस उपदेश देऊन आम्ही मोकळे झालों. ह्या भांडणामुळें आमच्याकडे सर्वांचें लक्ष वेधलें आणि आम्ही बशींत बसल्यावर चालकाच्याजवळ बसलेल्या इंग्रजी तऱ्हेचा खाकी पोशाख केलेल्या एका तरुणानें आम्हांला विचारलें, "तुम्ही रेकॉर्ड कमिशनचे प्रतिनिधी आहांत काय ?"

आम्ही होकार दिल्यावर तो पुढें म्हणाला, "तर मग तुम्हीच आमचे चुकलेले तीन असलां पाहिजे. सात प्रतिनिधी कोचीला ह्या रस्त्यानें जाणार होते. त्यांपैकीं चौघे अशाकाहारी आंतांच क्वायलानहून बोटीनें निघाले आहेत, ते रात्रीं अलेप्पीला पोंचतील. आपण दुपारीं चारला तेथें पोंचूं, सर्वांची व्यवस्था करण्याचं काम माझ्याकडे दिलं आहे. अर्थात् तुमचीहि व्यवस्था मी करतों."

आम्हीं त्या गृहस्थाकडून त्याची माहिती काढिली. तो त्रावणकोरचा ट्रॅन्सपोर्ट इन्स्पेक्टर ( वाहतूक-तपासनीस ) होता आणि जरी त्याचें नांव कुरूपम् असें होतें तरी तो दिसण्यांत चांगलाच सुरेख होता. त्याच्याउलट बडोद्याचे माझे मित्र रा. देखणे यांची अवस्था आहे. क्वायलानपासून अलेप्पीपर्यंतची वाट खाऱ्या पाण्याच्या कालव्याच्या कडेकडेनें होती. वाटेनें जातांना कुरूपम् आम्हांला तिकडील देखावे वर्णन करून सांगत होते. "हे पहा वाळूचे डोंगर. ही वाळू जहाजांत भरून सीमेन्टच्या कारखान्यांत पाठविण्यांत येते.— हा तवकीर दळण्याचा कारखाना पहा.— हीं हिरव्या रंगाच्या दाण्यांचीं वाळवणं पसरलेलीं आहेत ना ? हीं वाळल्यावर काळीं होतील अन् तुम्हीं त्यांना

काळीं मिरी असं नांव द्याल.— ही बघा काजू भाजायची भट्टी. हिच्यांतून हजारों खंडी काजू दरसाल अमेरिकेंत रवाना होतो.— काथ्याच्या दोऱ्या वळण्याचे कारखाने तर इकडे असंख्य आहेत.— ह्या पुलाखालून हा कालवा जात आहे. याच्यांतून बोटी अन् होड्या जातात येतात "— अशा तऱ्हेनें आम्ही पूर्वी कधीं न पाहिलेल्या सृष्टींतून जात असतां संध्याकाळीं पांच वाजतां अलेप्पी गांव आलें. रा. कुरूपम् ह्यांनीं आमची व्यवस्था शारदामंदिरम् नांवाच्या हिंदु हॉटेलांत केली. भाषा समजत नसल्यानें हमाल, हॉटेलवाले आणि दुकानदार यांच्याशीं भांडणें करतां करतां केळकरांचा जीव मेटाकुटीस येई. मद्रासच्या बाजूला हिंदी आणि इंग्रजी ह्यांचा थोडा तरी प्रचार असल्यानें फारसा त्रास पडत नाहीं; पण मलबारमध्यें मात्र खरोखरीच परदेशांत आल्यासारखें वाटत होतें. केळकरांच्या लहान वयाचा फायदा घेऊन हें अप्रिय काम त्यांच्याकडेच आम्हीं सोंपविलें होतें.

अलेप्पीला 'पूर्वेकडील व्हेनिस' असें प्रवासी लोक नांव देतात. ह्या शहरांत रस्त्याऐवजी कालवे हेच मुख्य मार्ग आहेत. मधोमध कालवा, त्याच्या दोन बाजूंस सडका आणि नंतर घरांच्या ओळी आहेत. मालानें आणि उतारूंनीं भरलेल्या होड्या सडकेच्या मध्यभागांतून फिरत असलेल्या पाहून आम्हांला चमत्कार वाटत होता.

प्रो. श्री. ना. बनहट्टी ह्यांनीं अलेप्पीला रात्रीं मुक्काम करून पहांटेच्या बोटीनें कोचीला जाण्याचें आणि तेथें एक दिवस मुक्काम करण्याचें ठरविलें. कोचीला मराठी घराणीं आहेत त्यांस भेटून बृहन्महाराष्ट्रीय संघटन वाढविण्याचा त्यांचा यत्न होता. त्यांचा आशावाद जबर आहे. बृहन्महाराष्ट्रांतील मराठी जनतेचा स्वजनांविषयीं वाटत असलेला जिव्हाळा हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत मीं अनुभवला आहे आणि त्यामुळें बनहट्टींच्या आशावादी सुराशीं माझा सूर जमणें मला कधींच शक्य वाटलें नाहीं. एकच उदाहरण मीं येथें देतों. एकदां मी उत्तर हिंदुस्थानांतून बडोद्यास परत येत असतां एका जंक्शन स्टेशनावर रात्रीं नऊ ते बारापर्यंत पडून राहावें लागलें. त्या वेळीं बृहन्महाराष्ट्रीय अभिनिवेश अंगांत संचरला असल्यानें आपलें महाराष्ट्रीयत्व पटविण्यास मुद्दाम पुणेरी जोडे पायांवर घातले होते. जंक्शन (त्याचें नांव येथें देत नाहीं)-

वर दोन चित्पावन ब्राह्मण स्टेशनचे अधिकारी प्लॅटफॉर्मवर फिरत होते. त्या दोघांस मुद्दाम मराठींत कांहीं प्रश्न विचारले. त्यांचीं उत्तरें इंग्रजींत संक्षिप्त देऊन ते तेथून निघून गेले. त्यांपैकीं एकाचा मुलगा बडोद्यास शिकत होता व त्यानें आपल्या बापास माझी नांवनिशी सांगितली. पांच मिनिटांत स्टेशन-वरील गुजराथी अंमलदारानें तेथें येऊन मला आग्रह करून बिऱ्हाडीं नेलें, जेवूं घातलें आणि बाराच्या गाडीवर रवाना करून दिलें. असे प्रसंग वारंवार आलेले आहेत. प्रो. वनहट्टी यांस तसे न येवोत, अशी सदिच्छा प्रकट करितों.

केळकरांस आणि मला कोचीहून दुपारीं सुटणारी आगगाडी साधावयाची असल्यानें आम्ही रात्रीं अकरा वाजतां अलेप्पीहून निघणाऱ्या छोट्या आग-बोटींतून निघालों. दुसरे अशाकाहारी चार प्रतिनिधी त्याच बोटींत बसलेले होते. आगबोट अगदीं सावकाश म्हणजे साधारण मनुष्य धांवतो त्या वेगानें कालव्यांतून चालू झाली. वाटेंत त्रावणकोर, ब्रिटिश आणि कोची अशा तीन राज्यकर्त्यांच्या कस्टमच्या तपासण्या झाल्या. बोट चालू असतां मधूनच एखादा उतारू उडी मारून कांठावर जाई. रात्र अंधारी असल्यानें दोन्ही बाजूंस काळोखाशिवाय कांहीं दिसेनासें झाले आणि आम्ही आपले बिछाने पसरून झोंपेच्या आधीन झालों.

उजाडल्यानंतर दोन्ही कांठांवरील दृश्य पाहून आपण अजून स्वप्नांतच आहों असा भास झाला. शेजारच्या माणसाच्या अंगाला चिमटा घेऊन स्वप्न नसल्याची खात्री करून घेतली. कालव्याच्या दोन्ही बाजूंस गाडी-वाटा आणि पलीकडे घरांच्या ओळी लागलेल्या दिसत होत्या. मधूनमधून चर्चची उंच टांगलेली घंटा ऐकूं येई. थोड्याच वेळानें चर्चवरून बोट जाई आणि तो घंटा-नाद जवळच्या हिंदु देवळाच्या आरतीच्या आवाजांत लीन होऊन जाई. चर्चमध्यें जाणारे आणि देवळांत जाणारे स्त्रीपुरुष सारख्याच पोशाखाचे आणि रंगाचे दिसत होते. सगळेच मल्याळम् भाषा बोलणारे आहेत असे आम्हांस सांगण्यांत आलें. धर्मभिन्नता ही एकराष्ट्रीयत्वाच्या आड अजून तरी मल-बारांत आलेली नाहीं. मधूनमधून दृष्टीस पडणारा एखादा मोपला मात्र ह्या एकजिनसीपणांत विसंवाद उत्पन्न करीत होता.

आतां उन्हें पडली. कालवा रुंद होत जाऊन त्याचें खाडींत रूपान्तर होऊं लागलें. मासे धरण्याचे चिनी सांपळे कांठाला लावलेले दिसूं लागले. लाकडाचे उभे खांब, त्यांवर आडवे बांबू आणि ह्या बांबूंना अडकविलेली प्रचंड शिंकीं अशी ती युक्ति आहे. आडवा बांबू खालीं पाण्याजवळ न्यावयाचा व मग तें शिंकें पाण्यांत बुडवून बांबूसकट वरतीं उचललें कीं टोपलीभर मासे त्यांतून आयतेच वर येत होते. शिंकें वर उचललें जात असतांच त्यावर टपून बसलेले कावळे हवेंतूनच कांहीं मासे पळवून नेत. अशी योजना मीं दुसरीकडे पाहिलेली नव्हती. खाडीचें रूपान्तर आतां सरोवरांत झालें आणि कोची बंदरांत बोट शिरली. कोची हें बंदर मुंबई आणि कोलंबो यांच्या दरम्यानच्या सर्व बंदरांत मोठें आहे. तें एक बेट असून एका मोठ्या लोखंडी पुलानें मुख्य भूमीशीं जोडलें गेलें आहे. पुलाच्या दुसऱ्या बाजूस एर्णाकुलम् ही कोची संस्थानची राजधानी आहे. रा. कुरूपम् ह्यांनीं आम्हांस सल्ला दिली होती कीं, कोचीला कस्टमचा फार त्रास आहे म्हणून एर्णाकुलमूला आगगाडी पकडा. त्यांच्या उपदेशाप्रमाणें आम्हीं एर्णाकुलम् बंदरावर उतरून रिक्शांत बसून कोसभर अंतरावरील आगगाडीच्या स्टेशनवर जाऊन मद्रासकडे जाणारी गाडी पकडली.

थोड्याच वेळानें मलबार संपला, पण त्याची आठवण कधींहि संपणार नाहीं. हिंदुस्थानच्या इतर प्रांतांपेक्षां सर्वथैव भिन्न प्रकारच्या ह्या प्रांताचें दर्शन सर्व वाचकांनीं एकदां तरी घ्यावें असा माझा त्यांस आग्रह आहे.

सरतेशेवटीं महाकवि कालिदासानें अगदीं थोडक्यांत ह्या मलय प्रदेशाचें अर्थपूर्ण केलेलें वर्णन उतरल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं.

तीरेषु तालीवनमर्मरेषु............
ताम्बूलवल्लीपरिणद्धपूगा स्वलोलतालिङ्गितचन्दनासु ।
तमालपत्रास्तरणासु रन्तुं प्रसीद शश्वन्मलयस्थलीषु ॥

# * रिक्षा : :

[ कॉलिकात्याचा पॉरिचय या लेखाचा परिशिष्ट ]

प्रभाकर ऊर्ध्वरेषे यांनीं लिहिलेली लिलांव ही छोटी हृदयस्पर्शी गोष्ट नुकतीच वाचली. ल्हिएन्ना शहराच्या प्रमुख रस्त्यावर एक दरिद्री मनुष्य आपली, आपल्या उपासमारीनें मरावयास टेकलेल्या बायकोची आणि तिच्यासारख्याच आपल्या पोराची विक्री करण्यास उभा राहिला होता. लोक त्याच्याकडे पाहून तिरस्कारानें म्हणत होते, " हा प्रकार अगदींच असह्य आहे. माणसांची विक्री हा मानवतेचा अपमान आहे. " हें दृश्य वर्णून लेखक म्हणतो, " माणसांना उपासमारीला बळी देणें हा गुन्हा नाहीं, माणसांची विक्री करणें हाच काय तो गुन्हा ! तोच फक्त मानवतेचा अपमान ! " ( अभिरुचि, ऑक्टोबर ( १९४३ ).

ही गोष्ट वाचून मला चवदा वर्षांपूर्वीच्या एका घटनेची आठवण झाली.

मी दफ्तरविद्येचें शिक्षण घेण्यास कलकत्यांत राहत होतों. रोज सकाळीं साडेदहा वाजतां चित्तरंजन वृक्षराजींतून चौरंगीवर रेकॉर्ड ऑफिसांत जावयाचें व चार वाजतां तेथून परत निवासस्थानीं यावयाचें असा माझा क्रम होता. दोनतीन दिवस मी टाकशीनें गेलों आणि परत आलों. जातांनाच रिक्षावाले " बाबूजी रिक्षासे चलो " असें विनवीत असत; परंतु रिक्षा हें जरी मानुष वाहन असलें तरी तींत बसणें हें अमानुषपणाचें लक्षण आहे अशी माझी वडिलोपार्जित प्रामाणिक समजूत होती. कलकत्त्याकडील रिक्षा म्हणजे आतां निघालेल्या सायकल-रिक्षा नसून माणसांनीं ओढीत न्यावयाच्या गाड्या असतात. नरयानांत बसणें हा मानवजातीचा अपमान आहे असें मला वाटे. दोन दोन लठ्ठ बाबू आणि त्यांचें मणभर वजनाचें सामान घोड्याप्रमाणें वेगानें ओढीत जाणाऱ्या, घामाघूम झालेल्या त्या पहाडी जातीच्या रिक्षावाल्याकडे पाहून माझें अंतःकरण व्यथित होई.

चार दिवस नेमानें मला टाकशींतून जातांना पाहून पांचव्या दिवशीं एका रिक्षावाल्यानें मला निवासाच्या जिन्याच्या पायाशींच अडविलें आणि म्हटलें, " बम्बईवाले बाबू, आज आप रिक्षा करना चाहिये. "

मीं हातानें नकार दर्शवीत खंबीरपणानें म्हटलें, " नहीं, भाई. हम बंबईवाले लोक रिक्षासे जाना हराम समजते हैं. अदमींके पाससें जानवरका काम लेना बिलकुल बेअदबीका है. "

" क्यंव, साब ? आपका वजन जास्तीमें जास्ती दो मण होगा. हम तो चार मणका भी बोजा उठाते हैं. बोजा तो बोजाहि होता है, वो आदमीका होवे नहीं तो दाणेदुणेका होवे, इसमें क्या फरक है ? "

त्याचें विधान चुकीचें नव्हतें. ओझें नेणाराला काय, दोन मण सोनें वाहिलें काय, दगड रेटले काय आणि माणसाचें शरीर उचलून नेलें काय ? सगळें सारखेंच; पण ह्या प्रश्नाकडे अशा जडवादीपणानें पाहावयाचें नव्हतें. तो एक भावनेचा प्रश्न होता.

" नहीं, बाबा, बोजेका सवाल नहीं. हम मनुष्यप्राणीकी बेइज्जत नहीं कर सकते. मैं गाडीमें बैठूंगा और तुम् घोडेके माफक गाडी खेचोंगे यह मेरेको पसंत नहीं है, " मीं म्हटलें.

रिक्षावाल्यानें माझें परिवर्तन करण्याचा चंग बांधला होता असें दिसलें. तो म्हणाला, " बाबूजी, आप टॅक्सीवालेकू एक रुपया देओगे, इसमेंसे आठ आने पेट्रोलमें जाएंगे और चार आने मालीकको मिलेंगे और चारहि ड्रायव्हरको मिलेंगे. मैं तुमको आठ आनेमें ले जाऊंगा और आठही आने मेरे बालबच्चोंको मिलेंगे. "

" भाई, मैंने कहा यहा पैसेका भी सवाल नहीं. मानवजातीका अपमान करनेसे हम डरते हैं. " मीं आवेशानें आणि आध्यात्मिक उच्च पातळीवर वास करीत असल्याच्या अभिमानानें म्हटलें.

" बाबूजी, हमारे पाससे घोडेके माफक काम लेना हराम है, लेकिन सब आपके सरीके होंगे तो हमको खानेकू कैसा मिलेगा ? पहाडी परदेशी आद-

मीको भूकसे मारना हराम नहीं ऐसा तो नहीं आप समझते ? दयाही धर्म है, खाली बडी बातका मानवताको कुछ भी उपयोग होता नही. "

ह्या त्याच्या शब्दांनीं माझें मन पालटलें. मानवतेच्या बाष्कळ अभिमानापेक्षां दयेचें मोल अधिक आहे हें त्या रिक्षावाल्यानें माझ्या निदर्शनास आणून दिलें. त्या दिवसापासून मी रिक्षेंत बसूं लागलों. हल्लीं कलकत्त्यास उपासमारीनें जें तांडवनृत्य चालविलें आहे त्याच्या सपाट्यांत असले कितीतरी परदेशी रिक्षावाले प्राणास मुकले असतील असा विचार वारंवार मनांत येतो आणि त्या रिक्षावाल्याचे करुण शब्द पुनः कानांत घोंगावतात, " बाबूजी, आदमीको भूकसे मारना यह उसकी बेअदबी नहीं ! " ( १९४३ ).